■ RNI No. : MAHMAR / 2000 / 02965
■ Publication & Posting Dt. 01 & 02 Aug. 2021
■ वर्ष ३१ वे / अंक ८ वा / सांगली / पृष्ठे ४०
■ ऑगस्ट २०२१
■ किंमत २० रु.


विज्ञान निर्भयता नीती

विवेकी वाटचालीची तीस वर्षे

# अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र™

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र

## डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृती विशेषांक



# अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र

RNI No. : MAHMAR/2000/02965

वर्ष : ३१ वे अंक : ८ वा

ऑगस्ट २०२१

**संपादक : राजीव देशपांडे**

सल्लागार संपादक : प्रा. प. रा. आर्डे

**सहसंपादक**
ॲड. मुक्ता दाभोलकर,
अनिल चव्हाण, नरेंद्र लांजेवार

**व्यवस्थापकीय संपादक**
राहुल थोरात

अंक निर्मिती : सुहास पवार
अंक वितरण : सुहास येरोडकर
मुखपृष्ठ : गिरीश सहस्त्रबुद्धे
मांडणी : संदीप भोरे
मुद्रित शोधक : दिनेश धनसरे

वर्गणीमध्ये ५०% सवलत
वार्षिक वर्गणी रु. ४०० ऐवजी रु. २००

किंमत २० रूपये

वर्गणी एक वर्षासाठीच स्वीकारली जाईल

वर्गणीची रक्कम ऑनलाईन पेमेंटद्वारे
खालील बँक खात्यावर पाठवावी.
THE SARASWAT CO-OP. BANK LTD.
Branch : Shivaji Nagar, Sangli.
C.A.A/c. No. 17310010000155
IFSC Code : SRCB0000173

ऑनलाईन वर्गणीसाठी लिंक :
(गुगल पे, फोन पे, पेटीएम)
http://ansvarta.in/subscription.php

(महत्त्वाची सूचना : वर्गणी ऑनलाईन जमा केल्यानंतर ०२३३-२३१२५१२ या फोनवर आपला संपूर्ण पत्ता कळवावा किंवा सुहास पवार ९९७५६ ९२१२१ या नंबरवर व्हॉट्सॲप करावा.)

ANDHASHRADHA NIRMULAN SAMITI

सोबतचा क्यूआर कोड स्कॅन करून आपण आपली वर्गणी ऑनलाईन पाठवू शकता.

## डॉ. दाभोलकरांचे विचारविश्व व्यापक करणे, हीच त्यांना आदरांजली !

मानवी संस्कृतीच्या इतिहासात ज्या-ज्या लोकांनी समाजातील वर्ण, वंश, जात, लिंग, धर्माधारित आर्थिक, सामाजिक शोषणाविरोधात संघर्ष केला; अगदी अहिंसक, विधायक, सनदशीर मार्गाने केला व प्रस्थापित सनातन्यांची व्यवस्था, तत्त्वज्ञान यांना आव्हान दिले, व्यवस्थेच्या आतून अगर बाहेरून विद्रोह केला, त्यांना नेहमीच हिंसक प्रतिक्रियांना सामोरे जावे लागले आहे, आपला जीव गमवावा लागला आहे. अशी उदाहरणे भारतीय संस्कृतीत तर मुबलक आहेत. अगदी चार्वाकापासून ते थेट गांधी, पानसरे, कलबुर्गी, गौरी लंकेश, डॉ. नरेंद्र दाभोलकरांपर्यंत! या खुनांना धार्मिक नैतिकतेचे मुलामे चढवून त्या हिंसेचा प्रतिकार करणाऱ्यांनाही देशद्रोही, धर्मद्रोही, हिंसक ठरवले गेले आहे.

आज देशाचे स्वातंत्र्य ७५ व्या वर्षात प्रवेश करीत असताना सभोवतीची परिस्थिती तर अशी आहे की देशद्रोही, धर्मद्रोही ठरविण्यासाठी फार मोठा विद्रोह करायचीही गरज नाही. आजच्या सत्ताधाऱ्यांच्या दलित, आदिवासी, कामगार, किसानविरोधी धोरणावरची हलकी-फुलकी टीकाही देशद्रोहाचा गुन्हा दाखल होण्यास कारणीभूत ठरू शकते. मणिपूरमधील पत्रकार किशोरचंद्र वांगखेम यांनी, 'गोमूत्राने कोरोना बरा होत नाही,' असे केलेले विधान असो वा बंगळुरूच्या दिशा रवी या तरुणीचे 'टूलकिट' प्रकरण; अशा संदर्भातही देशद्रोहाचे खटले नोंदविण्यात आले आहेत. व्यंग्यचित्रकार, नकलाकार, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, मानवाधिकार कार्यकर्ते, आंदोलन करणारे विद्यार्थी; जे-जे सामाजिक, आर्थिक शोषणाच्या विरोधात उभे राहत आहेत, अशा अनेकांना देशद्रोहासह विविध खटल्यांत गुंतविले जात आहे. वृत्तपत्र, चित्रपट माध्यमे; मग ती डिजिटल असोत अगर छापील, त्यांच्यासंदर्भात कायदे करून, विविध एजन्सीकडून छापे मारून त्यांच्यावर दबाव आणला जात आहे. आता तर 'पेगासीस'सारख्या तंत्रज्ञानाच्या सहाय्याने तुमच्या अत्यंत खासगी आयुष्यातही सत्ताधाऱ्यांना प्रवेश करता येऊ लागला आहे.

दुसऱ्या बाजूला, लव्ह-जिहाद, खानदानी, जातीय प्रतिष्ठेसारख्या कल्पितांच्या आवरणाखाली आंतरजातीय-धर्मीय मिश्रविवाहांना होणारा टोकाचा विरोध, गोहत्येच्या नावाखाली पडणारे झुंडबळी, जातपंचायतींचे बहिष्कार, धर्माचे बाजारीकरण, धर्मातील अनिष्ट चाली-रीती, रुढी-परंपरा, कर्मकांडे आणि त्यांच्या आधारावर होत असलेल्या आर्थिक, सामाजिक अन्याय, शोषणाविरोधात जर तुम्ही असाल तर तुम्हाला धर्मद्रोही ठरवले जात आहे.

गेल्या दोन वर्षांतल्या कोरोनाच्या साथीने देशाच्या अर्थकारणाचे कंबरडे मोडलेले आहे. कोरोना लाटेच्या तडाख्याबरोबर बेरोजगारी, महागाईचेही तडाखे सर्वसामान्य जनतेला सोसावे लागत आहेत. त्यात हवामानबदलाच्या परिणामांमुळे होणारी अतिवृष्टी, पूर यामुळे लोकांच्या हालात भरच पडत आहे. यातून मार्ग काढण्याची कोणतीही धमक, धोरणे आजच्या सत्ताधाऱ्यांकडे नाहीत. त्यामुळेच त्यांचा सारा भर एका बाजूला देशाची सारी साधनसंपत्ती आपल्या भांडवलदार बगलबच्चांच्या घशात ओतण्यावर; तर दुसऱ्या बाजूला टाळ्या, थाळ्या, गोमूत्र, यज्ञ, मंत्र, जपजाप्य,

(पुढील मजकूर पान नं. ८ वर)






**पत्ता व फोन**

**अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र**

**कार्तिक अपार्टमेंट, एफ-४, राजर्षी शाहूनगर, सहारा चौक, संजयनगर, सांगली ४१६ ४१६**

**फोन : ०२३३/२३१२५१२**

E-mail : ansvarta@gmail.com

Web. : anisvarta.co.in

**या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.**

**मुद्रण स्थळ : कुमार प्रिंटर्स, सांगली.**

अंकातील छायाचित्रे इंटरनेटवरून साभार

**'अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र'** हे पत्रक **मुद्रक अण्णासाहेब धोंडीराम कोरे** यांनी **मालक अंधश्रद्धा निर्मूलन समिती सातारा व प्रकाशक राहुल सुर्यकांत थोरात** यांचेसाठी **कुमार प्रिंटर्स,** १७४-१७६, वसंतदादा इंडस्ट्रियल इस्टेट, सांगली ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **अंधश्रद्धा निर्मूलन समिती कार्यालय,** एफ ४, कार्तिक अपार्टमेंट, सहारा चौक, संजयनगर, सांगली पिन ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.

**- संपादक : राजीव मधुकर देशपांडे,**

मोबाईल नंबर - ९१३६१ ०९८४५

ईमेल : ansvarta@gmail.com

**Andhashraddha Nirmulan Vartapatra** Behalf **Owned by Andhashradha Nirmulan Samiti Satara Printer by Annasaheb Dhondiram Kore and Publisher Rahul Suryakant Thorat Printed at Kumar Printers,** 174 - 176,Vasantadada Industrial Estate, Sangli 416416 (Maharashtra) and **Published at Andhashradha Nirmulan Samiti karyalay,** F-4, Kartik Apartment, Sahara Chowk, Sanjaynagar, Sangli 416416 (Maharashtra).

**Editor by Rajiv Madhukar Deshpande,**

Mob. 9136109845,


Email:ansvarta@gmail.com

□

अरविंद गुप्ता

बुद्धाने सांगितले, ''समाजात नेहमी जीवन आणि मृत्यू यामधील शक्तींचा संघर्ष चालूच असतो. आपण कोणत्या बाजूचे आहोत, यांची निवड आपल्याला करावी लागते.'' गांधी मारेकऱ्याच्या गोळीने मारले गेले, मार्टिन ल्युथर किंग (ज्यु.) बंदूकधाऱ्याच्या. त्याचप्रमाणे नरेंद्रभाई! पण त्यांचे विचार आणि कार्य मात्र चिरकाल टिकेल.

# नरेंद्रभाई




माझ्यासाठी डॉ. नरेंद्र दाभोलकर नरेंद्रभाई होते. ते 'आयुका'त डॉ. जयंत नारळीकरांना भेटायला यायचे. त्या दोघांनी मिळून फलज्योतिषावरील लोकांच्या विश्वासाला डळमळीत करणाऱ्या एका चाचणीचे आयोजन केले होते. अनेक ज्योतिषांना त्यांनी मानसिक विकलांग असलेल्या व ठीकठाक असलेल्या मुलांच्या जन्मकुंडल्या दिल्या होत्या. ज्योतिषांना कोणती मुले मानसिक विकलांग आहेत व कोणती मुले सामान्य आहेत, याची माहिती नव्हती. त्या जन्मकुंडल्यांच्या आधारे त्या मुलांपैकी कोण मुले मानसिक विकलांग आहेत व कोण सामान्य आहेत, हे दाखवून द्यायचे होते. ज्योतिषांची भाकिते मोठ्या प्रमाणावर चुकीचीच निघाली होती.

नरेंद्रभाईंची 'आयुका'मध्ये जेव्हा कधी फेरी व्हायची, तेव्हा ते हमखास आमच्या बाल विज्ञान केंद्रात डोकावायचेच. आम्ही करत असलेल्या विज्ञानप्रसाराच्या कामाबद्दल ते चांगलेच अवगत होते आणि त्याबद्दल त्यांना कौतुकही होते. 'आयुका'कडे एक फिरते तारांगण होते. ते तारांगण घेऊन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती दुर्गम खेड्यापाड्यांवर त्या तारांगणाचे कार्यक्रम करत असे.

माझी आणि नरेंद्रभाईंची जवळीक वाढण्याला एक योगायोग कारणीभूत ठरला. २००६ मध्ये सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ प्रा. यशपाल ८० वर्षांचे झाले. त्या निमित्ताने प्रा. माशेलकर यांनी यशपाल यांच्या गौरवार्थ भारतीय राष्ट्रीय विज्ञान संस्थे (आयएनएसए) तर्फे दिल्लीतील 'आयएनएसए'च्या प्रांगणात तीन दिवसांचा एक कार्यक्रम आयोजित केला. प्रा. माशेलकर त्यावेळेस 'आयएनएसए'चे अध्यक्ष होते. त्या कार्यक्रमासाठी अनेक भारतीय शास्त्रज्ञ व कार्यकर्ते एकत्र आले होते. योगायोगाने माझी आणि नरेंद्रभाईची राहण्याची व्यवस्था आयोजकांनी 'त्या' तीन दिवसांसाठी एकाच खोलीत केली होती. दररोज रात्री आम्ही उशिरापर्यंत विविध विषयांवर गप्पा मारत असू. त्यांना पिंपरी-चिंचवडला साने गुरुजी बाल ग्रंथालय उभे करायचे होते. त्यासाठी ते महानगरपालिकेच्या आयुक्तांना भेटायला गेले. त्यांना बघताच आयुक्त खुर्चीवरून उठले आणि त्यांच्या पाया पडायला लागले आणि म्हणाले, ''मी विद्यार्थी असताना नरेंद्रभाईंनी दिलेल्या शिष्यवृत्तीमुळे मी माझे शिक्षण पूर्ण करू शकलो.''

सकाळी मी जागा होण्याच्या आधीच नरेंद्रभाई उठलेले असायचे आणि त्यांचा व्यायाम चालू झालेला असायचा. अत्यंत शिस्तबद्ध असलेल्या नरेंद्रभाईंनी आपले आयुष्य सामाजिक न्याय आणि पुरोगामी सुधारणांसाठी वेचले. त्यांचे एक मोठे भाऊ पुणे विद्यापीठाचे कुलगुरू होते, तर दुसरे भाऊ श्रीपाद दाभोलकर जैविक शेतीतील तज्ज्ञ होते. पुरोगामी दाभोलकर कुटुंबाचा महाराष्ट्राच्या विकासात मोठा वाटा आहे.

२५०० वर्षांपूर्वी बुद्धांनी म्हटले आहे, ''कोणी लिहिलेले वाचले म्हणून, कोणी सांगितले म्हणून, विश्वास नको ठेवूस. तुझ्या विवेकाला पटले तरच मान्य कर.''


(पुढील मजकूर पान नं. २० वर)

□

प्रभाकर नानावटी

डॉक्टरांच्या देहयष्टीकडे पाहिल्यास ते इतरांपेक्षा वेगळे न वाटता चारचौघांसारखे सामान्य असेच वाटत होते. 'डिसएंचांटिंग इंडिया' या पुस्तकाच्या जॉन क्वॅक या संशोधक-लेखकाने उल्लेख केल्याप्रमाणे दिसण्यात किरकोळ अंगकाठी, अंगावर अगदीच फिकट रंगाची खादीची साधी पँट, त्यावर साधा खादी कुर्ता वा शर्ट, डोक्यावर पांढरे केस व डोळ्यांवर कालबाह्य वाटणारा चष्मा असे डॉक्टरांचे एकंदरीत बाह्यरूप होते. कदाचित नुसत्या बाह्यरूपावरून त्यांच्यातील व्यक्तिमत्त्वाची ओळख कधीच पटली नसती. परंतु जेव्हा ते बोलत, तेव्हा ऐकणारे मन लावून ऐकत असत. त्यांच्या मांडणीत तर्कशुद्धपणा असे. अधिकारवाणीने ते आपले मुद्दे पटवून देत असत.

# थोर मानवतावादी (ह्युमॅनिस्ट) डॉ. नरेंद्र दाभोलकर




अनेक वेळा मानवतावादी (ह्युमॅनिस्ट) व मानवताहितवादी (ह्युमॅनिटेरियन) हे शब्द समानार्थी असल्यासारखे वापरले जातात. 'मानवताहितवादी' या शब्दप्रयोगामागे केवळ करुणा व सहानुभूतीच्या दृष्टिकोनातून उद्भवलेल्या दातृत्वाला अग्रक्रम दिला जातो. परंतु 'मानवतावादी' केवळ दातृत्वापुरते मर्यादित नसून समाजातील ज्वलंत समस्यांकडे जनतेचे लक्ष वेधत त्या समस्यांच्या निवारणासाठी सर्व तऱ्हेने प्रयत्न करून समाजाला एक पाऊल पुढे नेण्याच्या प्रयत्नात असतात.

मानवतावाद्यांमध्ये सैद्धांतिक मानवतावादी व व्यावहारिक मानवतावादी असे ढोबळपणे दोन प्रकार करता येतील. काही मानवतावादी एक तत्त्व वा सिद्धांत म्हणून त्याचा अंगीकार करत जमेल तशी चर्चा, भाषण, लेख इत्यादींमधून मानवतावादाचा संदेश देण्यात व मानवी मूल्यांसाठी लढा उभारणाऱ्या व्यक्ती व/वा संघटनेला मदतीचा हात देतात. त्यांचा कल मानवतावादी विचारप्रवाहावर भर देणारा असतो. परंतु दुसऱ्या प्रकारचे मानवतावादी मानवी मूल्यांचा प्रसार, प्रचार व प्रत्यक्ष जीवनात त्यांचे आचरण करण्यासाठी सामान्य जनतेला प्रोत्साहित करत; प्रसंगी प्रत्यक्ष लढ्यात सहभागी होत असतात. या प्रकारच्या मानवतावाद्यांना प्रत्यक्ष व्यवहारात मानवी मूल्ये रुजविण्यात रस असतो. मानवी मूल्यांना पायदळी तुडविणारे शोषण, व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच, दडपशाही, कालबाह्य रूढी-परंपरेमधील पिढ्यान्‌पिढ्या पाळल्या जात असलेल्या अनिष्ट प्रथा, अज्ञान, समाजातील उच्च-नीचतेबद्दलच्या विकृत कल्पना, लिंगभेद, जातिभेद, अंधश्रद्धा, अविवेकी वर्तन इत्यादी प्रकारच्या समस्यांना उजेडात आणून संघटनात्मक लढा उभा करण्याच्या प्रयत्नात व्यावहारिक (pragmatic) मानवतावादी पुढाकार घेत असतात. यांचा लढा मुख्यत्वेकरून शांततामय मार्गाने जनतेच्या प्रबोधनातून साकारला जात असतो. मानवी मूल्यांची, मानवी अधिकार-हक्कांची, समानतेची, शांततेची, पर्यावरणाची चाड असलेल्या मानवातावाद्यांच्या प्रयत्नामुळे आधुनिक समाजातील जनतेचे जीवन सुसह्य होण्यास नक्कीच मदत मिळते. रूढीशरणता, शब्दप्रामाण्य, अंधश्रद्धेच्या वेगवेगळ्या तऱ्हा, गुरू व नेते यांच्या अधिन होण्याची विवशता, भावनांच्या आहारी जाण्याची सहज प्रवृत्ती, सामुदायिक दडपणाखाली मनाचे व सारासार विचार करण्याचे विचारस्वातंत्र्य गमावण्याची सवय, इत्यादी गोष्टी माणसातील विवेकबुद्धीला तडे देतात. सुशिक्षित म्हणविणारेसुद्धा या गोष्टींना बळी पडतात. गंमत म्हणजे हे एका प्रकारचे मानसिक दास्यत्व असते, याचीच कल्पना अनेकांच्यात नसते. म्हणूनच माणसांच्यातील वैचारिक शक्तीला आव्हान देत त्यांना कार्यप्रवण करणे हे वाटते तितके सोपे काम नाही. त्यामुळे मानवतावादाच्या व्यवहार्यतेवर भर देणारे डॉ. नरेंद्र दाभोलकर हे एक थोर मानवतावादी होते, असे म्हणण्यास भरपूर वाव आहे.

मानवतावादाच्या राज्यशास्त्रीय व्याख्येनुसार सर्व सृष्टीमध्ये माणूस हाच केंद्रस्थानी असून बुद्धी, सद्‌गुण, सामर्थ्य, संशोधकता

आणि प्रायोजकतेचा उद्गाताही माणूसच असतो. सर्व मूल्यांचा कर्ता/निर्माता हा माणूसच आहे, असा विचार मानवतावादाने जगापुढे ठेवला. हा मूलतः कोणत्याही अमानवी श्रद्धेच्या विरोधीच असतो. याचा अर्थ मानवतावाद हा नेहमीच निरीश्वरवादी असतो, असे नव्हे. आपल्या देशातील संतवाङ्‌मयात मानवतावादाची बीजे आढळतात. आधुनिक महाराष्ट्रातील स्त्रीहक्काचे पुरस्कर्ते व राजकीय स्वातंत्र्याअगोदर सामाजिक स्वातंत्र्य हवे, असे विचार मांडणारे सर्वांगीण सुधारक गोपाळ गणेश आगरकर, तळागाळातील मुलींना शिक्षित करण्यास पुढाकार घेणाऱ्या सावित्रीबाई फुले, शेतकऱ्यांच्या व बहुजनांच्या वेदनांना वाचा फोडणारे जोतिबा फुले व आधुनिक समाजमूल्ये व लोकशाही मूल्ये यांचा आग्रह धरणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे थोर मानवतावादी होते. याच मानवतावाद्यांच्या मालिकेत अंधश्रद्धा निर्मूलनासाठी मोठ्या प्रमाणात चळवळ उभे करणारे डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचेही नाव कोरले जाईल. २० ऑगस्ट २०१३ रोजी ६७ वर्षांच्या डॉ. दाभोलकरांची निर्घृण हत्या करण्यात आली. सारा महाराष्ट्र हळहळला. आठ वर्षे उलटून गेली तरी खुन्यांचा व या खुनामागील सूत्रधारांचा शोध चालू आहे. सुमारांचीच सद्दी असलेल्या या कालखंडात डॉक्टरांच्या मानवतावादाविषयीच्या योगदानाचा आढावा घेतल्यास ते अप्रस्तुत ठरणार नाही.

त्यांच्या कर्तृत्वाकडे आणि त्यांनी केलेल्या भाषणांतून व लिहिलेल्या पुस्तकांमधून वेळोवेळी मांडलेल्या विचारांकडे वस्तुनिष्ठपणे पाहिल्यास तरुण वयापासूनच त्यांनी अप्रत्यक्ष/प्रत्यक्षरित्या मानवी मूल्यांची जपणूक करण्यातच आयुष्य वेचले होते, हे लक्षात येईल. जरी त्यांची ओळख १९८९ मध्ये स्थापन केलेल्या अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष म्हणून असली तरी वैद्यकशास्त्राची पदवी प्राप्त केल्यानंतरचा सुरुवातीचा काही काळ या व्यवसायात घातला असला तरी त्यांचा कल सामाजिक कामांकडेच होता, हे त्यांनी लिहिलेल्या 'समाजवादी युवक दल' या लेखातून स्पष्ट होते. कॉलेजमध्ये शिक्षण घेत असतानासुद्धा सामाजिक कामांची कल्पना मनात उसळत असल्यामुळे 'युक्रांद' व जयप्रकाश नारायण यांच्या नवनिर्माण चळवळीने ते प्रभावित झाले. नावाजलेले कबड्डीपटू असल्यामुळे सहकारी तरुणांची 'समाजवादी युवक दल' या नावाची संघटना त्यांनी बांधली. बाबा आढाव यांच्या 'एक गाव-एक पाणवठा' या चळवळीत सहभाग घेऊन दलितांच्या बरोबर मिरवणुकीत जाऊन पाणी भरले. १९७५-७७ च्या आणीबाणीच्या काळात घटनादुरुस्तीच्या विरोधातील चर्चेत सहभाग घेतला. सातारा शहरात हमाल संघटना बांधण्याचा प्रयत्न केला. आसपासच्या गावांत समता मोर्चा काढला. पाणवठा चळवळ, समता मोर्चे, लाँग मार्च इत्यादींतून मिळालेल्या सामाजिक चळवळीच्या अनुभवाच्या शिदोरीमुळे पुढील वाटचालीचा पाया रचला गेला. दलितांची चळवळ हा त्या काळच्या त्यांच्या आयुष्याचा महत्त्वाचा भाग बनला. देवदासी प्रतिबंधक कायद्याचा आधार घेत महानुभाव पंथाचे मुख्य केंद्र असलेल्या फलटण येथील दलित मुलींचे देवाशी लग्न लावणाऱ्या महंतांच्या विरोधात खटला भरला. जनमानसात पूजनीय असलेल्या शंकराचार्यांना सातारामुक्कामी चातुर्वर्ण्य, दलित इत्यादी विषयांवर बोलते करून त्यांच्या विरोधात निषेध मोर्चा काढला. परंतु या सुरुवातीच्या काळातील हुंडाविरोध, पाणवठा, देवदासी इत्यादी चळवळींना व्यापक स्वरूप लाभले नव्हते. ते मूलभूत लढे नव्हते, याची जाणीव दाभोलकरांना होऊ लागली. परंतु या चळवळीमुळे सामाजिक जाणीव समृद्ध होत गेली. मार्क्सवादी, गांधीवादी, जेपीवादी, लोकशाही समाजवादी आणि इतर अनेक विचारप्रवाहांमधून प्रेरणा घेऊन आयुष्य झोकून द्यावे, असे त्यांना वाटू लागले.

१९८५च्या सुमारास पुण्यातील लोकविज्ञान संघटनेने तथाकथित चमत्कारांचे प्रात्यक्षिकासहित भाषण देण्यासाठी बी. प्रेमानंद या 'भटक्या बुद्धिप्रामाण्यवादी'ला आमंत्रित केले. चमत्काराचे प्रयोग बघून डॉ. दाभोलकर प्रभावित झाले. काही समविचारी मित्रांना घेऊन डॉक्टर स्वतः पुण्याच्या अवतीभोवती अशा प्रकारचे प्रयोग करू लागले. लोकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला. खरे पाहता इतर काही 'ईझी चेअर फिलॉसॉफर्स'प्रमाणे चहा-कॉफीचे घुटके घेत अधून-मधून अशा विषयावर एखाद-दुसरा लेख लिहून आपला वैद्यकीय व्यवसाय सांभाळत ते मजेत आयुष्य काढू शकले असते; परंतु तसे होणार नव्हते. राजमार्गावरील सोयीस्कर, ऐषारामी जीवनपद्धती सोडून समाजसुधाराच्या खडतर पाऊलवाटेने पुढे जाण्याची हिंमत त्यांनी दाखवली. त्या क्षणांतील अंतःप्रेरणेमुळे त्यांना अशा प्रकारच्या चळवळीत आयुष्य वेचावेसे वाटले असेल.

लोकांशी संवाद साधण्याच्या अंगभूत कलेमुळे समविचारी तरुण-तरुणींना प्रेरित करत पुढील दोन वर्षे महाराष्ट्रभर फिरून अंधश्रद्धा व चमत्कार यांच्या विरोधात एक लवचिक अशी संघटना बांधण्याचा प्रयत्न ते करू लागले. १९८९ मध्ये महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची (अंनिस) त्यांनी रीतसर स्थापना केली. काही महिन्यांत 'अंनिस'च्या १७-१८ शाखा ठिकठिकाणी कार्यरत झाल्या. डॉ. दाभोलकर या समितीचे कार्याध्यक्ष झाले. त्यांच्या मृत्युसमयी या समितीच्या महाराष्ट्र, गोवा व कर्नाटकातील शाखांची संख्या २०० च्या जवळपास होती.

दूरदृष्टी असलेल्या एखाद्या द्रष्ट्याप्रमाणे आपली संघटना कशी असावी, याचे स्पष्ट चित्र त्यांच्या डोळ्यांसमोर होते. स्वतःहून 'अंनिस'मध्ये आलेल्या कार्यकर्त्यांचा काहीतरी जुजबी काम करत निष्कारण वेळ जावा वा मित्रमैत्रिणींबरोबर गप्पा मारत त्यांचे मनोरंजन व्हावे, यासाठी ही संघटना नसून तळागाळातल्यांची व शोषितांची अंधश्रद्धा व इतर प्रकारे फसवणूक होऊ नये; त्याचबरोबर कार्यकर्त्यांना अर्थपूर्ण आयुष्य जगता यावे, यासाठी ते प्रयत्नशील होते. जरी हे कार्यकर्ते 'अंनिस' सोडून गेले तरी 'अंनिस'ने रुजविलेल्या मूल्यांप्रमाणे ते नंतरचे आयुष्य जगतील, याची खात्री डॉक्टरांना होती. ते एका अर्थाने 'ट्रेनर्स ट्रेनी' होते. काही वैयक्तिक कारणांमुळे वा

मतभिन्नतेमुळे कार्यकर्ते 'अंनिस' सोडून इतर संघटना वा संस्थांमध्ये गेले असले तरी डॉक्टरांनी रुजविलेली मानवतावादी मूल्ये ते कधीच विसरू शकत नाहीत. त्यामुळे त्यांच्या कार्यकुशलतेचा फायदा इतर संघटनांनासुद्धा मिळत गेला.

डॉक्टरांच्या देहयष्टीकडे पाहिल्यास इतरांपेक्षा वेगळे न वाटता चारचौघांसारखे सामान्य असेच ते वाटत होते. 'डिसएंचांटिंग इंडिया' या पुस्तकाच्या जॉन क्वॅक या संशोधक-लेखकाने उल्लेख केल्याप्रमाणे दिसण्यात किरकोळ अंगकाठी, अंगावर अगदीच फिकट रंगाची खादीची साधी पँट, त्यावर साधा खादी कुर्ता वा शर्ट, डोक्यावर पांढरे केस व डोळ्यांवर कालबाह्य वाटणारा चष्मा असे डॉक्टरांचे एकंदरीत बाह्यरूप होते. कदाचित नुसत्या बाह्यरूपावरून त्यांच्यातील व्यक्तिमत्त्वाची ओळख कधीच पटली नसती. परंतु जेव्हा ते बोलत, तेव्हा ऐकणारे मन लावून ऐकत असत. त्यांच्या मांडणीत तर्कशुद्धपणा असे. अधिकारवाणीने ते आपले मुद्दे पटवून देत असत.

आयुष्यातील फार मोठा काळ अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या उभारणीसाठी त्यांनी व्यतीत केला. मृत्यूच्या आदल्या रात्रीसुद्धा मुंबई येथील टीव्हीवरील 'अंनिस'च्यावरील मुलाखतीत ते सहभागी होऊन पुण्याला परतले होते. 'अंनिस'च्या उभारणीसाठी त्यांनी खालील चतुःसूत्रीवर भर दिला होता -

शोषण करणाऱ्या अंधश्रद्धांना विरोध
वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार, प्रसार व अंगीकार
धर्माची विधायक, कृतिशील चिकित्सा आणि
व्यापक समाजपरिवर्तनवादी संघटनांबरोबर सहयोग

या चारी सूत्रांचे वस्तुनिष्ठपणे विश्लेषण केल्यास या सूत्रांचा आशय पन्नास टक्क्यांपर्यंत तरी समाजमानसात रुजविण्यासाठी यातील प्रत्येक सूत्राचे कार्य करणाऱ्या स्वतंत्र अशा चार संघटनांची गरज भासली असती. परंतु डॉक्टरांनी त्यांच्यातील संघटनकौशल्यामुळे महाराष्ट्रातील तरुण वर्गाला आकर्षित करून या चारी सूत्रांच्या कार्यवाहीसाठी आपापली जात, धर्म, वर्ग सोडून एकत्रितपणे कार्य करणारे कार्यकर्ते घडविले. एवढेच नव्हे, तर अत्यंत प्रतिकूल वातावरणात कार्यकर्त्यांना जोमाने व मनःपूर्वक काम करण्यास भाग पाडून संघटनेला नावारुपाला आणण्यात डॉक्टर यशस्वी झाले.

मानवतावादाला अभिप्रेत असलेल्या पद्धतीने कुठल्याही प्रकारच्या शोषणांचा विरोध करताना धर्मातील घातक रूढी-परंपरांच्या विरोधांचा सामना करावाच लागतो. धर्माचा व्यापार मांडलेल्यांच्या हितसंबंधांना धक्का बसत असल्यामुळे 'अंनिस'च्या कामात अडथळे आणले जात होते व त्याची झळ कार्यकर्त्यांना सोसावी लागत होती. डॉक्टरांच्या आश्वासक प्रेरणेमुळे कार्यकर्त्यांची फळी उभी राहिली व सर्व विरोधांना तोंड देत अंधश्रद्धेची जळमटं काही प्रमाणात तरी दूर करण्यात 'अंनिस' यशस्वी झाली व याचे सर्व श्रेय डॉक्टरांना द्यायला हवे. 'अंनिस'च्या कामासंबंधी त्यांच्याच शब्दांत अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य हा सतत चर्चेचा विषय ठरत आला आहे. याचे एक महत्त्वाचे कारण असे की, या विषयाचा संबंध श्रद्धेशी येतो आणि जवळपास सर्वांच्या लेखी श्रद्धा याचा अर्थ धर्मश्रद्धा असाच असतो, म्हणूनच धर्म या अत्यंत महत्त्वाच्या संस्थेबद्दल अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे आकलन कालसुसंगत असण्याची गरज आहे. धर्माचा अभिमान, अस्मिता, आग्रह, अहंकार अधिक बलवान करण्याचा प्रयत्न सर्वच धर्मांत चालू आहे. त्याला परधर्मद्वेषाचे रूप देखील अनेकदा येते. धर्मभावनेचे व्यापारीकरण, बाजारीकरण, विकृतीकरण आणि राजकारण करणे चालूच आहे, असे सांगता येईल.

अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य ही तारेवरची कसरत आहे, याची जाणीव डॉक्टरांना होती. मानवातावाद नेहमीच धर्मनिरपेक्षतेला महत्त्व देतो. भारतीय संविधानाप्रमाणे व्यक्तीला स्वतःच्या धर्मश्रद्धा बाळगण्याचा पूर्ण अधिकार आहे. असे जरी असले तरी धर्माचरणातील कालबाह्य वाटणारी अर्थहीन कर्मकांडे, धर्माच्या बाजारीकरणातून होणारे शोषण व फसवणूक, अवैज्ञानिक चाली-रीती यांची चिकित्सा करण्याचाही अधिकार व्यक्तीला आहेच. महाराष्ट्रातील यापूर्वीचे समाजसुधारक व संत यांच्याप्रमाणे लोकांच्या धर्मभावनेबाबत विवेकाच्या दृष्टीने कृतिशील संवाद करण्याचाही व्यक्तीला अधिकार आहे व याच अधिकाराचा वापर 'अंनिस' करत आहे, याची जाणीव डॉक्टरांनी सर्व संबंधितांना व शासनाला अगदी शांतपणे व निर्धारपूर्वक करून दिली. यासाठी बुवाबाजीच्या विरुद्ध मोठ्या प्रमाणात लढा दिला, अनेक बुवा-बाबांचा पर्दाफाश केला. त्यासाठी महाराष्ट्रभर स्वतःच्या आरोग्याची काळजी न करता, मिळेल ते वाहन पकडून ते रात्रंदिवस फिरले. कार्यकर्त्यांच्या घरी जेवले, त्यांच्या घरी मुक्काम केला. कार्यकर्त्यांना उत्साहाने कार्य करण्यास उद्युक्त केले. लोकशाही मूल्यांवर संघटनाबांधणी केली. 'अंनिस'च्या शाखांना स्वतंत्रपणे कार्य करण्याची मुभा दिली. त्यामुळे अंधश्रद्धांच्या गर्तेत सापडलेल्या या समाजातील तरुण-तरुणींना डॉक्टरांच्या बरोबर काम करावेसे वाटू लागले. हे काम करत असताना भरपूर काही शिकावयास मिळते, अशा कामातून आनंद मिळतो याचीही कार्यकर्त्यांना खात्री होऊ लागली, म्हणूनच डॉक्टर वेगवेगळ्या मोहिमा राबवू शकले, शिबिरं व संमेलनं भरविली, यात्रा काढल्या व व्यापक प्रमाणात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात अंधश्रद्धांविरोधी भूमिका पोचविण्यात 'अंनिस' यशस्वी झाली.

परंतु 'अंनिस'चे कार्य फक्त बुवाबाजीचा पर्दाफाश, चमत्कारांना विरोध वा भूत-भानामतीतील खोटेपणा व लबाडपणा उघड करण्यापुरतेच सीमित ठेवण्यात डॉक्टरांना रुची नव्हती. अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ अग्निशामक दलासारखी कुणीतरी बोलवल्यावर बुवा-बाबांना पकडणारी संघटना, असा नावलौकिक मिळवणे एवढ्यापुरतीच मर्यादित ठेवावी, असे डॉक्टरांना वाटत नव्हते. ही चळवळ जनमानसामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, चिकित्सक विचार, लोकशाही, समाजवाद, धर्मनिरपेक्षता इत्यादी मूल्ये रुजविण्यात परिणामकारक ठरावी, याबद्दल 'अंनिस' विचारमंथन करू लागली. अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यातून व्यापक परिवर्तनाच्या मूलभूत मुद्द्यावर कार्य केल्यास समाजजीवनाला खरे योगदान

मिळेल, या दिशेने डॉक्टरांचे प्रयत्न सुरू होते. 'अंनिस' धर्मचिकित्सा करत असल्यामुळे ही संघटना धर्मविरोधी आहे, हा शिक्का बसत होता. त्यामुळे डॉक्टरांना व समितीला भरपूर अडचणींचा सामना करावा लागला. धर्माचे पालन व्यक्तिगत पातळीवर चालेल; मात्र सार्वजनिक जीवनात नको, ही समितीची भूमिका होती. समाजाचे प्रबोधन व कार्यकर्त्यांचे प्रत्यक्ष आचरण यातून ते साध्य होईल, असेही डॉक्टरांना वाटत होते.

त्यासाठी डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली 'अंनिस' अनेक आघाड्यांवर संघर्ष करत होती. चमत्कार, भूत, भानामती, स्थळमहात्म्य, अंगात येणे, संमोहन, वास्तुशास्त्र, ताईत-गंडेदोरे, जन्मकुंडली, फलजोतिष, परामानसशास्त्र, पर्यायी उपचारपद्धती, आत्मा, पुनर्जन्म, प्लँचेट, दैववाद, नवस, देव-देवी कृपा इत्यादीबद्दल 'अंनिस' व्यापक प्रमाणात प्रबोधन करू लागली. त्यामुळे जनमानसात 'अंनिस'ची एक वेगळी प्रतिमा उभी राहिली. 'अंनिस' वैज्ञानिक दृष्टिकोनाची महत्ता पटवून देऊ लागली. वैज्ञानिक जाणिवा प्रकल्प, विज्ञानबोध वाहिनी, फिरते नभांगण इत्यादीतून शाळांना/गावांना भेटी देऊन विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्याचा प्रयत्न केला. सर्पमित्राचे महत्त्व पटवून देण्यासाठी सर्पयात्रा काढली. पर्यावरणपूरक सण-उत्सवांचा पुरस्कार केला. महिलांचे प्रश्न हाती घेतले. त्यामुळे 'अंनिस'मध्ये महिला सामील झाल्या. महात्मा फुले यांनी चालू केलेल्या सत्यशोधकी विवाह पद्धतीचा पुरस्कार केला. महिलांच्या अंगात देवी-भुतांचा संचार होणे हा एक मानसिक आजार आहे, हे पटवून देण्याचा प्रयत्न केला. 'विवेकवाहिनी'च्या माध्यमातून कॉलेजात शिकणाऱ्या तरुण-तरुणींच्यांत विवेकी विचारांचे भान रुजविण्यासाठी 'विवेकवाहिनी' मोहीम राज्यभर राबविली. महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलन कायदा पास व्हावा, यासाठी सुमारे १८ वर्षे पाठपुरावा केला. त्यासाठी रक्ताची सही, डोळ्यांवर पट्टी, थोबाडीत मारून घेणे, निषेध मोर्चा इत्यादी उपक्रम राबविले. (शेवटी डॉक्टरांच्या मृत्युपश्चात हा कायदा पास झाला). व्यसनमुक्तीसाठी डॉक्टरांनी 'परिवर्तन' या संस्थेची स्थापना करून हजारोंना व्यसनमुक्त केले.आघाडीच्या नाट्यकलाकारांचा संच घेऊन नाटकाचे प्रयोग करण्यासाठी महाराष्ट्रभर फिरले व त्या नाटकांतून मिळालेल्या पैशांतून 'सामाजिक कृतज्ञता निधी' उभारला व या कायमच्या निधीतून सामाजिक संघटनांतील क्रियाशील कार्यकर्त्यांना अर्थसहाय्य केले. 'साधना' साप्ताहिकाची धुरा संभाळत मानवी मूल्यांचे प्रबोधन करू लागले. अंधश्रद्धा निर्मूलन या विषयावर पुस्तकं लिहिली. असे एक ना दोन, आपल्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वातून या समाजाला त्यांनी भरभरून दिले. डॉक्टरांनीच एके ठिकाणी उल्लेख केल्याप्रमाणे अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य हे एका वाक्यात सांगायचे तर 'मूल्यपरिवर्तनाचा कृतिशील संवाद आहे.'अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य हे एका प्रकारे समाजघटकांना परिवर्तनाच्या प्रक्रियेत खेचण्याचे प्रवेशद्वार आहे. या प्रवेशद्वारातून आलेल्या व्यक्तींच्या जाणिवा परिवर्तनासाठी सक्षम बनावयात म्हणून त्यांना विचार व व्यवहार द्यावा लागतो. ही परिवर्तनाची जाणीवच मानवी मूल्ये रुजवू शकते. डॉक्टर शेवटच्या क्षणापर्यंत या मूल्यांसाठी झगडत होते, असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही.

अशा या थोर मानवतावाद्याची निर्घृण हत्या करून मारेकऱ्यांनी या समाजाची फार मोठी हानी केली. त्यांच्या मृत्यूनंतर जगभरातील माध्यमांनी शोक व्यक्त केला. मराठी व इंग्रजी वृत्तपत्रांतील मथळ्यांवर ओझरती नजर टाकली तरी या मानवतावाद्याचे थोरपण कुणाच्याही लक्षात येईल. उदा : उजेडावर घाला (सकाळ), देव न मानणारा 'देवमाणूस' (विश्वसह्याद्री), प्रबोधनकर्त्याचा खून (लोकमत), विवेकाची हत्या (महाराष्ट्र टाइम्स) बुद्धिवादावर घाला (केसरी), अंधश्रद्धेविरुद्ध उभा ठाकलेला संयमी लढवय्या (पुढारी), Battling Superstition, Indian paid with his life (The New York Times), Indian Scientists decry killing of Anti-Superstition activist (The Washington Post), Indian Rationalist Shot Dead (Wall Street Journal), Narendra Dabholkar, fighter against superstition (The Economist), Indian Anti-superstition Activist shot dead (The Guardian and BBC) Indian Anti-superstition campaigner killed by gunmen (The Dawn). अनेक मान्यवरांनीसुद्धा त्यांच्या अकाली मृत्यूबद्दल शोक व्यक्त केला.

डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी मानवतावादी म्हणून स्वतःचा जीव देऊन किंमत चुकविली, असे आता म्हणता येईल.

**लेखक संपर्क** : ९५०३३ ३४८९५

---

**संपादकीय...** (पान नं. ३ वरून)

जडीबुटी, देवभक्ती, देशप्रेम आणि तथाकथित धर्माचरण यावर आहे आणि या सगळ्याला विरोध करणाऱ्यांना देशद्रोही, धर्मद्रोही ठरवत खटले भरले जात आहेत. अशा या पार्श्वभूमीवर डॉ. दाभोलकरांचा ८ वा स्मृतिदिन येत आहे. त्यांच्या खुनामागच्या सूत्रधारापर्यंत चौकशी यंत्रणा अजूनही पोहोचू शकलेल्या नाहीत; पण खून कोणा व्यक्तीने केला आहे, याला तसा मर्यादित अर्थ आहे. ज्या धर्मांध विचारसरणीतून हा खून झाला आहे, तीच या खुनामागची सूत्रधार आहे. तिचा पराभव करण्यासाठी संघर्ष करत राहणे, हेच डॉ. दाभोलकरांचा खऱ्या अर्थाने वारसा पुढे चालविणे आहे.

माणूस मारला तरी त्याचे विचार मरत नाहीत, हे तर खरेच आहे. तो विचारसंघर्षाचा वारसा पुढे प्रवाहित होत राहतोच. पण अशा विचारवंत कार्यकर्त्याच्या जाण्याने त्या विचारांच्या, कार्याच्या विकासाला मर्यादा येतातच. नवनव्या आव्हानांना तोंड देण्यासाठी आपल्या सर्जनशीलतेने समाजाला कार्यक्रम आणि ऊर्जा देणारी शक्ती क्षीण करणे हाच अशा विचारवंतांचा खून करण्यामागे सनातन्यांचा हेतू असतो; पण त्यांचा हा हेतू सफल होऊ न देणे व आजच्या आव्हानांवर मात करण्यासाठी सर्जनशीलपणे डॉ. दाभोलकरांचे विचार व संघर्षशील कार्य विकसित करत नव्या तडफेने संघर्षासाठी उभे राहणे, हीच डॉ. दाभोलकरांना कृतिशील आदरांजली असेल.


◆◆

□

प्रा. प. रा. आर्डे

# ब्रुनो ते दाभोलकर

२० ऑगस्ट हा डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचा स्मृतिदिन. महाराष्ट्रात धर्मचिकित्सा, विचारस्वातंत्र्य आणि बुद्धिप्रामाण्य यांचा जोरदार पुरस्कार दाभोलकरांनी केला. भारतात सध्याच्या काळात जर युरोपमधल्या विज्ञानपूर्व काळातील धर्मपीठासारखी ताकद अस्तित्वात असती, तर या आंधळ्या धर्मवाद्यांनी दाभोलकरांनासुद्धा धर्मपीठासमोर खटला भरून मृत्युदंड दिला असता. संविधानाद्वारे भारतातील प्रत्येक नागरिकाला विचारस्वातंत्र्याचा अधिकार मिळाला. याच विचारस्वातंत्र्याचा उपयोग दाभोलकर समाजातील धार्मिक आणि अघोरी अंधश्रद्धा यांच्या विरोधात करत होते. म्हणूनच समोर लढता येत नाही किंवा कायदेशीर मार्गांनी दाभोलकरांना निष्प्रभ करता येत नाही म्हणून धर्मांधांनी छुप्या पद्धतीने दाभोलकरांना पाठीमागून गोळ्या घातल्या, म्हणजे अजूनही छुप्या पद्धतीने धर्माची दहशत चालूच आहे.




रानटी अवस्थेतून बाहेर पडत असताना आणि टोळीयुद्धाला पर्याय म्हणून माणसानं हळूहळू नद्यांकाठी स्थिर होण्याचा प्रयत्न केला. रानटी अवस्थेतील हिंसाचाराच्या अतिरेकाने शांततामय जीवनाची ओढ माणसाला लागणे स्वाभाविक आहे. यासाठी जगाच्या पाठीवर विविध धर्मांची निर्मिती झाली. धर्मप्रेषितांनी आपापल्या समाजाला शांतीचा व नैतिक आचरणाचा संदेश दिला. धर्माचा प्रसार करण्यासाठी पुरोहितशाही नावाचा वर्ग उदयाला आला. पुरोहितशाहीने धर्माचा उपयोग सामाजिक जीवनाचे नियमन करण्यासाठी केला; पण आपला प्रभाव आणि वचक समाजावर अबाधित राहावा म्हणून विविध प्रकारच्या धार्मिक गैरसमजुती आणि अंधश्रद्धा निर्माण केल्या. युरोपमध्ये इटली देशात रोम येथे धर्मपीठ स्थापन झाले. त्यांचा धर्मगुरू म्हणजे पोप. पोप आणि त्याच्या हातचलाखी धर्माज्ञांचे नियमन करणारी शक्ती युरोप खंडात निर्माण झाली आणि यातूनच अनर्थ घडत गेले. युरोप खंडात या अनार्थाचा बळी ठरला लिओनार्दो ब्रुनो. त्याच्यानंतर गॅलिलिओ हा सुद्धा धर्मपीठाचा बळी ठरला. ब्रुनोला खांबाला बांधून जाळण्याची क्रूर शिक्षा धर्मपीठाने दिली, तर गॅलिलिओला पाखंडी म्हणून आजन्म कारावासात राहण्याची शिक्षा धर्मपीठाने दिली. या शिक्षा त्यांना देण्याचं कारण काय होतं? कारण होतं, त्यांचं विचारस्वातंत्र्य आणि बुद्धिप्रामाण्यवाद! धर्माने मान्य केलेल्या विश्वरचनेच्या कल्पनांबद्दल ब्रुनोने आणि गॅलिलिओने शंका उपस्थित केल्या म्हणून त्यांना पाखंडी ठरविण्यात आले.

२० ऑगस्ट हा डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचा स्मृतिदिन. महाराष्ट्रात धर्मचिकित्सा, विचारस्वातंत्र्य आणि बुद्धिप्रामाण्य यांचा जोरदार पुरस्कार दाभोलकरांनी केला. भारतात सध्याच्या काळात जर युरोपमधल्या विज्ञानपूर्व काळातील धर्मपीठासारखी ताकद अस्तित्वात असती, तर या आंधळ्या धर्मवाद्यांनी दाभोलकरांना सुद्धा धर्मपीठासमोर खटला भरून मृत्युदंड दिला असता. संविधानाद्वारे भारतातील प्रत्येक नागरिकाला विचारस्वातंत्र्याचा अधिकार मिळाला. याच विचारस्वातंत्र्याचा उपयोग दाभोलकर समाजातील धार्मिक आणि अघोरी अंधश्रद्धा यांच्या विरोधात करत होते. म्हणूनच समोर लढता येत नाही किंवा कायदेशीर मार्गांनी दाभोलकरांना निष्प्रभ करता येत नाही म्हणून धर्मांधांनी छुप्या पद्धतीने दाभोलकरांना पाठीमागून गोळ्या घातल्या, म्हणजे अजूनही छुप्या पद्धतीने धर्माची दहशत चालूच आहे.

श्रद्धेला प्रश्न विचारूनच मानवी संस्कृती प्रगत होत गेली. अनेक गैरसमजुती गळून पडल्या. राजेशाही, हुकुमशाही अशा राज्यसत्तांतील तोटे लक्षात येऊन बहुतेक ठिकाणी जगामध्ये लोकशाही राज्यपद्धती अस्तित्वात आली. याची सुरुवात १७८९ साली फ्रेंच राज्यक्रांतीने झाली. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्ये मानणाऱ्या राजसत्ता अस्तित्वात आल्या. अशा उदारमतवादी विचारसरणीतून जगाच्या पाठीवरील बहुतेक देशांत अंधारातून प्रकाशाकडे सामाजिक वाटचाल सुरू होती. भारतातही स्वातंत्र्य,

समता आणि बंधुता या मूल्यांचा, लोकशाही प्रणालीचा स्वीकार झाला आहे; पण वास्तव काय आहे?

मध्य-पूर्वेत धार्मिक अतिरेकी संघटनांनी हैदोस घातला आहे. धर्माच्या नावावर विविध गटांमध्ये संघर्ष सुरू आहे. तालिबान, अल् कायदा आणि आयसिस अशा धार्मिक अतिरेकी संघटना प्रबळ होत चालल्या आहेत. धार्मिक वर्चस्वाचे पुनरुज्जीवन अशा संघटनांच्या माध्यमातून सुरू झालं आहे. भारत घटनेनुसार धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे. पण गेल्या काही वर्षांत भारत हे धर्मराष्ट्र करण्याचा प्रयत्न हिंदुत्ववादी मंडळींनी चालवला आहे. प्रकाशाकडून अंधाराकडे वाटचाल सुरू आहे की काय, अशी शंका येते. धर्माच्या आणि जातीच्या नावावर सामाजिक अन्यायाच्या घटना आपल्या देशात घडू लागल्या आहेत. संस्कृतिस्वातंत्र्याचे प्राणपणाने रक्षण व्हायला हवे. म्हणूनच दाभोलकरांच्या स्मरणदिनानिमित्त विचारस्वातंत्र्यासाठी बलिदान दिलेल्या आणि धर्माच्या सामर्थ्याविरुद्ध उभ्या ठाकलेल्या ब्रुनो आणि गॅलिलिओ यांच्या कार्याचा परिचय करून घेणे उचित होईल.

### ब्रुनोचे हौतात्म्य

ब्रुनो हा एका सैनिकाचा मुलगा. इटलीमधील नोलेनो या नेपल्स शहराजवळील गावात तो १५४८ साली जन्मला. १५६२ मध्ये ब्रुनो नेपल्सला गेला. तेथे त्याला मानव्यशास्त्र, तर्कशास्त्र आणि डायलेक्टिक्स (युक्तिवादशास्त्र) याचा अभ्यास करायचा होता. १५६५ मध्ये नेपल्समधील धार्मिक शिक्षण देणाऱ्या एका कॅथॉलिक संस्थेमध्ये तो दाखल झाला; पण तेथे तो आपली स्वतंत्र धार्मिक मते व्यक्त करी. हा काही वेगळंच बोलतो म्हणून त्याच्यावर पाखंडीपणाचाही संशय घेण्यात आला होता, तरीसुद्धा १५७२ मध्ये त्याला धर्मगुरूचे पद देण्यात आले. धार्मिक शिक्षणासाठी त्याला कॉन्व्हेंटमध्ये पाठवण्यात आले. तीन वर्षांचा कोर्स पूर्ण केल्यावर ब्रुनो आपली धार्मिक मते उलट निर्भयपणे मांडू लागला. येशू ख्रिस्ताच्या दैवी स्वरुपाबद्दल तो उघडपणे बोलू लागला. तेव्हा त्याच्या विरुद्ध पाखंडी म्हणून खटला भरण्याचा प्रयत्न झाला. वेळीच सावधान होऊन ब्रुनो रोमला गेला. इथून पुढे त्याचा वनवास सुरू झाला. पाखंडी ठरवण्याच्या भीतीने तो उत्तर इटलीत जीनिव्हाला गेला. तेथे त्याने प्रूफरीडिंगचे काम करून चरितार्थ चालवला. ब्रुनोचं वैशिष्ट्य असं की, आपल्याला न पटलेल्या विचारांच्या बाबतीत तो निर्भयपणे आपले मत व्यक्त करी. खरंतर त्याला धर्मगुरू केल्यावर प्रचलित कॅथॉलिक धर्माचा उदो-उदो करीत त्याला मानाने जीवन जगता आले असते; पण बुद्धीला जे पटत नाही, त्याचा स्वीकार न करता तो सत्याचा पुरस्कर्ता राहिला. जीनिव्हामध्ये त्याने प्रोटेस्टंट पंथाच्या लोकांशी जवळीक केली; पण ही मंडळीसुद्धा कॅथॉलिक विचारसरणीपेक्षा फारशी वेगळी नव्हती; पण प्रोटेस्टंट प्राध्यापकाच्या विरोधात भाष्य केल्यामुळे ब्रुनोला अटक झाली आणि त्याला जीनिव्हा सोडण्याचा हुकूम मिळाला.

ब्रुनो आता फ्रान्समध्ये गेला. फ्रान्समध्ये राजा तिसरा हेन्री याच्याशी त्याने जुळवून घेतले. हेन्रीने त्याला रॉयल लेक्चरर म्हणून नेमणूक दिली. या काळात त्याने वास्तवसृष्टीचे सखोल ज्ञान कसे मिळवता येईल, यावर ग्रंथ प्रसिद्ध केला. त्याचबरोबर त्या काळच्या समाजात असणाऱ्या नैतिक आणि सामाजिक भ्रष्टाचारावरही जोरदार टीका करणारे पुस्तक लिहिले. १५७३ मध्ये ब्रुनो लंडनला गेला. हेन्रीनेच त्याला लंडनला पाठविले. इंग्लंडमधील ऑक्सफर्ड विद्यापीठात त्याने कोपर्निकसच्या सूर्यकेंद्री सिद्धांताचे समर्थन केले; पण ऑक्सफर्डमधील विचारवंतांशी न जुळल्यामुळे तो परत लंडनला गेला आणि फ्रान्सच्या राजदूताची मदत घेऊन त्याने पहिल्या एलिझाबेथच्या दरबारात प्रवेश मिळवला.

### विश्वरचनेची कल्पना

लंडनमध्ये असतानाच ब्रुनोने त्याच्या तत्त्वज्ञानाची रचना केली. त्यातील तीन रचना विश्वाच्या स्वरुपाबद्दल, तर राहिलेल्या तीन नैतिक विषयावर आहेत. ब्रुनोने आपल्या या नव्या संशोधनाद्वारे कोपर्निकसच्या सूर्यकेंद्री सिद्धांताला मान्यता दिली. एवढंच नव्हे, तर त्याने विश्व हे अमर्याद आहे आणि त्यात आपल्या सूर्यमालेसारख्या अनेक रचना अस्तित्वात आहेत, अशी क्रांतिकारी कल्पना मांडली. त्याचा समकालीन गॅलिलिओच्या मताप्रमाणे खगोलाची रचना मान्य केली पाहिजे; बायबलप्रमाणे नव्हे. 'बायबलनुसार नैतिक शिकवण मान्य करायला हरकत नाही,' असं त्याचं मत होतं. ॲरिस्टॉटलच्या खगोलविचारानुसार रचना आणि पदार्थाचे स्वरूप यावर ब्रुनोने जोरदार टीका केली आणि विश्वरचना आणि पदार्थ याबद्दल आपली स्वतंत्र मते व्यक्त केली.

नैतिक प्रश्नाबाबत लिहिलेल्या पहिल्या ग्रंथात ब्रुनोने त्याकाळी प्रचलित असलेल्या अंधश्रद्धा आणि वर्तनदोष यावर उपरोधिक भाषेत जोरदार टीका केली आहे. त्याला ख्रिश्चन नीतिशास्त्र मान्यच नव्हते.

१५८५ मध्ये ब्रुनो पॅरिसला परतला. त्यावेळी राजकीय वातावरण बदलले होते. पॅरिसमध्ये कॅथॉलिक विचारांवर हल्ला चढवित ॲरिस्टॉटलवर तो उघडपणे टीका करू लागला; पण पॅरिसमधील नव्या राज्यकर्त्यांनी त्याला दोषी ठरवत पॅरिस सोडण्यास भाग पाडले. ब्रुनो जर्मनीत गेला आणि जर्मनीतील विविध विद्यापीठांतून तो आपले विचार मांडू लागला. आपल्या व्याख्यानातून त्याने स्वत:ची धर्मकल्पना मांडली. वादसंवाद आणि परस्परांना समजून घेणे यावर आधारित सर्व धर्मांतील लोकांनी शांततामय सहजीवन जगले पाहिजे, असा त्याचा धर्मविचार होता; पण हा विचार चर्चला कसा मान्य होणार?

१५९१ मध्ये ब्रुनो इटलीला परतला. व्हेनिस शहरात तो राहू लागला. व्हेनिसमधील अमीर-उमरावांच्या बरोबर आपले नवे तत्त्वज्ञान आणि विचार याची चर्चा करीत असतानाच त्याचे धर्मविषयक आणि ॲरिस्टॉटलविषयक विचार न पटल्याने ब्रुनोला पाखंडी म्हणून घोषित करण्यात आले. मे १५९२ मध्ये व्हेनिसच्या धार्मिक कोर्टापुढे त्याला खेचण्यात आले. त्याला अटक करून

खटला चालवण्यात आला. खटल्याचा पुढचा भाग म्हणून रोम येथील धर्मपीठाच्या तुरुंगामध्ये त्याला हलविण्यात आले. आपल्या बचावाच्या युक्तिवादात ब्रुनोने, 'आपणास धार्मिक गोष्टींविषयी अजिबात रस नाही; पण तत्त्वज्ञानात्मक माझ्या विचारावर मी ठाम आहे,' असा प्रतिवाद केला; पण धर्मपीठाच्या कोर्टाला त्याचा युक्तिवाद अमान्य झाला. कोर्टाने त्याने मांडलेले सर्व विचार आणि तत्त्वज्ञान मागे घ्यावेत, असा हुकूम दिला. ब्रुनोने यावर आपले विचार ख्रिश्चन देवकल्पना आणि विश्वनिर्मिती याच्याशी विसंगत नाहीत, असा युक्तिवाद केला. धर्मपीठाने त्याचा सगळा युक्तिवाद अमान्य केला आणि माघार घेण्याची विनंती केली. 'पण मी माघार घेण्यासारखं काहीही केलेलं नाही,' असा ब्रुनोने प्रतिवाद केल्यावर पोपने त्याला शिक्षापात्र पाखंडी म्हणून घोषित केले. ८ फेब्रुवारी १६०० मध्ये त्याचे मृत्युविधान जेव्हा त्याला वाचून दाखविण्यात आले, तेव्हा न्यायाधीशाकडे पाहून ब्रुनो उद्‌गारला, ''ही शिक्षा स्वीकारताना मला जेवढी भीती वाटेल, त्यापेक्षा ही शिक्षा देताना तुम्ही जास्त घाबरला असाल!'' यानंतर लगेचच त्याला वधस्थानी नेण्यात आले आणि त्याच्या तोंडात बोळा कोंबून त्याला खांबाला बांधून जिवंत जाळण्यात आले.

**ब्रुनोच्या विचारांचा सामाजिक प्रभाव**

ब्रुनोने मांडलेल्या विचारांचा आणि तत्त्वज्ञानाचा १७ व्या शतकातील वैज्ञानिक आणि तत्त्वज्ञ यांच्यावर मोठा प्रभाव झाला. १८ व्या शतकातील आधुनिक तत्त्वज्ञांनी त्याच्या विचाराला मान्यता दिली आहे. विचारस्वातंत्र्याचा पुरस्कर्ता म्हणून ब्रुनोमुळे १९ व्या शतकातील उदारमतवादी चळवळीला स्फूर्ती मिळाली. ब्रुनोने विश्वरचनेबद्दल मांडलेले विचार आधुनिक विज्ञानाने सिद्ध केले आहेत. 'आधुनिक मानवतावादी विचारसरणीला योग्य असे नैतिक विचार हे धार्मिक नैतिकतेपेक्षा श्रेष्ठ आहेत,' हा ब्रुनोचा विचार आता मानवतावादी विचारवंतांना मान्य झाला आहे. धार्मिक आणि वैचारिक सहनशीलता किंवा सहिष्णुता हा ब्रुनोचा विचार उदारमतवादी विचारवंतांवर प्रभाव पाडून गेला आहे. थोडक्यात, ब्रुनो हा आधुनिक सांस्कृतिक जगाचा अद्‌भुत उद्‌गाता ठरला आहे.

**धार्मिक अत्याचाराचा दुसरा बळी : गॅलिलिओ**

इ. स. १६०० मध्ये ब्रुनोला देहांताची शिक्षा झाली; तर गॅलिलिओला ख्रिस्ती धर्मपीठाने १६३३ ला पाखंडी म्हणून नजरकैदेची शिक्षा दिली. समाजावर धर्माची निरंकुश सत्ता कायम राहावी, असा तो काळ होता. धर्मप्रेषित आणि धर्मग्रंथ यांच्या पलिकडे ज्ञान नाही, धर्मवचनाला आव्हान देणे म्हणजे धर्माशी प्रतारणा असा धाक त्या काळात प्रभावी होता; पण या धाकाला न जुमानता सत्याचा शोध घेण्याचा धाडसी प्रयत्न या दोघांनी केला. गॅलिलिओवर धर्मपीठाने खटला का भरला, हे समजून घेण्याअगोदर त्याच्या चरित्राचे आणि वैज्ञानिक संशोधनाचे सार समजून घ्यायला हवे.

गॅलिलिओचा जन्म १५ फेब्रुवारी १५६४ मध्ये झाला. त्याचे वडील संगीतकार होते. वडिलांना गॅलिलिओने डॉक्टर व्हावे, असे वाटत होते; पण त्याला गणिताची आवड असल्यामुळे पदवी न घेताच त्याने विद्यापीठ सोडले आणि खाजगी शिकवण्या घेऊन तो पोट भरू लागला. एक उमराव मित्र मार्क्विस याच्या मदतीने त्याला पिसा विद्यापीठात गणिताच्या प्राध्यापकाची नोकरी मिळाली.

पिसा येथील 'त्या' प्रसिद्ध मनोऱ्याचा प्रयोग गॅलिलिओने केला. या प्रयोगात जड आणि हलक्या वस्तू एकाच वेळी खाली पडतात, हे त्याने दाखवून दिले. ख्रिस्ती धर्मपीठानं ग्रीक काळात होऊन गेलेल्या प्रख्यात तत्त्वज्ञ ॲरिस्टॉटल याचे विज्ञान आणि त्याची विश्वरचनेची कल्पना यांना मान्यता दिली होती. ॲरिस्टॉटलच्या मताप्रमाणे पृथ्वी हा विश्वाचा केंद्रबिंदू आहे. हे विश्व पृथ्वीवरील माणसासाठीच देवाने निर्माण केले, ही कल्पना धर्मपीठाला सोयीची होती आणि त्यामुळे ॲरिस्टॉटलची मते त्यांनी स्वीकारली होती. ॲरिस्टॉटलच्या मते पृथ्वीवरील पदार्थ हे करप्ट आहेत; पण आकाशातील ग्रह-तारे हे पूर्ण स्वरुपाचे गुळगुळीत आणि तेजोमय आहेत. त्यांच्यात बदल होत नाही. चंद्राचा पृष्ठभाग गुळगुळीत आहे. आपल्याला आकाशात जेवढे तारे दिसतात, तेवढीच देवाची निर्मिती आहे.

विज्ञानपूर्व काळात सृष्टीरचना आणि इतर बाबतीत नवविचार मांडणाऱ्या तत्त्वज्ञांना 'आर्मचेअर फिलॉसॉफर' असं नाव आहे. केवळ तर्काने आणि कल्पनारम्यतेने हे तत्त्वज्ञ विश्वाच्या स्वरुपाबद्दल आपले विचार मांडत. ॲरिस्टॉटल हा बुद्धिमान असला, तरी असाच 'आर्मचेअर फिलॉसॉफर' होता. पडताळा न घेता त्याने मांडलेल्या अनेक कल्पना चुकीच्या असू शकतात, हे पहिल्यांदा गॅलिलिओने दाखवून दिले. याबाबत बर्ट्रांड रसेल या तत्त्वज्ञाने ॲरिस्टॉटलच्या एका विधानाचे मजेशीर उदाहरण दिले आहे - पुरुषांपेक्षा बायकांना दात कमी असतात, हे ॲरिस्टॉटलचे विधान अगदी पंधराव्या शतकापर्यंत मेडिकलच्या विद्यार्थ्यांना शिकवले जात होते; पण शरीररचनाशास्त्राचा वैज्ञानिक अभ्यास आल्यावर हे विधान खोटे आहे, असे सिद्ध झाले. व्यक्ती कितीही मोठी असो, ती चुकू शकते. याचा पुरावा म्हणून गॅलिलिओने ॲरिस्टॉटलच्या मताला पहिला तडा दिला. ॲरिस्टॉटलच्या तर्कानुसार जड पदार्थ लवकर जमिनीवर पडेल, असे अनुमान निघत होते. प्रत्यक्षात हलका आणि जड पदार्थ एकाच वेळी जमिनीवर पडतात, हे गॅलिलिओने दाखवून दिले. हा प्रयोग करताना तेथे मोठ्या संख्येने लोक उभे होते. १७९ फूट उंचीवरून एकाचवेळी टाकलेले कमी-जास्त वजनाचे दोन तोफेचे गोळे एकाच वेळी जमिनीवर पडले, तरी लोक त्याबद्दल बोलायला तयार झाले नाहीत. ॲरिस्टॉटल खोटा कसा असेल? प्रचलित समजुतीचा केवढा जबरदस्त प्रभाव लोकांवर असतो, याचा हा पुरावा.

पिसा विद्यापीठातील अधिकाऱ्यांबरोबर झालेल्या मतभेदांमुळे आणि मनोऱ्याच्या प्रयोगामुळे त्याची गणिताच्या प्राध्यापकाची नोकरी गेली. पण एका मित्राच्या मदतीमुळे त्याला

'पदुवा विद्यापीठा'त नोकरी मिळाली.

१६०४ साली गॅलिलिओला आकाशात एक नवीन तेजस्वी तारा दिसला. ॲरिस्टॉटलच्या मतानुसार आकाशातील ताऱ्यांची संख्या स्थिर आहे, हे तारे अमर आहेत. नवीन तारे जन्माला येत नाहीत; मग हा तारा कुठून आला? १६०९ साली गॅलिलिओने स्वत: तयार केलेल्या दुर्बिणीतून आकाशाचं निरीक्षण करताना ख्रिस्ती धर्मपीठाने स्वीकारलेल्या ॲरिस्टॉटलच्या अनेक कल्पनांना धक्के द्यायला सुरुवात केली. गॅलिलिओने या दुर्बिणीतून चंद्रावरचे डोंगर आणि खळगे बघितले. १६१० साली गुरू ग्रहाचे निरीक्षण करून त्याभोवती फिरणारे चार चंद्र शोधून काढले; म्हणजे चंद्र फक्त पृथ्वीलाच नाही, त्यामुळं पृथ्वी या विश्वात केंद्रस्थानी मानण्याचे कारण नाही, असे त्याचे मत झाले. याचबरोबर गॅलिलिओने शुक्राला कला होतात, हे दुर्बिणीतून तपासले. पृथ्वीप्रमाणेच शुक्र सूर्याभोवती फिरत असल्यामुळे हे घडते. याचा अर्थ पृथ्वी, शुक्र इत्यादी ग्रह सूर्याभोवती फिरत असावेत; म्हणजे पृथ्वी हा विश्वाचा केंद्रबिंदू नाही, तर सूर्य हा या विश्वाचे केंद्र आहे, या मताशी गॅलिलिओ आला. कोपर्निकसने मांडलेल्या सूर्यकेंद्री सिद्धांतास गॅलिलिओने पुरावा दिला.

याच्या पुढचं आयुष्य म्हणजे गॅलिलिओचा धर्मपीठाविरुद्धचा प्रदीर्घ लढाच होता. 'कोपर्निकस बरोबर आहे,' असं म्हटल्याबद्दल त्याला चर्चकडून अनेकदा तंबी मिळाली. गॅलिलिओचे मित्र पोपकडे समजूत काढायचे. असं बरीच वर्षं चाललं; पण शेवटी गॅलिलिओला पाखंडी ठरवण्यात आलेच. आपल्या संशोधनावर आधारित १६३२ साली गॅलिलिओने 'डायलॉग कन्सर्निंग टू दी चीफ वर्ल्ड सिस्टिम' हे पुस्तक प्रकाशित केलं. ते 'बेस्ट सेलर' झालं. या पुस्तकात संवादरुपात अप्रत्यक्षपणे ॲरिस्टॉटल आणि धर्मपीठ कसे चूक आहेत, हे दाखवलं होतं. यामुळे पोप अर्थातच खवळला. गॅलिलिओला रोममध्ये बोलावण्यात आलं. सहा महिन्यांच्या खटल्यानंतर २२ जून १६३३ रोजी जवळपास अंधत्व आलेल्या गॅलिलिओनं पुन्हा हार मानली. त्यानं तसं चक्क लिहून दिलं. त्यात असं म्हटलं होतं की, ''मी गॅलिलिओ, ७० वर्षांचा असून आपले गुडघे टेकून आपली माफी मागतो... सूर्याभोवती पृथ्वी फिरते, हा विचार पूर्णपणे चुकीचा असून त्याचा त्याग करतो... माझ्या चुकीबद्दल मला पश्चात्ताप होत आहे.'' पण न्यायालयातून बाहेर पडताना पुन्हा गॅलिलिओ तोंडातल्या तोंडात, 'पण खरंतर पृथ्वीच फिरते,' असं पुटपुटला. अशीही एक कथा आहे की, चर्चने त्या प्रकाशकांकडे त्या पुस्तकाच्या प्रती जप्त करण्यासाठी माणसं पाठवली; पण तोपर्यंत सगळ्या प्रती खपल्या होत्या.

आयुष्याच्या शेवटपर्यंत गॅलिलिओला नजरकैदेत राहावे लागले. शेवटी-शेवटी तो पूर्णपणे आंधळा झाला आणि ८ जानेवारी १६४२ रोजी त्याचे निधन झाले. गॅलिलिओच्या मृत्यूनंतर तब्बल ३२० वर्षांनी म्हणजे १९८२ साली 'सूर्य आणि पृथ्वी यांच्यापैकी कोण कुणाभोवती फिरतो,' याविषयीची जुनी केस चर्चमध्ये पुन्हा उभी राहिली. मग त्यावर १० वर्षे विचार, उलटसुलट वाद-प्रतिवाद झाले. शेवटी सगळे पुरावे बघून १९९२ साली एकदा कुठे पोप पॉल दुसरे यांनी, 'गॅलिलिओला चांगली वागणूक मिळाली नाही आणि पृथ्वीच सूर्याभोवती फिरते,' हे कबूल केलं. तेव्हा ते 'न्यूयॉर्क टाईम्स'च्या मथळ्यावर झळकलं होतं. त्या अगोदर तीन वर्षे; म्हणजे १९८९ साली झेप घेतलेलं 'गॅलिलिओ' नावाचं अंतराळयान १९९५ साली गुरुपर्यंत पोचलं, तेव्हा गॅलिलिओला विसाव्या शतकाने केलेला तो सलामच होता! गॅलिलिओच्याच दुर्बिणीने याच गुरूभोवती फिरणारे चार चंद्र बरोबर ३८५ वर्षांपूर्वी टिपले होते.

### धार्मिक अतिरेक अजून संपलेला नाही

विचारस्वातंत्र्य आणि बुद्धिप्रामाण्य यातून सत्यशोध होत असताना ब्रुनो, गॅलिलिओ; तसेच युरोप खंडातील प्रबोधनकाळाच्या प्रभावामुळे आपले विचार मांडू पाहणारे विचारवंत आणि हटवादी धर्म यांच्यातील संघर्ष हा पुढे चालूच राहिला. ख्रिस्ती धर्माला किंवा इतर कोणत्याही धर्माला विचारस्वातंत्र्याची भीती का वाटावी? धर्माचा मूळ उद्देश समाजाला नैतिक मूल्यांची शिकवण हा होता. त्यासाठी देवाच्या निर्मितीची आणि धाकाची गरज त्यांना वाटली असावी. आपला प्रभाव वाढल्याने धर्माने एक मोठी चूक केली. ती म्हणजे नैतिक शिकवणीबरोबरच निसर्गातील घडामोडींच्या संदर्भात स्वत:ची मते समाजावर लादली. सृष्टीतील घडामोडींचं सत्यज्ञान धर्माला नसल्यामुळे या घडामोडींना देवदेवता, भुतेखेते, विविध प्रकारचे सुष्टात्मे आणि दुष्टात्मे कारण आहेत, असे धर्म सांगू लागला. माणसाला विश्वाचे केंद्र मानून आणि तोच देवाचा सर्वांत लाडका आहे, असे समजून सृष्टीची रचना त्याच्यासाठीच आहे, यावर धर्माने शिक्कामोर्तब केले. यात भर म्हणून पाप-पुण्याच्या कल्पना पुरोहितांनी निर्माण केल्या. 'एखाद्या घरावर वीज का पडते, तर त्या घरातील लोकांनी पाप केले,' असे धर्म सांगू लागला. 'स्त्रियांना प्रसववेदना का होतात, तर ती देवाची आज्ञा आहे,' असे बायबलमध्ये लिहिले आहे. थोडक्यात, 'वीज का कडाडते तर तो देवाचा आसूड, भूकंप का होतो तर देव रागावला म्हणून, साथीचा रोग का आला, तर देवाची अवकृपा.' थोडक्यात, धर्माने सृष्टीचा चुकीचा कार्यकारणभाव मान्य केला होता. खरंतर आधुनिक विज्ञानाने हा कार्यकारणभाव अमान्य केला आहे. सृष्टीतील घडामोडी या विशिष्ट निसर्गनियमाने घडतात, त्यांचा मानवी इच्छेशी काहीही संबंध नाही. निसर्ग हा न-नैतिक आहे, त्याच्यातील घडामोडींचा मानवी सुख-दु:खाशी काहीही संबंध नाही, हा आधुनिक विज्ञानाचा निष्कर्ष आहे. या निष्कर्षाची सुरुवात ब्रुनो आणि गॅलिलिओ यांनी केली. सूर्यमालेसारख्या अनेक सूर्यमाला विश्वात आहेत. या ब्रुनोच्या कल्पनेने माणूस या विश्वाचा केंद्रबिंदू आहे, या धार्मिक कल्पनेला धक्का बसत होता. सूर्यमालेतील पृथ्वी हा एक ग्रह आहे, या गॅलिलिओने निरीक्षणातून मांडलेल्या सिद्धांतामुळे माणसाचे महत्त्व कमी झाले, अशी धर्माची चुकीची समजूत झाली असावी. खरंतर निसर्गरचना आणि विश्वातील घडामोडी याबाबतीत धर्माने बुरसटलेले विचार टाकून द्यावयास हवे होते; पण अहंकार

आणि हटवादीपणा यातून धर्म कडवाच राहिला आणि त्यातून विचारवंतांचा छळ करत राहिला.

युरोप खंडात प्रबोधनाच्या प्रभावाने आणि सत्य काय, याबाबत लोक निर्भयपणे प्रश्न विचारू लागल्याने गॅलिलिओनंतर धर्माची क्रूरता हळूहळू मावळू लागली, तरीसुद्धा बुद्धिचातुर्य आणि हटवादीपणा यातून आपला वचक समाजावर राहावा, यासाठी ख्रिस्ती धर्म कार्यरत राहिलाच. अनेक विचारवंत, 'आम्ही धार्मिक आहोत; पण देवाने आम्हाला बुद्धी दिल्यामुळे निसर्गाची रहस्ये शोधण्यात गैर काय?' हा विचार सामाजिक वर्तुळात मान्यता पावला. न्यूटन स्वत:ला धार्मिक माने. 'देवाने हे जग निर्माण केले; पण एकदा ती क्रिया पूर्ण झाल्यावर जगाच्या घडामोडीत तो हस्तक्षेप करीत नाही,' असे न्यूटनचे विधान आहे. न्यूटनने गॅलिलिओचा सृष्टीचा खरा कार्यकारणभाव जाणून घेण्याचा, निरीक्षण, गणिताचा वापर आणि प्रयोग यांची विज्ञानाच्या पद्धतीत भर घातली. गृहित मांडायचे, त्यातून तर्काने निष्कर्ष काढायचे आणि त्या निष्कर्षांचा पडताळा घ्यायचा, ही वैज्ञानिक पद्धतीची पुढची पायरी न्यूटनने पूर्ण केली. गतीचे तीन नियम आणि गुरुत्वाकर्षणाचा नियम यांच्या मदतीने ग्रह सूर्याभोवती कसे फिरतात, चंद्राचं पृथ्वीभोवती फिरणं, सूर्याच्या आणि चंद्राच्या गुरुत्वाकर्षणामुळे सागराला येणारी भरती-ओहोटी यांचं स्पष्टीकरण गणिताच्या सहाय्याने न्यूटननं दिलं. आपलं संशोधन त्यानं 'प्रिन्सिपिया' या प्रख्यात ग्रंथात लिहून ठेवलं आहे. गॅलिलिओने सुरू केलेली विज्ञानाची पद्धत न्यूटनने पूर्ण केली. हीच वैज्ञानिक क्रांती होय.

निसर्गाची रहस्ये शोधण्याची विज्ञानाची कळ माणसाला आता प्राप्त झाली आणि निसर्गाची अलिबाबाच्या गुहेतील सृष्टीरहस्ये मानवाला खुली झाली. विज्ञानाच्या पद्धतीचा वापर करून सृष्टीतील घडामोडींचे कार्यकारणभाव माणसाला आता कळू लागले. पदार्थाचं स्वरूप आणि पदार्थाची रुपांतरे रसायनविज्ञानाच्या मदतीने कळू लागली. व्हेसॅलियसने शरीररचनाशास्त्राचा अभ्यास केला. विल्यम हार्वेने शरीरात रक्ताभिसरण कसे होते, याचे स्पष्टीकरण दिले. चुंबकाचा शोध आणि फॅरेडेच्या संशोधनानं विजेची निर्मिती; तसेच वाफेचा शोध यातून माणसाला ऊर्जेची साधने हस्तगत झाली. पुढे, १९ व्या आणि विसाव्या शतकात रडार, रेडिओ, टेलिव्हिजन, महाकाय दुर्बिणी ही इलेक्ट्रॉनिक्सची साधने मानवाच्या सेवेला रूजू झाली. या भौतिक साधनांबरोबरच आइन्स्टाइन, व्हॉईल, नारळीकर, स्टिफन हॉकिंग यांच्या संशोधनातून विश्वाच्या रचनेची माहिती मिळू लागली. गंमत म्हणजे ब्रुनोने कल्पिलेल्या विश्वरचनेशी आधुनिक विज्ञानाने सिद्ध केलेली विश्वरचना मिळती-जुळती आहे. 'सत्य न मरते दळभारे' याची प्रचीती जगाला आली. ब्रुनो आणि गॅलिलिओ यांच्या हौतात्म्याला सलाम...!

फ्रान्सच्या राज्यक्रांतीतून स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूल्ये जगाने स्वीकारली. युरोपातील सर्व राष्ट्रे आणि उत्तर अमेरिका येथे लोकशाही शासनसंस्था स्थापन झाल्या. विचारस्वातंत्र्याला महत्त्व प्राप्त झाले, तरीसुद्धा धर्माची टूरटूर चालूच होती. डार्विनच्या उत्क्रांतीवादाला धार्मिकांनी प्रखर विरोध केला होता. युरोपात डॉ. सिप्सन यांनी स्त्रियांची प्रसूतिवेदना कमी करण्यासाठी क्लोरोफॉर्मचा वापर सुरू केला. त्यालाही धर्मगुरूंनी प्रखर विरोध केला होता. व्हेसॅलियसने शरीराची चिरफाड केली, हे देवाच्या इच्छेविरुद्ध झाले म्हणून त्याला जेरूसलेमला जाऊन येशूची क्षमा मागण्याची शिक्षा करण्यात आली; पण लोकशाही मूल्यांचा प्रभाव युरोप-अमेरिकेत मान्य असल्यामुळे धर्माचा प्रभाव ओसरत चालला होता. चर्चमध्ये जाणाऱ्या नागरिकांचे प्रमाण कमी होत चालले आहे.

या पार्श्वभूमीवर पूर्वेकडील आशियाई राष्ट्रांत काय परिस्थिती आहे? भारतातील परिस्थिती काय आहे? १९४७ ला भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारत सरकारचे नेतृत्व पंडित नेहरूंच्याकडे आले. पंडित जवाहरलाल नेहरू हे वैज्ञानिक दृष्टिकोनाचे खंदे समर्थक होते. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन याच्या आधारे भारताची पुढची वाटचाल चालू राहावी, हे त्यांचे स्वप्न होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि अन्य सहकाऱ्यांच्या मदतीने त्यांनी भारताची राज्यघटना स्थापन केली. या राज्यघटनेद्वारे भारत 'सेक्युलर' (धर्मनिरपेक्ष) राष्ट्र बनले. 'सेक्युलर' म्हणजे भारतात कोणताही एक धर्म श्रेष्ठ नाही, प्रत्येक नागरिकाला आपापल्या धर्माप्रमाणे वागण्याचा हक्क आहे; पण सार्वजनिक शांतता आणि आरोग्य यांना धर्म धोक्यात आणत असेल, तर त्याला प्रतिबंध करण्याचा अधिकार घटनेला आहे. याचबरोबर अंधविश्वास आणि गैरसमजूत यासाठी धर्मचिकित्सा करण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन हवा, ही घटनेची भूमिका आहे.

आज भारतात वास्तव काय आहे? भारताचं 'सेक्युलर' रूप आणि वैज्ञानिक दृष्टिकोन याला आव्हान देणाऱ्या प्रतिगामी शक्ती भारतात प्रबळ होऊ पाहत आहेत. मंदिर की मस्जिद असा प्रश्न उकरून भारतात नवं धर्मयुद्ध घडलं. दोन धर्मांत द्वेष पसरवून सत्ता हाती घेण्यात हिंदुत्ववादी शक्ती सफल झाल्या आहेत. त्यांना आपला धर्म आणि त्यातील चाली-रीती सर्वश्रेष्ठ आहेत, असा उन्माद चढला आहे. धर्मनिरपेक्ष राष्ट्रांत वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अवलंब करून विविध धर्मांतील गैरसमजुती आणि अंधविश्वास या विरोधात प्रबोधन करणे, यात गैर काय?

भारतीय घटनेच्या अधिकारात आणि घटनेशी प्रतारणा न करता डॉ. नरेंद्र दाभोलकर महाराष्ट्रात अंधविश्वासाच्या विरोधात कार्य करीत होते. सर्व धर्मांतील अंधश्रद्धांच्या विरोधात त्यांची लढाई चालू होती. दाभोलकरांच्या प्रभावाने महाराष्ट्रातील समाज अंधविश्वासातून मुक्त होण्याचे धोरण स्वीकारीत होता. विचार, कृती आणि संघटन या तिन्ही पातळ्यांवर दाभोलकरांनी अंधविश्वासाविरोधात जोरदार संघर्ष उभा केला होता; पण सुधारणाच नको, जुनं ते सोनं, आम्ही श्रेष्ठ या विकारानं ग्रासलेल्या कडव्या धर्मांधांनी दाभोलकरांना ठार केलं. पुन्हा एकदा ब्रुनो आणि गॅलिलिओ यांच्याप्रमाणेच धर्माने घेतलेला दाभोलकरांचा हा


(पुढील मजकूर पान नं. २० वर)

□

विश्वनाथ अर्जुन साठे

अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ समाजातील विविध स्तरांत जशी खोलवर, सर्वदूर पसरत प्रभावशील होत आहे, तसतसा त्या चळवळीच्या वैचारिक मांडणीचा, तिच्या समाजावरील प्रभावाचा, उणिवांचा; सारांशाने चळवळीच्या जडणघडणीचा विविध अंगांनी वेध घेण्याची उत्सुकता अभ्यासकांना, संशोधकांना, कार्यकर्त्यांना भासू लागली आहे. त्यामुळे अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीवर संशोधन करून डॉक्टरेट मिळविण्यासाठी अनेक तरुण विद्यार्थी पुढे येत आहेत. त्यातीलच दोघांचे मनोगत डॉ. दाभोलकर स्मृती विशेषांकाच्या निमित्ताने आम्ही येथे देत आहोत.

# अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्रावर माझी पीएच.डी.




'माणसानं माणसाला समजून घेतलं पाहिजे. मानवी जीवन जगण्याचं मूल्यत्व समजलं पाहिजे,' इतकं चिंतनशील आणि विवेकी विधान ऐकत होतो. त्यादिवशी दाभोलकर सरांना कामगार सभागृह, आकुर्डी येथे प्रत्यक्ष पाहिलं, ऐकलं, अनुभवलं. परिवर्तनाचा विचार जगणाऱ्या व्यक्तीचं चळवळीशी असलेलं नातं किती घट्ट आणि निस्सीम असतं, हे मी त्यांच्या बेंबीच्या देठापासून येणाऱ्या वाणीवरून समजू शकलो. ते म्हणाले, ''या पृथ्वीतलावर प्राणी-पशूही जगतात. परंतु मानवाला विवेक आहे. जगताना तो समूहाने जगतो. हा विवेक हरवून मानव प्राणी-पशू होऊ नये आणि अत्याचारी बनू नये, अविवेकी होऊ नये. संतांचं हेच सांगणं आहे!'' इतक्या सोप्या आणि सरळ शब्दांत ते जगण्याचं तत्त्वज्ञान स्वभाषेत मांडत होते. सभागृह स्तब्ध होतं. त्यावेळी अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या स्मरणिकेचे प्रकाशन आणि 'मराठी साहित्यातील अंधश्रद्धा निर्मूलन' या विषयावरील विविध परिसंवादांचे आयोजन करण्यात आले होते. हे महाराष्ट्रातील पहिले अंधश्रद्धा निर्मूलन साहित्य संमेलन. मुंबई-पुणे रस्त्यावरील आकुर्डी येथील श्रमशक्ती भवन येथे ६ - ७ जुलै २०१३ रोजी झालेल्या संमेलनाची आठवण अजून ताजी आहे.

बोराडी, जिल्हा धुळे येथे अध्यापकीय शिक्षण घेत असताना महात्मा गांधी ग्रंथालयात अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्राचे कैक अंक वाचनातून गेले. त्याआधी वर्तमानपत्रांतून वाचत होतो, दूरदर्शनवरील प्रसारित झालेल्या बातम्यांमध्ये ऐकत होतो. अंधश्रद्धा, श्रद्धा, अज्ञान, शोषण, दैववाद, धर्म, जात, जातपंचायत, सामाजिक रूढी-परंपरा, हिंसाचार, बुवाबाजी, अन्यायी घटनांची मीमांसा, विज्ञान, साहित्य, कला, राजकारण, अर्थकारण, नीती, तत्त्वज्ञान आदी कैक विषयांवरील लेख आणि लेखकांना वाचता आलं. चळवळीची दिशा आणि व्यूह नुकतेच जाणवू लागले. इयत्ता पाचवीपासून गोष्टींच्या वाचनापासून वैचारिक वाचनापर्यंत हा प्रवास. त्यामुळे सॉक्रेटिस, ॲरिस्टॉटल, लेनिन, रुसो, व्हॉल्टेअर, मॉन्टेस्क्यू, कार्ल मार्क्स; तर भारतीय परिप्रेक्ष्यात चार्वाक, गौतम बुद्धांपासून ते कबीर, रहीम, चक्रधर, ज्ञानेश्वर, तुकाराम, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, मुक्ता साळवे, वस्ताद लहुजी साळवे, लोकहितवादी, महर्षी कर्वे, ताराबाई शिंदे, छत्रपती शाहू, गाडगेबाबा, डॉ. भीमराव आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, अण्णा भाऊ साठे, हमीद दलवाई, गोविंद पानसरे, एम. एम. कलबुर्गी, डॉ. नरेंद्र दाभोलकर... अशी एक वैचारिक शृंखलेची बांधणी कळत होती. वाचत होतो.

भाकरीच्या म्हणण्यापेक्षा ज्ञानाच्या शोधात पुणे शहरी आलो. भाकरी तर गावी ढोरं-शेळ्या राखून वा सालगड्याप्रमाणे शेण-गू-मूत काढूनपण मिळाली असती. तीन प्रश्न नेहमी सतावतात - ते म्हणजे, का जन्मलो? का जगायचं? अन् कशासाठी जगत आहे? या प्रश्नांनी गाव सुटलं. शिक्षणासाठी बोरडी आणि पुढे सरळ पुणे. पुण्यात आपलं असं जीवाचं कोणी नव्हतं. आकुर्डी स्टेशनवर दोन रात्री काढल्या. सकाळी स्टेशनवरून चालत-चालत कामाच्या शोधात निघालो. एका डॉक्टरांच्या केबिनमध्ये काम मिळेल का

म्हणून घुसलो. डॉक्टरकी अन् साप्ताहिकाचं ते ठिकाण. डॉ. बेरी यांच्याकडे कंपाउंडर-कम-ऑफिस बॉय-कम 'चाहूल नव्या समाजाची' या साप्ताहिकाचा पत्रकार म्हणून काम केले. या काळात पुण्याची माहिती करून घेत होतो. शहरात होणाऱ्या विविध कार्यक्रमांत हिंडू लागलो. बेरी हे कामगार, घरगुती कामं करणाऱ्या महिलांच्या चळवळीचे जाणते नेतृत्व. 'कविता लिहीत असतोस, कधी सांगितलं नाही.' अशात, 'एक संमेलन आहे, तू हजर राहा. बातमी कर!' या कारणाने या 'अंनिस'च्या संमेलनास उपस्थित राहू शकलो. इथं डॉ. दाभोलकर यांच्याशी भेटता आलं. सभागृहाच्या बाहेर पडल्यावर बोलता आलं. इथेच साहित्यिक उत्तम कांबळे सरांना भेटता आलं. एका कवितेवर त्यांची स्वाक्षरी घेता आली. अध्यापकीय शिक्षण घेत असताना तोडकी-मोडकी बातमी करण्याच्या अनुभवानं पुण्यात काम मिळवून दिलं होतं अन् चांगला विचारही.

पुढचं शिक्षण सुरूच होतं. ज्यासाठी शहरात आलो, ती गोष्ट खंड पडू द्यायची नव्हती. याअर्थी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागात मराठीमधून एम. ए. केलं. वाचनाचं मूल्य इथं समजू लागलं. मराठी विभागात शिक्षण घेत असताना डॉ. मनोहर जाधव, डॉ. प्रभाकर देसाई, डॉ. टिळक मॅडम, डॉ. तुकाराम रोंगटे, डॉ. सांगोलेकर, डॉ. अविनाश अवलगावकर, डॉ. आगळे आणि कार्यक्रमप्रसंगी साहित्यिक डॉ. नागनाथ कोतापल्ले, उत्तम कांबळे, रावसाहेब कसबे, डॉ. विलास खोले, डॉ. विश्वनाथ शिंदे यांना ऐकता आलं. त्यांचे मराठी साहित्यावरील विचार समजता आले. याअर्थी सांस्कृतिक संदर्भासहित सामाजिक विश्लेषण पडताळता आलं. वाचनाचा आवाका वाढवला. वाचनाशिवाय पर्याय नाही. कारण आमची पिढी जुन्या संघर्षातून पुढे आलेली आहे, शहरात स्थलांतरित झालेली आहे आणि अनुभव हेच शिक्षण तथा वाचन हेच मार्गदर्शन आहे, हे समजून गेलं होतं. 'नेट' परीक्षा पात्र केली. पुढील संशोधनाच्या शिक्षणासाठी अर्ज केला.

बा कबिराचे अभ्यासक. गेली पंचेचाळीस वर्षांचा कबीर तत्त्वज्ञानाचा त्यांचा अभ्यास. त्यामुळे घरचं वातावरण मुक्त आणि कोणत्याही शोषणाला बळी न पडलेलं. 'आपलं जीवन आपल्याला मनगटाच्या ताकदीवर ख्यालखुशाल निर्माण करता येतं,' ही बा ची शिकवण. 'जिवंत आहे तोपर्यंत जीवासाठी खा - मुक्त जगा, आयुष्याचा आनंद स्वाभिमानाच्या नीतीत आहे. परजीवांचा भेद करू नका, मेल्यावर जीव पुन्हा येत नाही. जिवंतपणी सन्मान करा. कोणत्याही जीवाची आबाळ होऊ नये. जीव अमूल्य आहे,' अशी ही वैचारिक ठेवण घेत 'मूठभर चावल घर पर फेके। कव्वा बाप बनायौ।।' ही कबिरांची शोषणाविरुद्धची भूमिका सगळ्यांच्या काळजात. घरात कोणत्याही देवा-धर्माचे, बिरुबा-हंदूबा, मरिआईचे मूर्तिपूजन, छायाचित्रे, पूजापाठ नसल्याने नशीब, श्रद्धा, उपासना, प्रारब्धभोग, त्याला जोडून येणारी शोषणाची यंत्रणा आपोआपच नाकारली गेलेली. याअर्थी समाजाचा रोष जाणवत होताच. प्रगल्भ जगण्याचं तत्त्व असणारी विचारसरणी आयुष्यात परिवर्तनाचा विचार पेरत होती. दहावी - बारावीनंतर आणि पुढे विद्यापीठीय शिक्षण घेताना विविध चळवळींचा परिचय होत गेला. समाज, साहित्य आणि वैविध्यपूर्ण विचारप्रवाहांची तोंडओळख होत गेली. आपल्या आयुष्याचा संघर्ष हा भाकरीपेक्षाही जीवसन्मानाचा आहे, स्वाभिमानाचा आहे, अन्याय्य शोषणाविरुद्ध लढण्याचा आहे. संशोधनासाठी निवडलेला 'अंधश्रद्धा निर्मूलनाच्या वार्तापत्राचा वाङ्मयीन अभ्यास' हा आपल्या जगण्या-मरण्यातला विषय.

'अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र - अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्रातील वैचारिक लेखन : एक अभ्यास' हा विषय निवडीमागे घरातील लहानपणापासूनचे मुक्त असणारे परिवर्तनशील वातावरण तर आहेच; परंतु समाजामध्ये हा प्रबोधनाचा प्रवाह अखंड पाझरणे सुरू असतानाही समाजाचे शोषण थांबत नाही. धर्म, राजकारण, अर्थकारण, औद्योगिकीकरण आणि भांडवली जगाने केलेला शोषणाचा व्यवहार नष्ट होत नाही. समाजात एका बाजूला विज्ञानाची प्रगती, तंत्रज्ञान, आधुनिकतेचे वारे; तर दुसऱ्या बाजूला धर्म, जात, रूढी, बुरसटलेल्या परंपरा प्रतिगामित्वाचे विचार; तसेच अंधश्रद्धा यांचे प्राबल्य आहे. अशा विरोधाभासमय कालखंडात मानवी जीवन व्यतीत होत आहे. अशावेळी मानवी मूल्यांची प्रतिष्ठापना व्हावी, समाजाला नवी - परिवर्तनवादी सकलकल्याणार्थ दृष्टी यावी, समाज विचारप्रणव व्हावा, विज्ञानाची कास बाळगून शोषणाला नकार देणारा सामाजिक - मानसिक - भावनिक विकास व्हावा. एकूणच, मानवाच्या मनुष्यत्वाच्या आड येणारा आणि त्यांचे सजीव असण्याचे हक्क नष्ट करणारा दांभिकपणा कमी होऊन परिवर्तनाच्या विचारांचा ठाव मांडणारा विचार 'अंधश्रद्धा निर्मूलन' चळवळीने प्रयत्नपूर्वक केलेला आहे. तो सातत्याने 'अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ' आणि चळवळीचे 'अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र' हे जोपासण्याचे - वाढविण्याचे कार्य करत आहे. हा विचार जगण्यातला आहे. याअर्थी संशोधन आवडीच्या विषयात करण्याची प्रेरणाही तितकीच प्रेरणादायी.

'अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र' या मासिकाचे वाङ्मयीन मूल्यमापन; त्याचबरोबर समाज ज्या नैतिक मूल्यांवर उभा असतो, अशा नैतिक आणि सर्व प्राणिमात्र कल्याणार्थ मूल्यांच्या प्रतिस्थापनेसाठी घेतलेली भूमिका यासंदर्भात आपणास अधिक जाणून घेता यावे व हे समाजासमोर मांडता यावे, याचसाठी मी 'अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र' या मासिकाचे या अनुषंगाने संशोधन करणार आहे.

'अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र' हे सामाजिक आणि वाङ्मयीन स्तराला वैधानिक आणि वैज्ञानिक दृष्टी, वैचारिक बुद्धिप्रामाण्यवादी बैठक, तात्त्विक चर्चा, विवेकवादी विचारांचा, विवेकाचा आणि विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनाचा आराखडा मांडत आलेले मासिक आहे. याचसाठी 'अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र' या मासिकाचा प्रवास, लेखकांच्या भूमिका आणि समाजवास्तव, वेगळेपण,

त्यामध्ये हाताळलेले विषय – आशय – शैली आणि त्यामुळे जनमानसावर निर्माण होत असलेले प्रभाव – परिणाम यांचा मेळ सकारात्मक आणि तटस्थपणे जाणून घेतला तर अधिक मोलाचे ठरेल. याच भूमिकेतून 'अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र'चे कार्य, योगदान, मासिकाचे वेगळेपण आणि वाङ्मयीन मूल्यमापन जाणून घेऊन संशोधनाच्या माध्यमातून मासिकाचे कार्यउद्दिष्ट समाजासमोर मांडणे न्यायोचित होईल.

आजच्या महामारीच्या काळात शोषणाचे बदललेले षड्यंत्र आणि त्याला पूरक असलेली मानवी मानसिकता याचा सखोल अभ्यास करणे गरजेचे आहे. मृत्यूच्या भीतीने खचलेली मानसिकता आणि मानवाकडून मानवाचे होणारे सर्वार्थाने शोषण हे शोषण नाही, तर जगण्याची रीत होऊ लागल्याच्या काळात संशोधनाला मानसशास्त्रीय मर्यादेचं जाळं तोडावं लागणार आहे, याचे भानही याअर्थी समजून घ्यावे लागणार आहे. नव्या व्यवहाराने पारदर्शकता आणली आहे; परंतु याचा अर्थ असा नाही की, समाजाचे शोषण होत नाही. नवा विकास हा शोषणपद्धतीचा बदल आहे. शंकरराव खरात यांच्या कथेतील मुंबईहून आलेलं पत्र वाचून घेण्याकरिता लाकडे फोडणाऱ्या पिढीच्या पुढील ही तिसरी पिढी. अडाणी लाकडे फोडणारा आणि कॉम्प्युटर वापरता येत नाही म्हणून कॉम्प्युटर ऑपरेटरला पैसे देणारा विद्यार्थी व ते पैसे मिळविणारे त्याचे मायबाप कुणाचे तरी काम करतात, राबराब राबतात. ही नवं रूपं घेऊन आलेली गुलामगिरी आहे, शोषणाला बळी जाणारी अवस्था आहे. संगणकीकृत भारताची प्रणाली सांगताना अन्यायाची बीजे सूक्ष्मपणे रुजवली जाण्याचा काळ आहे. हे शोषण थांबलं पाहिजे. आजही ग्रामीण समाजात भूतप्रेत – भानामती यांची मानसिक – भावनिक भीती दाखवून ती निवारण्यासाठी आर्थिक, मानसिक, शारीरिक शोषण उघड घडत आहे. मुरळ्यांचे लैंगिक शोषण, शिक्षणाच्या परिघात वावरण्यापासून वंचित असलेले पोतराज भुकेच्या आकांताने दारोदार, रस्तोरस्ती भटकताना दिसतात. देवा–धर्माच्या नावावर होणारी शोषणाची यंत्रणा सर्रास सुरू आहे. शोषणाचा गाडा अव्याहतपणे चालूच आहे. समाज 'शोषण' हे 'शोषण आहे', हेच मानायला तयार नसल्याच्या काळात 'अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र' या मासिकाचे कार्य व वेगळेपण आणि त्यातील वाङ्मयीन मूल्यमापनाचे संशोधन करणे, मला हे सामाजिक न्यायाच्या भूमिकेकडे जाणारे तत्त्व वाटते.

आज समाजात जाती, धर्म, संस्कृती, भाषा, प्रांत या मानवजातीच्या तुलनेत एकूणच कमी महत्त्वाच्या घटकांवर दरदिवशी काही ना काही तरी वाद – विवाद, हिंसा, दंगली, शोषण; मग हे कोणत्याही पातळीवरचे असो, होत आहेच हे वास्तव. या परिस्थितीत एका बाजूला मानव, तर दुसऱ्या बाजूला मानवानिर्मित संस्था, व्यवस्था, संघटना, यंत्रणा यांच्यात चढाओढ लागली आहे. 'मानवासाठी सर्वच' हा सिद्धांत मागे पडतो आहे. 'सर्वांसाठी मानव' अशी संज्ञा समोर येताना दिसत आहे; जे की बहुतांश योग्य आहे की नाही, हे काळ ठरवेल.

चळवळींचे साहित्य आणि साहित्यातून चळवळींसाठी मिळणारी मूल्यांची रसद यांच्या विवेकवादी ठेव्यांवरून समाज संस्कृतीचा वारसा ठरत असतो. त्यामुळे 'अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र'ने समाजाचा गाभाघटक (Core element), विवेकी, परिवर्तनवादी विचार याला आपला केंद्रबिंदू मानले आहे. याच दिशेने वाटचाल केलेली आहे. वास्तव जगण्यात घडणारे प्रसंग, घटना, रोध – विरोध, धर्मांध वृत्तीतून शोषणाचा वाहणारा प्रवाह, माणसाला विचारप्रवण करणारे विषय, वैज्ञानिक दृष्टीकोन, योग्य – अयोग्याचा ठाव, ज्वलंत समस्या आदी सामाजिक घटकांना व जाणिवांना प्राधान्य दिले आहे. 'अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र'च्या माध्यमातून वाङ्मयीन; तितकेच सामाजिक बदलावाचे विश्व समृद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.

डॉ. दाभोलकरांनी महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, गाडगे बाबा, डॉ. आंबेडकर यांच्या विचारांशी नाळ जुळवत आपला जैविक मानवी कल्याणार्थ विचार चळवळीच्या माध्यमातून या वार्तापत्राच्या जाणिवांत ठेविला आहे. याअर्थी तथागत – कबीर – तुकाराम यांच्या विवेकाचा विचारपाझर या काळात अशा प्रकारचा आहे. हा विचार जितका साहित्याचे मूल्यमापन करताना उपयुक्त आहे, तितकाच सामाजिक क्रांतीच्या कालखंडीय व्यवच्छेदनाला विश्लेषित – प्रेरक असा ठरणारा आहे. समाजात विज्ञानाचे विचार पेरणारा आणि अमानवी जीवन मानवी जाणिवांनी मूल्यसंस्कृत करणारा हा 'अंधश्रद्धा निर्मूलना'चा विचार अलमारीसारखा कार्यरूप ठरणारा आहे. याची या संशोधनातून स्वरूप, भूमिका, तत्त्वप्रणाली आणि वास्तवाचे मर्म मांडण्याची शैली पुढील संशोधकांना आणि अभ्यासकांनाही मूल्यप्राप्त ठरेल, इतके हे लवचिक; आणि तितकेच मोलाचे संशोधन असणार आहे, याची मला जाणीव आहे.

बाकी, गावाकडे घराशिवाय काही नसल्याने विदर्भातून पश्चिम महाराष्ट्राकडे स्थलांतरित (migrate) व्हावं लागणं, बा चं अपघाती निघून जाणं, मी अन् माय आम्ही जणू अमेरिकेतल्या न्यूयॉर्कसारख्या; म्हणजेच भारतातील पुणे शहरात जगणं, संशोधनासाठी भूगोल – इतिहास कळेल, भाषा, संस्कृती, प्रांत, जीवनव्यवहार कळतील, सामाजिक रूढी–परंपरा, श्रध्दा – अंधश्रद्धा, मानवी जाणिवा, जीवन–मृत्यूचा संघर्ष कळेल, याअर्थी कामानिमित्त भटकणं एक न सरणारा प्रवास...


**–विश्वनाथ अर्जुन साठे**
संशोधक विद्यार्थी, मराठी संशोधन केंद्र – के. टी. एच. एम. महाविद्यालय, नाशिक.
विद्यापीठ – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे अंतर्गत
संपर्क : ९९२१० ५६४६२

□

सिद्धार्थ सखाहरी लांडे

दाभोलकरांनी माझ्या पिढीसाठी जे संचित मागं ठेवलं आहे, त्याचा वापर करून 'तिमिरातुनी तेजाकडे जाण्याचा मार्ग' माझ्यासारख्या अनेकांना मिळालेला आहे. इथून पुढच्या पिढ्यांनाही हा विवेकाचा वारसा उपयोगी पडणार आहे. या लेखात माझी आधीची पार्श्वभूमी सांगणं मला गरजेचं वाटलं. कारण ती नसती सांगितली तर माझ्या जीवनात जे वैचारिक बदल झाले आहेत, ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात शिक्षण घेण्यासाठी आलो नसतो तर झालेच नसते. विद्यापीठात डॉ. मनोहर जाधव यांच्यासारखे प्राध्यापक भेटले, त्यांच्याकडूनच दाभोलकर समजले आणि एवढे बदल जीवनात झाले.

# नरेंद्र दाभोलकरांच्या वैचारिक साहित्यावर पीएच.डी. करताना...




२०१८ च्या एप्रिल महिन्यात मी पीएच. डी.च्या संशोधनासाठी प्रवेश घेतला. संशोधनासाठी विषय निवडला, 'अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीतून उदयास आलेल्या डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या वैचारिक साहित्याचा अभ्यास.' या संशोधनासाठी मला मार्गदर्शक मिळाले, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागातील प्रा. डॉ. मनोहर जाधव. विषयनिवडीनंतर ''मी डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या साहित्यावर पीएच. डी. करतो आहे,'' असं कुणाला सांगितलं आणि त्यानं आश्चर्य व्यक्त केलं नाही, असं झालेलं नाही. त्याची वेगवेगळी कारणं आहेत.

अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यात असलेल्या कोल्हार खुर्द या गावी आई-वडील आणि दोन भावंडांसह मी राहतो. असंख्य लोकांच्या मागे लागणारा शनि असलेल्या शिंगणापूरच्या आणि आंतरराष्ट्रीय दर्जाची ख्याती प्राप्त झालेल्या साईबाबांच्या शिर्डीच्या मधोमध आमचं गाव आहे. त्याचबरोबर महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांचं एकत्रित देवींचं मंदिरही कोल्हार बुद्रुक या गावी आहे. माझे वडील लहान असतानाच आजी त्यांना घेऊन पोट भरण्यासाठी मूळ गाव सोडून कोल्हार खुर्द या गावी कायमची राहायला आलेली. माझ्या आईचं आणि आजीचं कधी पटलं नाही. वडील मजुरी करायचे तर आई आजूबाजूच्या लोकांच्या शेळ्या राखोळीने घेऊन चारायला जायची. आम्हा तिघा भावंडांचं शिक्षणही चालू झालेलं होतं. सुरुवातीला शाळेत हुशार असूनही घरच्या लोकांनी माझ्या अभ्यासाकडे लक्ष दिलं नाही. मधल्या भावाला सहावीनंतर शाळेतून घरी ठेवलं आणि एका मेंढपाळाबरोबर मेंढ्या चारायला पाठवलं. लहान भाऊ शाळेत हुशार आणि त्याला घरात सहसा कुणी कामही सांगत नसे. पाचवी ते सातवी सकाळी सात ते दुपारी बारा वाजेपर्यंत मी शाळेत जायचो आणि शाळेतून आल्यावर आई जिथं शेळ्या चारत असे, त्या ठिकाणी तिला मदत म्हणून जायचो. नंतर ती घरी असलेल्या गायीला चारा कापून आणायला जायची. एक दिवस अचानक आई घुमायला लागली. शेजारीच पाचशे फुटांवर असलेल्या एका भगताच्या घरी आई घुमतच पळत जायची. तिथं लिंबू कापून तिच्यावरून फेकलं की, ती शांत होऊन घरी यायची. काही दिवसांत आईने, गावातीलच एका बाईच्या अंगात येत होतं, तिला गुरू केलं. मोठा जागरण गोंधळाचा कार्यक्रम केला होता. गणमाळ घालून आईला परडी, आसूड, पोत, त्रिशूळ आणि कवड्याच्या माळा देण्यात आल्या. कोल्हापूरची महालक्ष्मी आईच्या अंगात यायला लागली. दर मंगळवारी आणि शुक्रवारी; तसेच पौर्णिमेच्या दिवशी आईच्या अंगात यायचं. याच दिवशी आई दारोदार जोगवा मागायला जायची. लोक वर्दी घेऊन येत आणि आईच्या वाऱ्यापुढे बसून आपल्या अडचणी सांगत. आई लिंबं कापून उतरून टाकायला सांगायची. आमच्या चुलीतलीच राख काहींना उदी म्हणून प्यायला सांगत असे. आई ज्या दिवशी घुमायची, त्या दिवशी आजी तिच्याबरोबर कधीच भांडत नसे!

संसारात भरभराट व्हावी म्हणून आई अनेक प्रकारची व्रतं करायची. तिला लिहिता-वाचता येत नाही, म्हणून मीच या व्रतांच्या

पोथ्यांचं वाचन करायचो. वैभवलक्ष्मीचे एकवीस शुक्रवार, मार्गशीर्ष महिन्यातले देवीचे गुरुवार, पिवळे गुरुवार, संतोषीमातेचे शुक्रवार. वडिलांना रविवार आणि एकादशी हे उपवास असायचे. घरासमोर उंबराचं झाड होतं. दत्ताचे गुरुवारी मी उपवास करायचो. बरेच दिवस मी हे उपवास केले होते. श्रावण महिन्यात घरात नवनाथाची पोथी वडील वाचत. मी पाचवीला गेल्यापासून वडिलांनी ही पोथी माझ्याकडे वाचण्यासाठी दिली. गावातील तीन-चार लोकांच्या घरीही मी नवनाथाची पोथी वाचायला जायचो. हे लोक पोथी वाचून संपल्यावर मला कपडे घेत.

एक दिवस वडिलांनी एक पत्रिका घरी आणली. तिच्यात लिहिलेलं होतं, ''ही पत्रिका पायाखाली तुडवू नये; तुडवल्यास, फाडल्यास घरात काहीतरी वाईट प्रसंग घडेल, सर्पदंश होईल. या पत्रिकेच्या पाचशे, हजार ऐपतीप्रमाणे पत्रिका छापून वाटाव्यात. तुमच्या इच्छा पूर्ण होतील.'' वडिलांनी त्या पत्रिकेच्या एक हजार पत्रिका छापून आणल्या. आमच्या गावातल्या आठवडे बाजारात मला घेऊन ते पत्रिका वाटायला गेले. ज्या लोकांना या पत्रिकेबद्दल माहिती होतं, ते लोक पत्रिका घेत नसत. ज्यांना माहिती नसे ते घेत. त्यांनी वाचून परत देऊ नये म्हणून त्यांच्या हातात पत्रिका देऊन मी आणि वडील तिथून दुसरीकडे निघून जायचो. माझ्याकडून सहसा कुणी घेत नसल्याने मी एखाद्या कचऱ्यात काही पत्रिका टाकून द्यायचो; पण मनात भीती असायची की, आता घरात कुणाला काही झालं तर काय करायचं? पण कुणाला काहीच झालं नाही! पत्रिका वाटून झाल्यानंतर वडिलांनी लॉटरीची काही तिकिटे खरेदी केली. तिकिटांची सोडत ज्या दिवशी असेल, त्या दिवशी मोठ्या आशेने वृत्तपत्रात तिकिटांवरचे नंबर जुळवून पाहायचे; पण सतत निराश व्हायचे. एक दिवस एका तिकिटावरचे शेवटचे दोन अंक जुळल्यामुळे तिकिटविक्री करणाऱ्या माणसाने वडिलांना दहा रुपयांची नोट दिली होती. त्या दहा रुपयांची मला थंडीत वापरायला कानपट्टी घेतली होती.

मी सहावीत होतो, तेव्हा आमच्या गावात असलेल्या ह.भ.प. भोसले महाराज यांच्याकडे हरिपाठ, भजन शिकायला जायचो. गावातील वीस-पंचवीस मुलं एकत्र जमत. महाराज आम्हाला हरिपाठाबरोबर वारकरी सांप्रदायातील 'पावल्या' शिकवत. आजूबाजूच्या पंचक्रोशीत अखंड हरिनाम सप्ताह असल्यावर आम्हा मुलांना घेऊन हरिपाठ म्हणायला घेऊन जात. माझा बराचसा वेळ महाराजांबरोबर जात होता. त्यामुळे दहावीत चार विषयांत नापास झालो आणि महाराजांकडे जाण्याचं बंद झालं. नंतर दहावीची परीक्षा मार्च-ऑक्टोबर करत पास झालो. मोलमजुरीची कामं करूनच बी. ए.पर्यंत शिक्षण पूर्ण केलं. एस. वाय. बी. ए.ला असताना मराठी विषय शिकवणाऱ्या डॉ. नवनाथ शिंदे सरांचा सहवास मिळाला. त्याच वेळी शिंदे सरांचं पुणे विद्यापीठात पीएच. डी.साठी संशोधनाचं काम सुरू होतं. 'महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांचा अभ्यास' या विषयावर सर काम करत होते. सरांनी अभ्यासाचा भाग म्हणून देवीच्या भक्तांकडून काही गाणी, मुलाखती संकलित केल्या होत्या. त्यांचं शब्दांकन मी रात्री जागून करायचो. सरांच्या घरात बहुतांश लोकसाहित्याशी निगडित पुस्तकं होती. या सर्व पुस्तकांची मी एका वहीमध्ये नोंद करायचो. या कामामुळे माझ्यातल्या मूळच्या असणाऱ्या धार्मिक, आध्यात्मिक वृत्तीला खतपाणीच मिळायचं. माझ्यातल्या क्षमता सरांनी ओळखल्या असाव्यात, म्हणून त्यांनी २०१२ साली मला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात एम. ए. करण्यासाठी जाण्यास सांगितलं. विद्यापीठात प्रवेश मिळाला नसता तर मला आळंदीमध्ये वारकरी शिक्षण संस्थेत एका महाराजांकडे कीर्तनकार व्हायला जायचं होतं. परंतु ऑगस्ट २०१२ मध्ये एम. ए.साठी विद्यापीठात प्रवेश मिळाला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागात 'मराठीतील वैचारिक साहित्य' हा पेपर प्रा. डॉ. मनोहर जाधव शिकवत. मी मात्र सोपा विषय समजून 'लोकसाहित्यफ' हा पेपर निवडला होता. वैचारिक साहित्याचा पेपर अभ्यासणारे मित्र, मी उपवास करतो, गळ्यात माळ घालतो म्हणून मला चिडवायचे. मी जाधव सरांना भेटलो आणि सांगितले, ''सर, माझे मित्र मला मी देवाचे उपवास करतो, गळ्यात माळ घातली आहे, म्हणून चिडवतात. तुम्ही त्यांना असं काय शिकवता?'' सर म्हणाले, ''मी तर त्यांना असं काहीही शिकवत नाही.'' मग मी सरांना विनंती केली की, ''सर, मला तुमच्या तासांना बसू द्या. पाठीमागे बसून मी तुमचे तास ऐकेन.'' सरांनी मला परवानगी दिली. 'मराठीतील वैचारिक साहित्य' या पेपरसाठी त्यावेळी डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचं 'ऐसे कैसे झाले भोंदू?' हे पुस्तक अभ्यासाला होतं. या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर सोललेला नारळ आणि त्याला कुंकू लावलेला फोटो आहे. हे पुस्तक वाचल्यानंतर मनात प्रचंड कालवाकालव झाल्याचं मला स्मरतंय. त्याला कारण मागे उल्लेख केलेली घरची पार्श्वभूमी होती. यानंतर जाधव सरांकडून मला अनेक पुस्तकं वाचायला मिळाली. धार्मिक आणि शालेय पुस्तकांचं वाचन सोडून मी अवांतर असं काहीही वाचलेलं नव्हतं. विद्यापीठात आल्यानंतर वाचनाला सुरुवात झाली. मराठीतील अनेक महत्त्वाची पुस्तकं, मासिकं, साप्ताहिकं, पाक्षिकं जाधव सरांकडून मला वाचायला मिळाली.

डॉ. नरेंद्र दाभोलकरांची पुस्तकं वाचताना एक गोष्ट लक्षात आली, ती अशी की, अगोदर धार्मिक पुस्तकं वाचलेली असल्यामुळे दाभोलकरांनी केलेली मांडणी पटकन समजत होती. कधी डोक्यावरूनही जायचं; विशेषतः 'प्रश्न मनाचे', 'तिमिरातुनी तेजाकडे' ही सैद्धांतिक पुस्तकं समजून घेण्यासाठी थोडा वेळ लागला. पण आतून काहीतरी बदल होतोय, असं मला वाटत होतं. दाभोलकरांच्या भाषणांच्या कॅसेट्स मला मिळाल्या. ओघवत्या शैलीत सामान्यातल्या सामान्य माणसाला समजेल, अशा शब्दांत भाषण करण्याची कला दाभोलकरांकडे होती. त्यामुळे बऱ्याच गोष्टी समजण्यास मदत झाली.

माझ्या वडिलांचं वय ६९ वर्षांचं आहे. आमच्या घरच्या शेळ्या चारायचं काम ते करतात. करमणूक म्हणून मी त्यांना मोबाईल घेऊन दिलेला आहे. या मोबाईलमध्ये त्यांना हिंदी चित्रपटातील गाणी

आणि डॉ. नरेंद्र दाभोलकरांची ऑडिओ भाषणं भरून दिलेली आहेत. शेळ्या चारताना मोबाईलमध्ये ही भाषणं सुरू असतात. वडिलांना फोन केला की ते म्हणतात, ''दाभोलकर किती भारी समजून सांगतात, स्त्रिया अंधश्रद्धांना कशा बळी पडतात ते. तुझ्या आईच्या अंगात कशाची देवी न् कशाचं काय? अंगात येणं एक आजार असतो.'' २०१९ च्या मे महिन्यात शेळ्या चारत असताना काही मोकाट फिरणाऱ्या कुत्र्यांनी आमच्या शेळ्यांवर हल्ला केला. त्यात एक शेळी दगावली. एक-दोन जखमी झाल्या. वडील जमिनीवर अंग टाकून रडत होते. माझा भाऊ आणि मी पळत गेलो. कुत्र्यांना हाकलून दिलं. वडिलांना धीर देऊन शांत केलं. दर रविवारी खंडोबाचा उपवास करत असलेल्या वडिलांना या प्रसंगी दाभोलकरांची भाषणं आठवत होती आणि ते रडता-रडताच खंडोबाला शिव्या देऊन म्हणाले, ''आयुष्यभर खंडोबाचे उपवास, पूजा-अर्चा केली; पण माझी मनषी (शेळी) कुत्र्यांनी फाडली. कुत्रा म्हणजे खंडोबाचं रूप असतं. त्याच कुत्र्यांनी माझी शेळी मारली.'' त्याच दिवशी वडिलांनी गळ्यातली माळ काढून टाकली. घरात ते करत असलेली सगळी कर्मकांडं बंद केली. मांसाहारही सुरू केला. दाभोलकरांच्या भाषणांचा हा सगळा परिणाम झालेला होता. कुणाचा दशक्रिया विधी असेल तेव्हा माझे वडील म्हणतात, ''जिवंतपणीच काय गोष्टी करायच्या त्या कराव्यात, मेल्यावर कोण येतंय पाहायला.'' मी माझ्या आई-वडिलांना सांगितलं आहे, ''तुम्हाला जे पाहिजे ते आम्हाला मागा. आम्ही ते देऊ. परंतु तुम्ही मेल्यानंतर काहीही झालं तरी आम्ही कुठलंही कर्मकांड करणार नाही.'' त्यावर दोघंही म्हणतात, ''तुम्हाला जे करायचं ते करा!''

माझ्या आईलाही तिच्या अंगात येण्याची कारणं मी पटवून सांगितली. यासाठी दाभोलकरांनी सांगितलेल्या मार्गाने तिचं प्रबोधन सतत करत असतो. गेल्या तीन-साडेतीन वर्षांपासून आईच्या एकदाही अंगात आलेलं नाही. परंतु घरात असलेलं देवीचं साहित्य अजूनही आईनं जपून ठेवलं आहे. अगदीच नाही; पण देवीच्या नावाने ती करत असलेले मंगळवारचे उपवास मात्र बंद केलेले आहेत. हे काय कमी नाही तिच्यासाठी!

एकंदरीत, अंधश्रद्धेने गजबजलेल्या घरात जन्मलेल्या माझ्यासारख्याला दाभोलकर भेटले ते पुस्तकांच्या माध्यमातून. २० ऑगस्ट २०१३ या दिवशी डॉ. नरेंद्र दाभोलकरांचा मारेकऱ्यांनी निर्घृण खून केला. त्याच दिवशी एम. ए.च्या वर्गात प्रा. देसाई सरांचा तास सुरू असताना चैतन्य डुम्बरे या मित्राने वर्गात ही बातमी सांगितली. देसाई सरांनी तास बंद केला आणि निघून गेले. जाधव सरांनी दाभोलकरांबद्दल वर्गात माहिती सांगितली. दाभोलकरांची सर्वच पुस्तकं वाचायला सांगितली. दाभोलकरांची पुस्तकं वाचल्यानंतर एक गोष्ट लक्षात आली, ते ज्या समाजसुधारकांचा वसा घेऊन अंधश्रद्धा निर्मूलनाचं काम करत होते, त्या समाजसुधारकांची पुस्तकंही तुम्हाला वाचावीच लागतात आणि तिथूनच सुरू होते बदलाची खरी प्रक्रिया. दाभोलकरांनी त्यांच्या चळवळीत काम करणाऱ्या कोणत्याही कार्यकर्त्याला कधी देव-धर्म सोडून चळवळीत काम करा, असं सांगितलेलं नाही. विवेकाने वैज्ञानिक दृष्टिकोनाचा आग्रह धरून राज्य घटनेने सांगितलेलं मूलभूत कर्तव्य असलेल्या वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या प्रचार-प्रसाराचं काम ते करत होते. मला नेहमी वाटतं, महात्मा फुल्यांना जीवे मारायला गेलेल्या मारेकऱ्यांचं मन जसं त्यांनी बदललं, तसं दाभोलकरांच्या मारेकऱ्यांनी दोन मिनिटं त्यांच्याशी बोलण्याची संधी दिली असती, तर त्यांचीही मनं दाभोलकरांनी नक्कीच बदलली असती.

मराठी साहित्यामध्ये अनेक लोक पीएच. डी.चे संशोधन करतात. त्या संशोधनाचा फायदा समाजाला व्हावा; परिणामी देशाला या संशोधनाचा फायदा होऊन समाज, देश पुढं जावा हा उद्देश असतो. पण मला स्वतःला सतत असं वाटतं की, आपण करीत असलेल्या अभ्यासाचा, संशोधनाचा फायदा समाजाला होईलच; आधी तो आपल्याला स्वतःला झाला पाहिजे. डॉ. नरेंद्र दाभोलकरांनी दाखवलेल्या विवेकाच्या वाटेवर चालताना पारंपरिक मानसिकतेच्या समाजातील कर्मठ लोकांचा विरोध होणारच आहे; आणि चांगल्या कामाची आपल्याला किंमतच चुकवावी लागते.

मी जन्माला आलो, तेव्हा माझ्या पोटाला एक लाल नायटा होता, असं घरचे सांगतात. मग ब्राह्मणाला दाखवण्यात आलं. त्याने मी 'नावकरी' आल्याचं सांगितलं. माझं नाव 'भिकचंद' असं ठेवलं गेलं. 'सकाळ' वृत्तपत्राचे मा. संपादक उत्तम कांबळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गेस्ट हाऊसमध्ये कधी थांबले की, सकाळी मी त्यांच्याबरोबर विद्यापीठ परिसरात फिरायला जायचो. माझ्या नावाचा अर्थ त्यांनी मला सांगितला, तो असा - ''मारवाडी समाजात सर्वांत श्रीमंत होऊन गेलेल्या व्यक्तीचं नाव भिकचंद होतं.'' लोकांना मी माझं नाव 'भिकचंद' आहे, असं सांगितलं की, ते उच्चार करायचे बिभीषण, बच्चन, बिच्चन... डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या विचारांची ओळख झाल्यापासून हळूहळू एकेक गोष्ट बदलत जाण्याचा निश्चय मी केलेला आहे. दाभोलकरांनी मुस्लिम सत्यशोधक समाजाचे हमीद दलवाई यांच्या नावावरून त्यांच्या मुलाचं नाव हमीद ठेवलं. श्रीराम लागू यांनीही त्यांच्या मुलाचं नाव तन्वीर ठेवलं होतं. हे जेव्हा मी दाभोलकरांच्या पुस्तकात वाचलं, तेव्हा लक्षात आलं, माझं नाव तर अंधश्रद्धेतून ठेवलं आहे. मग मी 'भिकचंद' हे नाव बदलून गॅझेट करून 'सिद्धार्थ' केले.

आमच्या घराला मी 'परिवर्तन' हे नाव दिलं आहे. त्याचं कारणही तसंच आहे. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हॉस्पिटलचं नाव आहे, 'परिवर्तन, सहयोग हॉस्पिटल.' हे 'परिवर्तन' नुसतं बोलण्यात नसून ते आम्ही भावंडांनी कृतीतही आणलं आहे. दाभोलकरांचा पंढरपूरच्या वारीसंबंधी असलेला एक लेख मी वाचला. 'वारीचे सामर्थ्य समता-संगराला लाभावे!' हा तो लेख. वारीला आठशे वर्षांची असलेली परंपरा आपण अभिमानाने सांगतो. संतांचे विचार समतेचं तत्त्वज्ञान सांगतात. महिनाभर पायी पंढरपूरला जाणारा वारकरी जात-धर्म विसरून फक्त विठ्ठलाचं रूपच प्रत्येक वारकऱ्यांत पाहतो. प्रत्येकाला 'माऊली' म्हणून हाक मारतो. एकमेकांच्या पायावर डोकं टेकवतो, गळाभेट घेतो. परंतु हा वारकरी वारी

संपल्यावर पुन्हा आपापल्या जातीच्या चौकटीत बंदिस्त होऊन जातो. आठशे वर्षांत फार मोठं जातिनिर्मूलन व्हायला हवं होतं; पण ते झालेलं नाही. भारतातील जाती संपवण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेला महत्त्वाचा उपाय म्हणजे आंतरजातीय विवाह. दाभोलकरांचं अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीबरोबरच जातिप्रथा निर्मूलनाचंही काम सुरू होतं. एम. ए.पासून पीएच. डी.पर्यंत एकत्र शिक्षण घेत असलेली माझी मैत्रीण ज्योत्स्ना आणि मी दोघांच्याही परिवाराच्या परवानगीने विवाहबद्ध झालो. शाहू महाराजांनी त्यांच्या बहिणीचा विवाह एका धनगराच्या मुलाशी लावला होता, अगदी अशाच प्रकारचा आंतरजातीय विवाह आम्हा दोघांचा झालेला आहे. आमच्या लग्नात साक्षीदार म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागातील प्रा. डॉ. मनोहर जाधव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नागनाथ कोत्तापल्ले आणि साधना साप्ताहिकाचे संपादक विनोद शिरसाठ उपस्थित होते. 'फुले-शाहू-आंबेडकर' यांच्या विचारांच्या प्रेरणेने आणि आता 'आम्ही सारे दाभोलकर' या घोषणेला स्मरून आम्ही दोघेही आयुष्यभर कुठलंही कर्मकांड न करता विवेकाने जगण्याचा निश्चय करून संसार करणार आहोत.

दाभोलकरांनी माझ्या पिढीसाठी जे संचित मागं ठेवलं आहे, त्याचा वापर करून 'तिमिरातुनी तेजाकडे जाण्याचा मार्ग' माझ्यासारख्या अनेकांना मिळालेला आहे. इथून पुढच्या पिढ्यांनाही हा विवेकाचा वारसा उपयोगी पडणार आहे. या लेखात माझी आधीची पार्श्वभूमी सांगणं मला गरजेचं वाटलं. कारण ती नसती सांगितली तर माझ्या जीवनात जे वैचारिक बदल झाले आहेत, ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात शिक्षण घेण्यासाठी आलो नसतो तर झालेच नसते. विद्यापीठात डॉ. मनोहर जाधव यांच्यासारखे प्राध्यापक भेटले, त्यांच्याकडूनच दाभोलकर समजले आणि एवढे बदल जीवनात झाले. गेली आठ वर्षेदाभोलकरांबरोबरच पानसरे, कलबुर्गी, गौरी लंकेश यांनाही न्याय मिळालेला नाही. आपण न्यायव्यवस्थेला मानणारे आहोत. दाभोलकर चळवळीतल्या कार्यकर्त्यांसमोर भाषण करताना म्हणायचे, तसं 'शेवटी विजय माझाच होईल' या त्यांच्या आत्मविश्वासाची आठवण ठेवून 'विवेकाचा आवाज बुलंद करून' हा वारसा असाच पुढे घेऊन वाटचाल करत राहू...!

**-सिद्धार्थ सखाहरी लांडे**
मराठी विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे-४११००७ मो. ९७६३५०३९७२
ई-मेल- siddharthlande72@gmail.com

---

## नरेंद्रभाई (पान नं. ४ वरून पुढे)

मला वाटते, हाच बुद्धाचा संदेश नरेंद्रभाई लोकांना प्रश्न विचारायला उद्युक्त करत पुढे नेत होते. प्रत्येक गोष्टीला प्रश्न विचारा, जे सर्वसामान्य माणसाच्या फायद्याचे आहे आणि जे विवेक आणि पुराव्यावर आधारित आहे, त्यावरच विश्वास ठेवा.

महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे. राज्याला सामाजिक सुधारणांचा प्रदीर्घ इतिहास आहे. भारतीय प्रजासत्ताकाला आकार देण्यात प्रभावशील असलेल्या २१ भारतीयांच्या विचारप्रक्रियेचे चित्रण रामचंद्र गुहा आपल्या 'मेकर्स ऑफ इंडिया'मध्ये करतात. या २१ जणांपैकी जोतिबा फुले, गोपाळ कृष्ण गोखले, बाळ गंगाधर टिळक, ताराबाई शिंदे आणि हमीद दलवाई हे एकाच शहरातून आलेले आहेत. ते आहे - पुणे. ही एखाद्या शहरासाठी अनन्यसाधारण संख्या आहे. नरेंद्रभाई याच मालिकेतील सामाजिक सुधारक आहेत. बुद्धाने सांगितले, ''समाजात नेहमीच जीवन आणि मृत्यू यामधील शक्तींचा संघर्ष चालूच असतो. आपण कोणत्या बाजूचे आहोत, यांची निवड आपल्याला करावी लागते.'' गांधी मारेकऱ्याच्या गोळीने मारले गेले, मार्टिन ल्युथर किंग (ज्यु.) बंदूकधाऱ्याच्या त्याचप्रमाणे नरेंद्रभाई. पण त्यांचे विचार आणि कार्य मात्र चिरकाल टिकेल.

(**अरविंद गुप्ता -** पुण्याच्या 'आयुका'मध्ये प्राध्यापक, तेथील बाल विज्ञान केंद्राचे प्रमुख; तर विज्ञान खेळणी निर्मितीतील तज्ज्ञ संशोधक. विज्ञान खेळण्यांच्या सहाय्याने लहान मुलांच्यात विज्ञानप्रसार करत वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लागावा, यासाठी सतत कार्यरत. २०१८ साली पद्मश्री पुरस्कार.) □

---

## ब्रुनो ते दाभोलकर (पान नं. १३ वरून पुढे)

आणखी एक बळी होय.


मध्य-पूर्वेत तालिबान, आयसिस या धर्मांध संघटना त्यांच्या समाजाला प्रकाशाकडून अंधाराकडे घेऊन चालल्या आहेत. भारतातही धर्मांध संघटना भारतीय समाजाला याच दिशेनं ओढत नेतील काय, याची भीती वाटते. हे घडायचं नसेल, तर स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य ही मूल्ये जपण्यासाठी दाभोलकरांनी महाराष्ट्रात प्राणाची आहुती दिली. त्यांचे स्मरण करून त्यांनी सुरू केलेली प्रबोधनाची चळवळ अधिक तेज करायला हवी.

'आपण सर्वजण एकाच परमेश्वराची लेकरे आहोत,' असे धर्मवचन ग्रंथातच राहिले आहे. जगातील सर्व संघटित धर्म एकमेकांच्या विरोधात संघर्ष करीत आहेत. १३ व्या शतकात ख्रिस्ती धर्म व मुस्लिम धर्म यांच्यात धर्मयुद्धे झाली. भारताच्या फाळणीच्या वेळी लाखो लोकांना हिंदू-मुस्लिम वादाचा तडाखा बसला. मध्य-पूर्वेत मुस्लिम अतिरेकी, तर भारतात हिंदू अतिरेक्यांची आपल्या धर्माची पुनर्स्थापना करण्याची स्वप्ने मोडून टाकायची असतील, तर विविध संघटित धर्मांचा त्याग करून जगात सर्वत्र एकच विज्ञानाधिष्ठित मानवता धर्म स्थापन व्हायला हवा. ब्रुनो, गॅलिलिओ ते दाभोलकर या महापुरुषांना अभिप्रेत असलेल्या मानवतावादाची पताका भविष्यात फडकावी, यासाठी जगातील उदारमतवादी स्वातंत्र्य, समता, बंधुता व विचारस्वातंत्र्य यांच्या रक्षणाचा निर्धार करूया. □

□
नरेंद्र लांजेवार

डॉक्टर...तुम्ही एकाच वेळी 'क्लास' आणि 'मास' यांना समजेल, उमजेल अशा भाषेमध्ये बोलत होता, लिहित होता. तुमचं हेच विशेष वैशिष्ट्य आम्हाला खूप भावायचं. तुमच्या लेखणीत आणि वाणीत समोरच्या समूहाला समजावण्याची जबरदस्त ताकद होती. तुमच्या वाणीतून, लेखणीतून कुणाची भावना दुखावेल, असा एक शब्द चुकूनही आला नाही; पण प्रस्थापितांचे हितसंबंध तोडण्याचे सामर्थ्य नक्कीच तुमच्या वाणीत, लेखणीत; आणि मुख्यत: तुमच्या कृतीत होते. त्यामुळे तुमची दिवसाढवळ्या गोळ्या घालून हत्या सनातन्यांनी करणे हे ओघानेच आले; तेही पुण्यात!

# एक संवाद डॉ. नरेंद्र दाभोलकरांशी...




''साथी डॉ. नरेंद्र दाभोलकर...

आमच्या सार्वजनिक जीवनात असा एकही दिवस गेला नाही की, डॉक्टरसाहेब तुमची आम्हाला आठवण झाली नाही... तसेही दर महिन्याच्या २० तारखेला आम्हाला तुमची तीव्रतेने आठवण येतेच. या २० ऑगस्टला तुमच्या आठव्या हौतात्म्य दिनी आम्ही सारे पुण्याच्या महर्षी शिंदे पुलावर पुन्हा एकदा एकत्र येऊ. तुमच्या मारेकऱ्यांना व तुम्हाला मारण्याचा कट रचणाऱ्या सूत्रधाराला अटक व्हावी, म्हणून शासनाकडे आम्ही सारे पाठपुरावा करू व तसाही पाठपुरावा करीतच असतो. कटाच्या मुख्य सूत्रधारापर्यंत पोचायचेच नाही, असा जणू चंगच इथल्या तपास यंत्रणेने बांधला आहे, तरीही आम्ही सारे विवेकी कार्यकर्ते संवैधानिक चौकटीमध्ये राहून तुमच्या खुनाचा सखोलपणे तपास लागावा, यासाठी विवेकी मार्गाने आंदोलन करीत असतो.

डॉक्टर...तुम्ही एकाच वेळी 'क्लास' आणि 'मास' यांना समजेल, उमजेल अशा भाषेमध्ये बोलत होता, लिहित होता. तुमचं हेच विशेष वैशिष्ट्य आम्हाला खूप भावायचं. तुमच्या लेखणीत आणि वाणीत समोरच्या समूहाला समजावण्याची जबरदस्त ताकद होती. तुमच्या वाणीतून, लेखणीतून कुणाची भावना दुखावेल, असा एक शब्द चुकूनही आला नाही; पण प्रस्थापितांचे हितसंबंध तोडण्याचे सामर्थ्य नक्कीच तुमच्या वाणीत, लेखणीत; आणि मुख्यत: तुमच्या कृतीत होते. त्यामुळे तुमची दिवसाढवळ्या गोळ्या घालून हत्या सनातन्यांनी करणे हे ओघानेच आले; तेही पुण्यात!

डॉक्टर... तुम्ही 'महाराष्ट्र अंनिस'च्या कार्याचा गाभा आणि आवाका नेमक्या शब्दांत कार्यकर्त्यांना सांगत असत. 'अंधश्रद्धा निर्मूलनासाठी क्रोधापेक्षा करुणेची आणि उपहासापेक्षा आपुलकीची गरज जास्त असते,' हे तुमचे प्रसिद्ध वाक्य म्हणजे चळवळीचा मूळ गाभाघटक होय. तुम्ही प्रत्येक भाषणात सांगायचे की, 'आपण विज्ञानाची सृष्टी घेतली; पण विज्ञानाची दृष्टी घेतलेली नाही. विज्ञानाची करणी घेतली; पण विज्ञानाची विचारसरणी घेतलेली नाही.' यासाठी डॉक्टरसाहेब, तुम्हाला वैज्ञानिक दृष्टिकोनाची लस समाजाला द्यायची होती. तुम्हाला हा समाज विवेकाच्या आधारे नीतीच्या पायावर उभा करावयाचा होता. महाराष्ट्रातील तमाम संतांनी आणि समाजसुधारकांनी हेच तर स्वप्न बघितलं होतं!

पण डॉक्टर... तुम्ही नुसती स्वप्नं बघितली नाहीत; ती प्रत्यक्ष आणण्यासाठी, विज्ञानाची दृष्टी जनमानसात रुजविण्यासाठी जमिनीवर संघर्ष केला, उपक्रम राबविले, कृतिशील प्रबोधन केले, विधायक कामांची उभारणी केली, त्यासाठी संघटना उभारली. बाबासाहेबांच्या 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा,' या आदेशाप्रमाणे प्रबोधन, संघर्ष आणि विधायकता हा आपल्या चळवळीचा गाभा बनविला.

डॉक्टर... ज्या अविवेकी तरुणांनी तुमची हत्या केली, त्यांना तुमच्या चळवळीची चतु:सूत्री माहीत असती, त्याचे आकलन

झाले असते तर कदाचित त्यांनी तसे केले नसते. तुम्ही तुमच्या चळवळीची चतु:सूत्री सांगताना नेहमी सांगायचे, 'धर्माच्या नावावर शोषण करणाऱ्या अंधश्रद्धांना विरोध, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विचार, प्रसार आणि अंगीकार, प्रत्येक धर्माची विधायक, कृतिशील आणि कठोर चिकित्सा, व्यापक समाजपरिवर्तनाच्या चळवळीशी स्वत:ला जोडून घेणे..' हे विचारांचे चार खांब तुम्ही मानले होते. तुमची प्रत्येक कृती ही संवैधानिक चौकटीमध्ये असे आणि ही संवैधानिक चौकट मान्य नसणाऱ्यांनीच तुमची हत्या घडवून आणली. समाजपरिवर्तनाची लढाई इतकी क्रूर असते का हो डॉक्टर? ती विचार पेरणाऱ्यांनाच संपवून टाकते? या अविवेकी लोकांना काय माहीत की, माणसं मारून विचार नाही मरत... पण खरं सांगू का डॉक्टर, तुमच्या हौतात्म्यानंतर तुमचे विचार संपले नाहीत...ते शतपटीने वाढले...तुमचा विचारांचा लढा फक्त महाराष्ट्रातच नव्हे, तर देशभर पसरला... अगदी देशाच्या बाहेरही तुमच्या विचारांच्या आवश्यकतेला मागणी आली.

डॉक्टर... तुम्ही चळवळीत येण्यापूर्वी राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरील उत्तम कबड्डीपटू होता. पुढे, तुम्ही वैद्यकीय पदवीधर झाला. तुमचा उत्तम चालणारा दवाखाना तुम्ही बंद करून समाजसेवेत आलात. डॉ. जयप्रकाश नारायण यांच्या विचारांनी प्रेरित होऊन तुम्ही जनचळवळीत आलात. देवदासी, भटके-विमुक्त, बाबा आढाव यांची 'एक गाव-एक पाणवठा' चळवळ.. या चळवळीत तुम्ही संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला...नंतर 'सामाजिक कृतज्ञता निधी'साठी महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात पोचलात... यातून अनेक कार्यकर्त्यांना पाठबळ मिळाले. पुढे, अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीसाठी तुम्ही ठरवून संपूर्ण आयुष्यच वाहून दिले. पायाला भिंगरी बांधून महाराष्ट्रातील गाव आणि गाव तुम्ही पिंजून काढले. गावोगावी कार्यकर्त्यांचे नेटवर्क उभे केले. हजारो कार्यकर्त्यांच्या घराघरांत तुम्हाला आदराचे स्थान मिळाले. तुम्ही प्रत्येक कार्यकर्त्याला सांगत, 'आधी घरादाराला वेळ द्या...नंतर चळवळ.' तुम्ही कधीच व्यक्तिगत स्वार्थासाठी कार्यकर्त्यांचा वापर केला नाही, ना एकाही कार्यकर्त्यावर अन्याय होऊ दिला. तुम्ही सातत्याने महाराष्ट्रातील विविध परिवर्तनवादी चळवळींशी जोडून घेत होता व चळवळीला विविध क्षेत्रातील नवनवे कार्यकर्तेमिळवून दिले.

महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलनाचा कायदा व्हावा म्हणून तुम्ही एकोणीस वर्षे सातत्याने पाठपुरावा करीत राहिला. हा कायदा व्हावा म्हणून तुम्ही ज्या चिवटपणे, समतोल ढळू न देता लढत राहिला तो तुमचा संघर्ष आम्ही जवळून बघितला. तुम्ही उपाशी- तापाशी विधानसभेच्या आवारात, मंत्रालयात तासन्‌तास अनेकांशी चर्चा करून या कायद्याचे महत्त्व अनेकांना पटवून देत असत. कायद्याच्या समर्थनार्थ तुम्ही गावोगावी परिषदा घेतल्या, हजारो व्याख्याने दिली.. शेवटपर्यंत तुम्ही प्रबोधनाचा जागर करीत राहिले....तुमचा आवाज आणि तुमचा विचार लोकांना भावतोय, हे लक्षात येताच डॉक्टर तुम्हाला संपविण्याचा कट रचण्यात आला.

डॉक्टर... तुम्ही गेलात आणि पुन्हा एकदा 'स्यूडो सायन्स'चा बोलबाला सर्वच क्षेत्रात दिसू लागला आहे. पुन्हा फलज्योतिषाचा अभ्यासक्रमात समावेश होऊ घातला आहे. राज्यकर्ते महंतशाहीला शरण जात आहेत.. नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून नवनवीन अंधश्रद्धा समाजात जन्माला येत आहेत...तुमचे कार्यकर्ते 'शाहू-फुले-आंबेडकर, आम्ही सारे दाभोलकर' अशा घोषणा देऊन कृतिशील चळवळ नेटाने पुढे नेत आहेत. समाजात जी-जी बाब खटकते, त्यावर 'बुडते हे जग, न बघवे ते कारणे' या सूत्रानुसार संतांचा सामाजिक सुधारणेचा वारसा पुढे नेण्याचे काम आम्ही कार्यकर्ते करीत आहोत...

खरं सांगू का डॉक्टर... तुम्ही लिहिलेल्या 'विवेकाची पताका घेऊ खांद्यावरी' या शीर्षकाप्रमाणे विवेकाची पताका खांद्यावर घेऊन कार्यकर्ते प्रत्येक तालुक्यात अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचे काम करीत आहेत. तुम्ही आमच्यातच आहात... तुम्ही गेला नाहीत... तुमचे विचार पुस्तकरुपाने, ध्वनिमुद्रित व्याख्याने, तुमचे विविधांगी लेखन, वार्तापत्र मासिकाच्या माध्यमातून डॉक्टर... तुम्ही प्रत्येक कार्यकर्त्याजवळ जिवंत आहात...

डॉक्टर.. तुम्ही अंगीकारलेली चार्वाक, बुद्धाच्या वैज्ञानिक दृष्टीची, गांधींच्या निर्भयतेची आणि संत-समाजसुधारकांच्या नीतीची ही वाट खरंच माणसाला माणूस बनवणारी, विवेकवादी विचारांची वाट आहे... या वाटेवरील सनातन्यांना आव्हान देत तुम्ही तुमच्या बलिदानाने आमच्यासाठी आदर्श निर्माण करून ठेवला आहे...तो आम्ही कधीच विसरणार नाही...


**तुमच्या विचारांचा कार्यकर्ता**
**नरेंद्र लांजेवार, बुलडाणा**
संपर्क नंबर ९४२२१ ८०४५१


□

डॉ. हमीद दाभोलकर

आपल्या धर्माचे/जातीचे/वर्णाचे वर्चस्व प्रस्थापित करणे हा भावनिक कट्टरपंथीय मने घडवणाऱ्या लोकांचा मुळातला हेतू असतो. बहुतांश वेळा यामधील तरुण-तरुणी निम्नस्तरांमधून येतात; पण युरोप आणि अमेरिकेत उच्चशिक्षित तरुण-तरुणी देखील या प्रक्रियेला बळी पडलेल्या दिसून येतात.

आपल्या आजूबाजूची प्रत्येक परिस्थिती ही काळ्या किंवा पांढऱ्या अशा दोनच रंगांत पाहण्याचे प्रशिक्षण यामध्ये दिले जाते. कुठल्याही घटनेचे सूक्ष्म पदर अजिबात लक्षात घेऊ दिले जात नाहीत. आपले ते सर्व चांगले आणि दुसऱ्याचे ते सर्व वाईट अशी ही विभागणी असते.

# कट्टरपंथीय मन घडविण्याची 'रेसिपी'




धर्म, जात, वंश, पंथ यांच्या नावावर लोकांची मने अधिकाधिक कट्टरपंथी बनवली जात असलेल्या कालखंडात आपण सगळे जगत आहोत, असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. अमेरिकेसारख्या देशात गोऱ्या रंगाची त्वचा असणे हे काळ्या रंगाची त्वचा असण्यापेक्षा किती महत्त्वाचे आहे, यावरती टोकाची मतभिन्नता निर्माण झालेली आपल्याला दिसते. ब्रिटनसारखा देश याच मानसिकतेमधून 'युरोपियन युनियन'च्या एका भव्य म्हणाव्या अशा सामुदायिक निर्णयप्रक्रियेमधून बाहेर पडतो. मध्य-पूर्वेतील देशांमध्ये इस्लामच्या नावावर धार्मिक कट्टरपंथीय विचारधारा अधिकाधिक प्रबळ होताना दिसते आणि भारतासारख्या देशात देखील हिंदुत्वाच्या नावावर राजकारण करणारा पक्ष सत्तेमध्ये राहून याच स्वरुपाची विचारधारा पुढे रेटताना दिसतो.

या सगळ्या घटनांमध्ये आपापल्या समूहाचे वर्चस्व निर्माण करण्यासाठी 'मी मोठा की तू मोठा' ही लढाई टोकदार केली जाते. त्याचबरोबर आपले सर्व पाठीराखे हे आपल्या विचारधारेचे अधिक कट्टर समर्थक कसे बनतील, यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न केले जातात. सोशल मीडियाचा वाढता प्रभाव हा देखील भावनिक कट्टरपंथीय मने घडवण्यासाठी मोठ्या प्रमाणात वापरला गेलेला आपल्याला दिसत आहे.

जसे मानवी मन अधिक विचारी आणि चिंतनशील बनावे, म्हणून मानवी स्वभावाच्या अभ्यासाचा वापर करून काही निष्कर्ष काढले जातात, तसेच मानवी मन आणि स्वभाव अधिक कट्टरपंथीय बनवण्यासाठी देखील अगदी पद्धतशीर प्रकारे प्रयत्न केले जाताना दिसत आहेत.

डॉ. नरेंद्र दाभोलकर, कॉम्रेड गोविंद पानसरे, प्रा. एम. एम. कलबुर्गी आणि गौरी लंकेश यांच्या खुनासाठी याच पद्धतीने माणसे हेरून, त्यांना कट्टरपंथीय बनवण्याची प्रक्रिया अगदी पद्धतशीरपणे राबवली गेली. आज या चारही खुनांच्या मध्ये आरोपपत्र दाखल झाले असल्याने ही प्रक्रिया कशी घडवली जाते, याविषयी अनेक गोष्टी आपल्या लक्षात येऊ शकतात.

जसे एखादी मोठी कंपनी आपल्या कामासाठी नियोजनबद्ध प्रक्रिया राबवून आवश्यक क्षमता असलेले लोक भरती करते, त्याच प्रमाणे ही प्रक्रिया राबवली जाते.

आपली जात /धर्म/वर्ण /वर्ग यांच्याविषयी अभिमान वाटणारा एक मोठा वर्ग हा कायमच समाजात असतो. स्वत:च्या कर्तृत्वापेक्षा आपली जात/धर्म/वर्ण/वर्ग यांच्या मोठेपणाच्या कल्पनांच्या माध्यमातून 'स्व'च्या मोठ्या असण्याच्या कल्पना कुरवाळत बसणे हे त्या वर्गातील लोकांना सोयीचे वाटत असते. भावनिक कट्टरपंथीय निर्माण करण्याचे मनसुबे बाळगणारे लोक हे प्रामुख्याने या समूहांमधून आपले काम करण्यासाठी लोक निवडतात.

'हिंदू खतरे में' किंवा 'मुसलमान खतरे में' अशा स्वरुपाचा आपला समुदाय हा अन्यायाचा कसा बळी आहे, हा संदेश अशा लोकांना सहज आपलासा वाटू शकतो. त्यामधून एका बाजूला

स्वत:च्या गटाविषयी टोकाची आत्मीयता आणि विरोधी गटाविषयी राग आणि द्वेष या भावना निर्माण होऊ लागतात. या भावनांना बळ मिळेल अशा स्वरुपाचे संदेश हे परत-परत वरील वर्गाला दिले जातात.

स्वकर्तृत्वावरती फारसा विश्वास नसणे, समाजातील मान्यताप्राप्त निकषांनुसार यशस्वी होण्याची शक्यता नसणे, यामधून स्वत:विषयी कमीपणाची भावना निर्माण झालेला एक वर्ग समाजात असतो. या वर्गातील युवक-युवतींना वरील प्रक्रियेमधून जाताना अचानक त्यांचे स्वत:चे महत्त्व वाढल्यासारखे वाटायला लागते. आयुष्याला एक उद्दिष्ट मिळाल्यासारखे वाटायला लागते आणि आपण वापरले जात आहोत, हे लक्षात येईपर्यंत खूप उशीर झालेला असतो.

अमर्याद सत्ता आणि मोठेपण यांचे मानवी मनाला कायमच आकर्षण असते. आपल्याला रास्त मार्गाने ते मिळणार नसले तर आपण ते हिसकावून घ्यायला हवे, अशी भावना हळूहळू या समूहात रुजवली जाते. 'भारत विश्वगुरू बनणार आहे', 'मेकिंग अमेरिका बिग अगेन' अशा स्वरुपाच्या घोषणा त्याला खतपाणी घालतात.

आपल्या धर्माचे/जातीचे/वर्णाचे वर्चस्व प्रस्थापित करणे हा भावनिक कट्टरपंथीय मने घडवणाऱ्या लोकांचा मुळातला हेतू असतो. बहुतांश वेळा यामधील तरुण-तरुणी निम्नस्तरांमधून येतात; पण युरोप आणि अमेरिकेत उच्चशिक्षित तरुण-तरुणी देखील या प्रक्रियेला बळी पडलेल्या दिसून येतात.

आपल्या आजूबाजूची प्रत्येक परिस्थिती ही काळ्या किंवा पांढऱ्या अशा दोनच रंगांत पाहण्याचे प्रशिक्षण यामध्ये दिले जाते. कुठल्याही घटनेचे सूक्ष्म पदर अजिबात लक्षात घेऊ दिले जात नाहीत. आपले ते सर्व चांगले आणि दुसऱ्याचे ते सर्व वाईट अशी ही विभागणी असते. एकदा सगळ्या गोष्टी काळे किंवा पांढरे अशा दोनच रंगांमध्ये बघायची सवय लागली की त्याला पुढे गुन्हेगारी कृत्याची जोड देणे, हे तुलनेने सोपे होते.

या प्रवाहात आलेल्या व्यक्तीकडून आपल्या धर्माचे/पंथाचे /जातीचे काम म्हणून छोटा-मोठा गुन्हा करवून घेतला जातो आणि त्यानंतर त्या व्यक्तीचे सामान्य जीवन जगण्याचे मार्ग हळूहळू अवघड होऊ लागतात. गुन्हेगारी टोळ्या किंवा दहशतवादी गटांनी अनेक वर्षे या स्वरुपाच्या पद्धती वापरत आणलेल्या आहेत. समाजाच्या मुख्य प्रवाहातील संस्था-संघटना देखील या पद्धती वापरू लागल्याने निर्माण होणारी परिस्थिती अधिक आव्हानात्मक होऊ लागली आहे. आपल्या आजूबाजूला असलेली कोणीही व्यक्ती या प्रक्रिया राबवणाऱ्या लोकांच्या संपर्कात येऊ शकते आणि त्यामध्ये ओढली पण जाऊ शकते, हा त्यामधील मोठा धोका आहे. '...गोली मारो सालोंको' अशा स्वरुपाच्या घोषणा सहज दिल्या जातात. अशा प्रकारच्या हिंसेचे समर्थन एकदा बोलण्यात होऊ लागले की ते कृतीत उतरणे, हे केवळ एक पुढचे पाऊल राहते.

मग प्रश्न असा उरतो की, देशाचा जबाबदार नागरिक म्हणून आपण या परिस्थितीला कसे सामोरे जावे? पहिली आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपण जन्माने कुठल्याही धर्म/जात/प्रांत यांचे असलो, तरी या देशाचे संविधान त्याच्या प्रत्येक नागरिकाला विधायक कृतिशील चिकित्सा करण्याचे जे स्वातंत्र्य देते, ते आपण मान्य केले पाहिजे. चिकित्सेच्या प्रत्येक प्रयत्नावर धर्मद्रोहाचा आरोप करणे आपण थांबवले पाहिजे. छोट्या-छोट्या गोष्टींवरून भावना दुखावण्याचा जो आजार आपल्या मनाला होऊ लागला आहे, त्यापासून स्वतःची सुटका करून घेतली पाहिजे.

दुसरी तितकीच महत्त्वाची गोष्ट आहे - स्वतःच्या आणि आपल्या कुटुंबीयांच्या मनामध्ये धर्माची चिकित्सा करणारे प्रश्न निर्माण झाले तर त्याची मोकळेपणाने चर्चा करणे. बहुतांश वेळा आपण हे प्रश्न मनातच ठेवतो. कारण आपल्याला हे माहीत असते की, आपण हे प्रश्न विचारायला लागलो तर कदाचित त्याची फार मोठी किंमत आपल्याला मोजावी लागेल. कदाचित ते सगळे मिळून आपल्या अंगावर येतील. त्याने आपण गप्प बसलो नाही तर आपल्याला दुसऱ्या धर्माचा हस्तक ठरवतील. यानंतर देखील आपण थांबलो नाही तर धमक्यांची पत्रे पाठवतील आणि याही नंतर आपण थांबलो नाही तर कदाचित आपला 'डॉ. नरेंद्र दाभोलकर' देखील करतील, म्हणून अनेक गोष्टी खटकत असूनही आपण बोलायचे टाळतो; आणि बरोबर याचमुळे अंधाराच्या या रखवालदारांचे फावते. भले आपण सार्वजनिक व्यासपीठांवरून हे बोलू शकणार नाही; पण आपल्या कुटुंबात, मित्रमंडळींमध्ये, सहकाऱ्यांबरोबरील चर्चेमध्ये आपण धर्माच्या नावावर अधर्म पसरविण्याच्या प्रयत्नांना प्रश्न विचारले पाहिजेत, सोशल मीडियावरील चर्चेमध्ये असे प्रश्न मांडले पाहिजेत. या समाजातील बहुतांश माणसे धार्मिक असली तरी सहिष्णू आणि चिकित्सा स्वीकारणारी आहेत, हे वास्तव आपण समजून घेतले पाहिजे. या देशामधील धार्मिक कडवेपणाला रोखण्याचे काम याच समूहाने आजवर प्रामुख्याने केले आहे, हे आपण विसरता कामा नये.

यासंदर्भात शासनाची देखील भूमिका महत्त्वाची आहे. अशा स्वरुपाच्या गुन्ह्यांचे सामाजिक स्वरूप लक्षात घेता ते हाताळताना यामध्ये सहभागी लोकांना भावनिक, सामाजिकशास्त्रांच्या आधुनिक अभ्यासाचा वापर केला गेला पाहिजे. अनेक प्रगत देशांमध्ये कट्टरपंथीय बनलेल्या तरुण-तरुणींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी वेगळे पुनर्वसन प्रकल्प राबवले जातात आधुनिक मानसशास्त्र आणि समाजशास्त्रीय पद्धतींचा वापर त्यामध्ये केला जातो. अशा गोष्टींचा देखील आपल्या येथे प्रयोग करणे आवश्यक आहे. मानवी मनातील मूलभूत चांगल्या आणि वाईट भावनांमधील ही लढाई असल्याने ती आपल्याला दीर्घकाळ लढायला लागणार आहे, याची आपण नोंद घ्यायला हवी.


**Email : hamid.dabholkar@gmail.com**

◆◆

# आत्मभान आणि समानुभूती

डॉ. चित्रा दाभोलकर

**आस्था वाटणे हे मनोसामाजिक कौशल्य समजले जाते. दुसऱ्याविषयी करुणा वाटणे किंवा त्या व्यक्तीची परिस्थिती/स्थिती बघून सहानुभूती वाटणे म्हणजे सहानुभूती नव्हे; तर दुसऱ्याच्या स्थितीचे पूर्ण आकलन झाल्यावर त्याच्या दृष्टिकोनातून, त्याच्या परिस्थितीकडे बघण्याची क्षमता किंवा कौशल्य असेल, तर त्याला 'संज्ञानात्मक आस्था' म्हणतात. समाजातील दुर्बल किंवा शोषित गटाच्या समस्या समजून घेताना हे कौशल्य अंगी रुजवण्याची आवश्यकता आहे. समाज एकत्रित गुण्यागोविंदाने राहण्यासाठी सर्वसमावेशकता अपेक्षित असेल, तर त्यासाठी प्रथम सर्वांप्रती संज्ञानात्मक आस्था असण्याची नितांत गरज आहे.**




एका प्रथितयश शाळेतील नववीच्या मुलीने आत्महत्या केली, दहावीच्या परीक्षेत नापास होऊ, या भीतीने एका विद्यार्थ्याने घरातून पलायन केले, वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी अशा व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्याची आत्महत्या... अशा अनेक बातम्यांनी दैनिक, वृत्तपत्रांचे रकाने भरले असतात. रोज एखाद-दुसरी तरी बातमी असतेच. या किशोरवयीन मुलांच्या समस्या सोडवायच्या असतील, तर या मुलांचा जीवनाकडे बघायचा दृष्टिकोन बदलणे जेवढे महत्त्वाचे आहे, तेवढेच मुलांना आयुष्यात येणाऱ्या कठीण प्रसंगांना सामोरे जाण्यासाठी जीवनकौशल्य शिकवणे आवश्यक आहे. जीवनकौशल्ये ही मनोसामाजिक कौशल्ये आहेत. आपण प्रथम या जीवनकौशल्य शिक्षणाची निकड बघितली. त्यातील आत्मभान आणि आस्था किंवा सहानुभाव या जीवनकौशल्यांविषयी या प्रस्तुत लेखात सखोलपणे पाहूया.

आत्मभान म्हणजे 'स्व'ची जाणीव. प्रत्येक माणसाला स्वत:च्या शारीरिक आणि मानसिक क्षमतांचे भान असणे आवश्यक आहे; तसेच स्वत:च्या भावना, वृत्ती समजून घेता येणेही आवश्यक आहे.

प्रत्येक माणसाने स्वत:ला नीट समजून घेतलं, तर वैयक्तिक समस्या खूप कमी होतील; पण स्वत:ला समजून घ्यायचे म्हणजे नक्की काय? तर आपण काय करू शकतो, आपल्या क्षमता काय आहेत, आपल्यात काय चांगले गुण आहेत, काय दोष आहेत, आपल्या उणिवा काय आहेत, आपली वृत्ती कशी आहे, स्वभाव कसा आहे, आपले आवडीचे क्षेत्र काय आहे, त्याचा धांडोळा घेणे. स्वत:ला समजून घेताना; म्हणजेच आत्मभान जागवताना डोळसपणे आपली बलस्थाने ओळखणे जेवढे महत्त्वाचे आहे, तेवढीच आपल्यातील कमतरता किंवा न्यून ओळखून ती कशी कमी करता येईल आणि त्यावर कशी मात मिळवता येईल, हे समजून घेणेही तेवढेच आवश्यक आहे. आपल्या मर्यादा ओळखता येणे हे पण कौशल्य आहे. स्वत:मधले गुण ओळखून त्यांचे संवर्धन करणे आणि दोष ओळखून ते कमी कसे करता येतील, यावर कष्ट घेणे माणूस म्हणून स्वत:ला घडवताना आवश्यक आहे.

स्वत:ला समजून घेताना आपल्या आवडी-निवडी काय आहेत, याची जाणीव असणेही महत्त्वाचे आहे. मला एखादी गोष्ट करायला आवडते; परंतु मला जमत नाही, अशा गोष्टींची जाणीव असावी. आपल्या काय करायला आवडतं आणि काय करायला आवडत नाही, हे सुद्धा माहीत असणे महत्त्वाचे आहे. कित्येक वेळा आवडी-निवडी या लिंगसापेक्ष असतात आणि त्यांच्या पाठीमागचे कारण सांस्कृतिक असू शकते. काही गोष्टी मुलीनेच करायच्या आणि काही गोष्टी मुलांनीच करायच्या, असे आपल्याला शिकवले जाते. परंतु आत्मभान जागवताना आपल्याला आतून काय करावेसे वाटते, याची जाणीव असणे खूप महत्त्वाचे आहे; आणि म्हणूनच आपण स्वत:ला जेव्हा समजून घेतो, तेव्हा निरपेक्षपणे विचार करण्याचे कौशल्य आत्मसात करणे गरजेचे ठरते. आपला कल ओळखून आत्मविकास साधणे योग्य ठरते. त्यामुळे आपल्या आवडीचे क्षेत्र आपल्याला ओळखता येते आणि जीवनाचा खरा अर्थ कळू शकतो.

जगात यशस्वी माणसाची गणना करताना फक्त

आर्थिकदृष्ट्या यशस्वी, सामाजिकदृष्ट्या यशस्वी किंवा लौकिकार्थाने विविध क्षेत्रांतील प्रसिद्धी मिळालेल्या माणसांची यादी तयार केली जाते. परंतु खूप शिकलेला, खूप पैसे मिळवलेला, खूप प्रसिद्ध झालेला माणूस खऱ्या अर्थाने यशस्वी असतो, असे नाही. आनंदी, समाधानी, तृप्त आणि संतुलित व्यक्तिमत्त्व असलेला माणूस हा खरं तर आयुष्यात यशस्वी असतो. स्वत:ला समजून घेणे हे एक कौशल्य आहे. आपल्या क्षमता जाणून घेणे फार आवश्यक आहे. त्यासाठी औपचारिक शिक्षणाची गरज नसते, ते शिकून घेण्याजोगे कौशल्य आहे. अगदी बालवयापासून हे कौशल्य मुलांमध्ये रुजवले पाहिजे.

आपल्या आवडी-निवडी बदलू शकतात; नव्हे बदलतातच. त्या स्थल-काळ-वेळपरत्वे बदलत असतात, हे जाणून घेतले पाहिजे. स्वत:ला समजून घेताना नेहमी सकारात्मक असले पाहिजे. आपल्यामध्ये घडून येणारे बदल (चांगले आणि वाईट) आपल्याला जाणवतात, तेव्हा त्याकडे अलिप्तपणे बघता येण्याचे कौशल्य आत्मसात करता आले पाहिजे.

दुसरे जीवनकौशल्य म्हणजे आस्था किंवा समानुभूती (सहानुभाव). दुसऱ्या व्यक्तीला तिच्या दृष्टिकोनातून समजून घेण्याचे कौशल्य म्हणजे आस्था. दुसऱ्याची मन:स्थिती आणि दृष्टिकोन किंवा परिस्थिती समजून घेण्यासाठी आपल्याला तिच्या पार्श्वभूमीचे समग्र आकलन असावे लागते. करुणा किंवा सहानुभूती म्हणजे आस्था नव्हे.

आस्था वाटणे हे मनोसामाजिक कौशल्य समजले जाते. दुसऱ्याविषयी करुणा वाटणे किंवा त्या व्यक्तीची परिस्थिती/स्थिती बघून सहानुभूती वाटणे म्हणजे सहानुभूती नव्हे; तर दुसऱ्याच्या स्थितीचे पूर्ण आकलन झाल्यावर त्याच्या दृष्टिकोनातून, त्याच्या परिस्थितीकडे बघण्याची क्षमता किंवा कौशल्य असेल, तर त्याला 'संज्ञानात्मक आस्था' म्हणतात. समाजातील दुर्बल किंवा शोषित गटाच्या समस्या समजून घेताना हे कौशल्य अंगी रुजवण्याची आवश्यकता आहे. समाज एकत्रित गुण्यागोविंदाने राहण्यासाठी सर्वसमावेशकता अपेक्षित असेल, तर त्यासाठी प्रथम सर्वांप्रती संज्ञानात्मक आस्था असण्याची नितांत गरज आहे. तसेच भावनात्मक आस्था म्हणजे दुसऱ्याच्या भावना त्याच्या दृष्टिकोनातून समजून घेण्याचे कौशल्य. दुसऱ्याच्या भावनांचे आकलन होणे, दुसऱ्याच्या दु:खाने विव्हळ होणे, दुसऱ्याच्या कठीण प्रसंगात मनापासून मदत करावी वाटणे, या साऱ्या गोष्टी भावनात्मक आस्था असलेली व्यक्ती करते. दैनंदिन आयुष्यात क्षणोक्षणी आढळणारे अनेक छोटे-मोठे संघर्ष हे समानुभूतीच्या कौशल्याच्या अभावामुळे घडत असतात, हे समजून घेतले पाहिजे. दुसऱ्याचा विचार करताना आपण उच्चासनावर बसायची गरज नसते. उलटपक्षी दुसऱ्याच्या जागी स्वत:ला ठेवून विचार करण्याची क्षमता जेव्हा माणसाच्या ठायी निर्माण होते; म्हणजेच 'समानुभूती'चे कौशल्य अंगी बाणविले जाते, तेव्हा अनेक संघर्ष टाळणे सोपे जाते.

दैनंदिन आयुष्यातील नातेसंबंधांतील तेढ, स्त्री-पुरुष असमानता, वर्णभेद, धर्मभेद, जातिभेद, बौद्धिक वर्चस्व, गरीब-श्रीमंत भेदाभेद अशा समाजातील अनेकविध समस्यांच्या मुळाशी एकमेकांना समजून घेण्यातील कमतरता असते. इथे समानुभूतीच्या कौशल्याचे महत्त्व अधोरेखित होते.

समानुभूतीचे कौशल्य अंगी असलेली माणसे इतरांशी चांगल्याप्रकारे जुळवून घेऊ शकतात, त्यांच्याशी मैत्र जुळवता येते, सुरक्षित वाटते, भावनिक जवळीक वाटते. अशी माणसे गरजा समजून घेतात, चर्चा घडवून आणतात; तसेच ही माणसे निर्मितीक्षम असतात. समानुभूतीचे कौशल्य जनुकीय आहे, हे सिद्ध झाले आहे. स्त्रियांमध्ये ते अधिक प्रमाणात आढळते.

आत्मभान आणि आस्था ही दोन्ही जीवनकौशल्ये जागतिक आरोग्य संघटनेने अधोरेखित केलेल्या १० मनोसामाजिक कौशल्यांमधील महत्त्वाची कौशल्ये आहेत.

– **डॉ. चित्रा दाभोलकर** (बालरोग तज्ज्ञ)

## भूतबाधेच्या नावावर विवाहितेवर अत्याचार; नागपूरच्या मांत्रिकाला अटक

सासरची संपत्ती हडपून आपली आर्थिक परिस्थिती सुधारण्याच्या लालसेपोटी पतीने मांत्रिकाच्या संगनमताने पत्नीवर अमानुष अत्याचार करण्याची घटना नागपूरपासून जवळच असलेल्या रनाळा या गावी उजेडात आली.

पती श्रीकांत कुंभलकर याने आपला मांत्रिक नातेवाईक मनीष वंजारी याच्या दरबारात पत्नीला बळजबरीने नेले. मांत्रिकाने अंगारा व पेढा खायला देताच पत्नी सुनंदाला (बदललेले नाव) चक्कर व गुंगी यायला लागली. मांत्रिकाच्या अंगात कालीमाता संचारली व सुनंदाला बाहेरची भूतबाधा लागल्याचं सांगून तिच्याशी अश्लील चाळे व अत्याचार सुरू झाले. 'आईकडे अजिबात जायचं नाही, गेल्यास तुझ्या मुलाचा जीव जाईल,' अशी भीती मांत्रिकाने घातली. मांत्रिकाच्या दरबारात वाऱ्या सुरू झाल्या. अंगात कालीमाता आल्याचं भासवून मांत्रिक मनीष पतीसमोरच शिव्याशाप व अश्लील चाळे करायचा. अंगारे-धुपारे व गुंगीमुळे सुनंदाची प्रकृती दिवसेंदिवस ढासळू लागली. मुलीची प्रकृती बघून आईने नऊ तोळे सोनेही दिले. पण सुनंदाची दशा बघून आईला संशय आला. तिने मुलीची आस्थेने विचारपूस केली व सुनंदाने रडून-रडून सर्व आपबीती कथन केली व लागलीच मुलीला घेऊन यशोधरानगर पोलीस ठाणे गाठून एफआयआर सादर केली.

ही वार्ता कानावर पडताच 'महाअंनिस'चे राज्य सदस्य रामभाऊ डोंगरे यांनी उत्तर नागपूर शाखेचे कार्याध्यक्ष चित्तरंजन चौरे यांना सोबत घेऊन पोलीस निरीक्षक राजेंद्रकुमार सानप यांची भेट घेऊन या प्रकरणात सर्वतोपरी सहकार्य करण्याची हमी दिली. शाखेच्या कार्यकर्त्या श्वेता पाटील यांना पीडितेच्या घरी पाठवून सहानुभूतिपूर्वक विचारपूस करून मदतीचे आश्वासन दिले.


मुख्य आरोपी मांत्रिक मनीष वंजारी व पीडितेचा पती श्रीकांत याच्यावर गु. क्र ४४२/२१अंतर्गत नोंद करून जादूटोणाविरोधी कायदा कलम ३ द्वारे; तसेच कलम ३७७, ४९८ए, ३२३ ३५४ए, ५०४, ५०६(२) व ३४ अंतर्गत अटक करून पोलीस कोठडीत रवानगी केली आहे.

**–चित्तरंजन चौरे,** कार्याध्यक्ष उत्तर नागपूर.

डॉ. नितीश नवसागरे

लोकशाहीमध्ये सरकारच्या धोरणांचे समर्थन प्रत्येक नागरिक करेलच असे नाही. सरकारी धोरणांवरती, सरकार पक्षावरती व कधी कधी सत्तेतील लोकांवरती टीका व टिप्पणी होत राहणार. नापसंती व्यक्त केली म्हणून एखाद्यावरती राजद्रोहाचा खटला टाकणे म्हणजे लोकशाहीचा गळा आवळणे होय. होते असे की, सरकार पक्षातील लोक निंदकांना शत्रू समजतात. सरकार विरोधकांना/ निंदकांना शत्रू समजायला लागले तर त्यांच्यासोबत खुनशी व्यवहार करणार. २०१४ मध्ये मोदी सरकार आल्यानंतर राजद्रोहाच्या कलमाखाली ५५९ जणांना अटक करण्यात आली. आजवर त्यातले फक्त दहाजण या कलमाखाली दोषी ठरले.

# राजद्रोहाचा कायदा काही निरीक्षणे




नुकतेच सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला देशद्रोहाच्या कायद्यावरती प्रश्न उपस्थित केले.सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा यांनी केंद्र सरकारला- ब्रिटिश राजवटीत अमलात आलेल्या राजद्रोहाच्या कायद्याच्या गैरवापरामुळे त्याचे उपद्रवमूल्यच जास्त झाल्याने तो रद्द का करीत नाहीत असा प्रश्न केला. या कायद्याचा उपयोग स्वातंत्र्य चळवळ चिरडून टाकण्यासाठी केला जात होता. सद्य काळात या कायद्याचा पुनर्विचार करण्याची वेळ आली असल्याचे मत व्यक्त करत या कायद्याबाबत केंद्र सरकारकडून न्यायालयाने मत मागितले आहे. राजद्रोह कायद्याला आव्हान देणाऱ्या अनेक याचिका सर्वोच्च न्यायालयात असून त्यापैकी 'एडिटर्स गिल्ड ऑफ इंडिया' व 'माजी निवृत्त मेजर जनरल एस. जी. वोम्बटकेरे' यांनी दाखल केल्या याचिकेवरच्या सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश एन. व्ही. रमण्णा यांच्या नेतृत्वाखाली पीठाने हा सवाल केला.

जेव्हा दस्तुरखुद्द सरन्यायाधीशच एखाद्या कायद्याच्या उपयुक्ततेबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित करतात, तेव्हा कायद्याच्या अशा तरतुदींबद्दल उलटसुलट चर्चा होणे स्वाभाविक आहे व म्हणूनच पुन्हा एकदा राजद्रोहाचा कायदा चर्चेला आला आहे. 'राजद्रोह' आणि 'देशद्रोह' या दोन स्वतंत्र संकल्पना आहेत. राजद्रोह म्हणजे सारी सत्ताव्यवस्थाच उलथवून लावण्यासाठी प्रयत्न करावयाचे आणि देशद्रोह म्हणजे राष्ट्र या संकल्पनेशीच विविध मार्गांनी वैर करून युद्ध छेडायचे. नेहमीच राजकीय विरोधकांना दहशतीखाली ठेवण्यासाठी सढळ हाताने हा गुन्हा लादल्याचे दिसून येते. राजद्रोहाच्या या कायद्याचे मूळ ब्रिटनमध्ये आहे. ब्रिटनमध्ये इंग्लंडचा राजा पहिला चार्ल्स याची ३० जानेवारी १६४९ रोजी हत्या झाली आणि क्रॉमवेलने सत्ता हाती घेतली. ११ वर्षांनी क्रॉमवेल मरण पावल्यानंतर, वडिलांच्या हत्येनंतर परागंदा झालेला दुसरा चार्ल्स लंडनला परतला आणि १६६० मध्ये गादीवर बसला. त्यानंतर एकाच वर्षाने, म्हणजे १६६१ मध्ये ब्रिटिश संसदेने अत्यंत कठोर असा 'राजद्रोहा'चा कायदा मंजूर केला. प्रत्यक्ष बंड तर सोडाच, बंडाची भाषा हाही राजद्रोह समजून कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली. नंतर २०१० मध्ये स्वत: ब्रिटनमध्ये राजद्रोहाचा कायदा संपुष्टात आणण्यात आला.

'ईस्ट इंडिया कंपनी'ने भारतामध्ये आगमन केल्यानंतर कंपनीने इंग्रजी कायद्याच्या आधारावरती भारतामध्ये कारभार करण्यास सुरुवात केली. १८५७ ला पहिला स्वातंत्र्य लढा झाला व पुढे १८५८ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीकडून कारभार राणीकडे आला. ब्रिटिशांनी 'भारतीय दंडविधान संहिता' म्हणजेच 'आय. पी. सी.' १८६० साली अमलात आणले. भारतीय दंडविधान मध्ये १८७० साली दुरुस्ती करून कलम १२४-अ चा समावेश करण्यात आला व 'राजद्रोह' म्हणजे 'सिडिशन' या गुन्ह्याचा अंतर्भाव कायद्यात करण्यात आला. हा कायदा आणला गेला होता, वहाबी लोकांचे बंड मोडून काढण्यासाठी; परंतु आज स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही या कायद्याचा अंमल चालू आहे. स्वातंत्र्य सैनिकांविरुद्ध वापरला गेलेला हा कायदा स्वतंत्र भारतामध्ये नागरिकांविरुद्ध वापरला जात आहे.

देशात भारतीय दंड विधानाच्या कलम १२४ (अ) अंतर्गत राजद्रोहाची परिभाषा सांगितली गेली आहे. या कलमानुसार, एखाद्या

व्यक्तीने बोलून, लिहून, संकेताद्वारे वा इतर माध्यमांतून सरकारविरुद्ध अवमानकारक भाष्य केले असेल किंवा भडकावले असेल तर तो राजद्रोह आहे. हा अजामीनपात्र गुन्हा आहे व यात जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

**स्वातंत्र्यपूर्व काळातील राजद्रोहाचे महत्त्वाचे खटले :**

राजद्रोहाच्या कायद्यांतर्गत पहिले प्रकरण १८९१ मध्ये बंगालमधील जोगेंद्रचंद्र बोसवर दाखल केले गेले. 'सहमती कायद्या' विरुद्ध बोस यांनी त्यांचे वृत्तपत्र 'बंगवासी' मध्ये लिखाण केले होते. तदनंतर ब्रिटिश सरकारने लोकमान्य टिळकांविरुद्धही या कायद्याचा वापर केला. लोकमान्य टिळकांविरुद्ध राजद्रोहाच्या आरोपाखाली दोनदा खटले (१८९७ व १९०८) भरण्यात आले. दोन्ही वेळेला त्यांना दोषी ठरविण्यात येऊन शिक्षा देण्यात आली.

६ जुलै १८९७ च्या 'केसरी'च्या अंकात टिळकांनी संपादकीय लिहिले – 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?', तर १३ जुलैच्या अंकात लिहिले – 'राज्य करणे म्हणजे सूड उगवणे नव्हे.' ही टीका सरकारला असह्य झाली होती. राजद्रोहाचे कलम १२४ (अ) हाताशी होते. त्यात 'सरकारबद्दल अप्रीती निर्माण करणे, हा राजद्रोह आहे,' असे लिहिले होते. परंतु एक मखलाशी होती. त्यात एक खुलासा केला गेला होता की, सरकार विरुद्ध कितीही कडक शब्दांत टीका केली गेली तरी हरकत नाही, परंतु त्या टीकेमध्ये सरकारची सत्ता नष्ट केली जाणार नाही, हे पाहिले गेले पाहिजे. लोकांना सरकारची सत्ता उलथवून टाकण्याची बुद्धी होईल, अशी टीका कोणी करता कामा नये. रँडचा खून झाल्यावर 'हे सरकार परक्यांचे आहे' असे म्हणणाऱ्या टिळकांवरती जरब बसवली गेली पाहिजे, असे ब्रिटिश सरकारला वाटू लागले. 'शिवाजीने अफझलखानाचा वध केला ते योग्य केले,' 'शिवाजीने रयतेस तलवारी उपसण्यास सांगितले,' अशा स्वरूपाची त्यांच्या लेखांतील विविध वाक्ये निवडून 'टिळक हिंसाचारास प्रोत्साहन देत आहेत आणि हा राजद्रोह आहे', असा प्रतिवाद न्यायालयासमोर केला गेला. ज्युरींमध्ये सहा इंग्रज आणि तीन लोक भारतीय होते. ज्युरींनी सहा विरुद्ध तीन अशा बहुमताने टिळक दोषी आहेत, असा निवाडा दिला. न्यायमूर्ती स्ट्रॅची यांनी तो स्वीकारला. टिळकांना १८ महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा झाली. मॅक्समुल्लर यांनी टिळकांच्या सुटकेची विनंती राणीला केली व अखेर ५१ आठवड्यांची सजा भोगून टिळक तुरुंगाबाहेर पडले. पुढे १९०८ साली टिळकांवर राजद्रोहाचा दुसरा खटला झाला. 'देशाचे दुर्दैव' आणि 'हे उपाय टिकाऊ नाहीत' हे दोन लेख या खटल्यासाठी वापरले गेले. 'कोंडले तर मांजरही अंगावर येते, मग बंगाली लोक बिथरले तर नवल काय?' आणि 'गरीब लोकही जुलमामुळे दंडेलीला उठतात' अशी वाक्ये 'हिंसाचाराला प्रोत्साहन देणारी वाक्ये' म्हणून या खटल्यात वापरली गेली. या खटल्यात टिळकांना सहा वर्षांची काळ्या पाण्याची शिक्षा देऊन मंडालेला पाठवण्यात आले. राजद्रोहाचा अन्वयार्थ करताना सरकारबाबत केवळ अप्रीती असणे पुरेसे नाही, तर त्या अप्रीतीपोटी केलेल्या टीकेमुळे सरकारविरुद्ध सशस्त्र उठाव किंवा बंड होण्याची शक्यता असावी लागते, असा युक्तिवाद टिळकांतर्फे करण्यात आला होता. परंतु हा युक्तिवाद न्यायालयाने स्वीकारला नाही.

या नंतर राजद्रोहाच्या कायद्याला आव्हान दिले ते महात्मा गांधी यांनी. त्यांच्या 'यंग इंडिया' या साप्ताहिकात गांधीजींनी तीन लेख लिहिले. त्यासाठी त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरण्यात आला. खटला उभा राहिला तेव्हा गांधीजींना विचारण्यात आले– 'आपल्यावर राजद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, तेव्हा हा गुन्हा आपल्याला कबूल आहे काय?' त्यावर गांधीजींनी – 'होय, मी दोषी आहे,' असे स्पष्टपणे सांगितले. पुढे ते म्हणाले की, राजद्रोहाचा कायदा हा दडपशाहीचा कायदा असल्याने मी त्याच्याविरुद्ध उभा राहिलो आहे. दडपशाहीसाठी जे जे कायदे आणले गेले आहेत, त्या सगळ्या कायद्यांमधला हा सगळ्यात दुष्ट कायदा आहे.' अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा गळा घोटण्यासाठी हा कायदा आणण्यात आला आहे, असे गांधीजींचे स्पष्ट मत होते.

**स्वातंत्र्योत्तर काळातील राजद्रोहाचे खटले :**

देश स्वतंत्र झाल्यानंतर राज्यघटनेचा अंमल चालू झाला. अनुच्छेद १९(१)(अ) नुसार 'अभिव्यक्ती स्वातंत्र्य' हा मूलभूत हक्क प्रत्येक भारतीय नागरिकास बहाल करण्यात आला. राजद्रोहाचे १२४ (अ) हे कलम अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या विरोधातच आणले गेले होते. त्यामुळे अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि राजद्रोहाचा कायदा यांची टक्कर कधीतरी होणारच होती. ही नौबत ताराचंद गोपीचंद प्रकरणात १९५१ साली आली. ताराचंद गोपीचंद केस ही स्वतंत्र भारतातील राजद्रोहाची पहिली केस. या केस मध्ये पंजाब उच्च न्यायालयाने निर्णय दिला की, राजद्रोहाचा कायदा हा अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या विरोधात जात आहे. राजद्रोहाचा कायदा रद्द करावा का, याचा विचार केला गेला. पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू या कायद्याच्या विरोधात होते. जेव्हा शेख अब्दुल्ला यांना महाराजा हरिसिंग यांनीही राजद्रोहाच्या आरोपाखाली अटक केली होती, तेव्हा जवाहरलाल नेहरू यांनी अब्दुल्ला यांचे वकीलपत्र घेतले होते. परंतु आता परिस्थिती थोडी निराळी होती. भारत एक नवीन राष्ट्र म्हणून उदयास येत होते. नुकतीच फाळणी झाली होती. अनेक संकटे देशासमोर उभी होती. त्यामुळे हा कायदा काही काळ तरी ठेवला जावा, असा विचार झाला. राजद्रोहाचा कायदा ठेवायचा निर्णय झाल्यावर अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि हा कायदा यात काहीतरी सांगड घालणे गरजेचे होते. ही सांगड पहिली घटनादुरुस्ती करून घातली गेली. पहिल्या घटनादुरुस्तीनुसार 'देशाच्या सुरक्षे'चा विचार करून नागरिकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर काही वाजवी बंधने घातली जाऊ शकतात. घटनादुरुस्तीनंतर राजद्रोहाच्या कायद्यासंदर्भात महत्त्वपूर्ण निवाडा हा 'केदारनाथ' विरुद्ध 'बिहार सरकार' होय. केदारनाथसिंह विरुद्ध बिहार सरकार हा निर्णय एक मैलाचा दगड मानला जातो. या खटल्याच्या निमित्ताने, राजद्रोहाचे कलम घटनाबाह्य आहे काय, हा प्रश्न १९६२ साली सर्वोच्च न्यायालयाच्या ५ सदस्यीय खंडपीठापुढे आला. केदारनाथसिंग फॉरवर्ड कम्युनिस्ट पार्टीचे पुढारी होते. त्यांनी काँग्रेस पक्षाविरुद्ध अर्वाच्य भाषण केले म्हणून त्यांच्यावरती राजद्रोहाचा खटला लादण्यात आला. 'सीआयडीचे कुत्रे इकडे–

तिकडे फिरत आहेत. या देशातून ब्रिटिश गेले, पण काँग्रेसच्या गुंडांनी सत्ता बळकावली. आम्ही अशा क्रांतीचा झंझावात आणू, की हे काँग्रेसवाले, भांडवलदार, जमीनदार उडून जातील,' असे भाषण केदारनाथ यांनी केले होते म्हणून त्यांच्यावरती राजद्रोहाचा आरोप ठेवला गेला. या प्रकरणात कोर्टाने राजद्रोहाच्या कलमाला घटनात्मक ठरवले. परंतु जमावाला भडकवण्यासाठी किंवा हिंसा घडवण्यासाठी एखादे भाषण केले गेले तर ते भाषण राजद्रोह ठरू शकते, असे म्हटले गेले. भाषणामुळे हिंसा होत नसेल तर हा राजद्रोहाचा आधार मानला जाऊ शकत नाही. सरकारबद्दल नागरिकांना जे वाटते ते लिहिण्याचा, बोलण्याचा अधिकार असल्याचे सुप्रीम कोर्टाने स्पष्ट केले. सार्वजनिक शांतता भंग करणे, हिंसा घडवण्याच्या उद्देशाने एखादे कृत्य केले गेले असेल तर राजद्रोहाचा गुन्हा घडतो असे कोर्टाने सांगितले. याशिवाय बलवंतसिंह विरुद्ध पंजाब सरकार प्रकरणातही १९९५ साली दिलेला सर्वोच्च न्यायालयाचा निकालसुद्धा महत्त्वपूर्ण आहे. इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर आनंद व्यक्त करताना या बलवंतसिंग नामक व्यक्तीने 'खालिस्तान जिंदाबाद'च्या घोषणा दिल्या होत्या म्हणून त्याच्यावर राजद्रोहाचा खटला लादण्यात आला. केवळ नारेबाजी केली म्हणजे राजद्रोहाचे प्रकरण होऊ शकत नसल्याचे कोर्टाने या निवाड्यात सांगितले. नारेबाजी करणे ही बाब सरकारविरुद्ध असंतोष पसरवण्याचा प्रयत्न असल्याचे मानले जाऊ शकत नसल्याचे कोर्टाने म्हटले.

### वास्तव परिस्थिती :

देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने राजद्रोहाचे कलम हे कधी लावावे/लावू नये याचे निकष घालून दिलेले असले तरीही, देशातील सगळ्याच राजवटीमध्ये; मग ती कोणत्याही राज्यातील असो, देशाच्या राज्यकर्त्यांवर टीका करणाऱ्या मंडळींवर व मानवाधिकार कार्यकर्त्यांवर राजद्रोहाचा गुन्हा विनाकारण दाखल करण्यात आल्याचे आढळून येते. मानवाधिकार कार्यकर्ते डॉ. विनायक सेन यांच्यावरती नक्षली विचारसरणीचा प्रसार करण्याच्या आरोपाखाली कलम १२४ अ नुसार २०१० साली खटला दाखल झाला. २०११ साली सेन यांना सुप्रीम कोर्टाने जामिनावरती सोडले. २०१० मध्येच लेखिका अरुंधती रॉय यांच्यावरती काश्मीरसंदर्भात एका परिसंवादामध्ये केलेल्या वक्तव्यासाठी राजद्रोहाचा गुन्हा दाखल केला गेला. जानेवारी २०१२ मध्ये अण्णा हजारे यांच्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनाने देशभर जोर पकडलेला असताना– 'इंडिया अगेन्स्ट करप्शन' या संघटनेच्या वतीने मुंबईच्या वांद्रे–कुर्ला संकुलात एक प्रदर्शन भरवले होते. त्या प्रदर्शनात असीम त्रिवेदी या राजकीय व्यंगचित्रकाराने रेखाटलेली देशाच्या सार्वभौम संसदेची सात तऱ्हेची वादग्रस्त चित्रेही समाविष्ट होती. या व्यंगचित्रणसाठी त्रिवेदी यांच्यावर राजद्रोहाचा गुन्हा दाखल केला होता. मुंबई उच्च न्यायालयाने त्रिवेदी यांची पाच हजार रुपयांच्या अंतरिम जामिनावर मुक्तता केली होती. या प्रकरणात महाराष्ट्र सरकारच्या महाधिवक्ता यांचे कायदेशीर मत आजमावल्यानंतर शासनाने त्रिवेदी यांच्यावरील राजद्रोहाचे आरोप मागे घेतले. तामिळनाडू सरकारने २०१२ मध्ये कुडनकुलम अणुऊर्जा प्रकल्पाला विरोध करणाऱ्या ७ हजार ग्रामीण लोकांविरुद्ध हे कलम लावले होते. २०१५ मध्ये तामिळनाडूमध्ये कोवन नावाच्या लोकगीत गायकाने, सरकारला दारू विक्रीतून पैसे मिळतात, या विषयावर विनोदी गाणे म्हटले म्हणून त्याच्यावर राजद्रोहाचा खटला केला गेला. २०१६ साली अफझल गुरूच्या फाशीवरून जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, दिल्ली येथे जमलेल्या विद्यार्थी संघटनांनी 'पाकिस्तान जिंदाबाद,' 'कितने अफझल मारोगे, घरघरसे अफझल निकलेंगे' अशा घोषणा दिल्याचा आरोप लावून राजद्रोहाच्या आरोपाखाली दिल्ली पोलिसांनी कन्हैयाकुमार या विद्यार्थी नेत्याला अटक केली होती. सध्या चाललेल्या शेतकरी आंदोलनाला ग्रेटा थुनबर्ग या आंतरराष्ट्रीय प्रसिद्धी पावलेल्या पर्यावरणवादी कार्यकर्तीने पाठिंबा दिला. ग्रेटाने अपलोड केलेले 'टुलकिट' एडिट केले म्हणून बंगलोरच्या दिशा रवी या बावीस वर्षांच्या मुलीला राजद्रोहाच्या आरोपाखाली अटक केली गेली. तिला दिल्ली उच्च न्यायालयामध्ये जामीन मिळाला. पत्रकार विनोद दुआ यांनी 'पंतप्रधान मोदी, भारतात होणाऱ्या हत्या आणि भारतावर होणारे आतंकी हल्ले यांचा उपयोग मते मिळवण्यासाठी करतात,' असे वक्तव्य केले म्हणून हिमाचल प्रदेश पोलिसांनी राजद्रोहाचा गुन्हा दाखल झाला. लोकशाहीमध्ये सरकारच्या धोरणांचे समर्थन प्रत्येक नागरिक करेलच असे नाही. सरकारी धोरणांवरती, सरकार पक्षावरती व कधी–कधी सत्तेतील लोकांवरती टीका व टिप्पणी होत राहणार. नापसंती व्यक्त केली म्हणून एखाद्यावरती राजद्रोहाचा खटला टाकणे म्हणजे लोकशाहीचा गळा आवळणे होय. होते असे की, सरकार पक्षातील लोक निंदकांना शत्रू समजतात. सरकार विरोधकांना/निंदकांना शत्रू समजायला लागले तर त्यांच्यासोबत खुनशी व्यवहार करणार. हाच कित्ता मागील ७५ वर्षांपासून सगळीच सरकारे गिरवत आहेत. राजद्रोहाचा गुन्हा दाखल झाला की, त्या व्यक्तीला तुरुंगात जावे लागते. राजद्रोहाचा खटला म्हटले की, लोक जामीन द्यायला पुढे येत नाहीत. भारतात खटले खूप संथ गतीने चालतात. २०१४ मध्ये मोदी सरकार आल्यानंतर राजद्रोहाच्या कलमाखाली ५५९ जणांना अटक करण्यात आली. आजवर त्यातले फक्त दहाजण या कलमाखाली दोषी ठरले. निष्पाप लोकांना खूप काळ विनाकारण तुरुंगात राहावे लागते, आयुष्यातली चार–पाच वर्षे बरबाद होतात. बहुतांश वेळी वैचारिक विरोधकाला धडा शिकवण्यासाठी या कायद्याचा वापर केला जातो.

कितीही कठोर टीका करणारा पत्रकार, संपादक, कार्यकर्ता सशस्त्र संघटना बांधून सत्ता उलथवून टाकण्याच्या कटातला गुन्हेगार नसतो; मात्र तसे त्यांना वागवले जाते. सत्ताधाऱ्यांशी मतभेद म्हणजे राजद्रोह, हे चुकीचे समीकरण जनमानसावरती बिंबवले गेले आहे. परंतु आता सर्वोच्च न्यायालयाने राजद्रोहाच्या खटल्याची घटनात्मकता पुन्हा एकदा तपासून पाहण्याचे मान्य केले आहे. सर्वोच्च न्यायालयाने ज्या गांभीर्याने या मुद्द्याला आता हात घातला आहे, ते पाहता भारतीय लोकशाहीवरचा हा कलंक लवकरच दूर होईल, अशी आशा दिसते आहे.


☐

□

डॉ. अनमोल कोठाडिया

“तू जे म्हणतोस त्याच्याशी मी सहमत नसलो तरी, तुला ते मांडण्यासाठी कोणी विरोध करत असेल तर तुला ते मांडता यावे यासाठी मी संघर्ष करेन!” ही व्हॉल्टेअर या विचारवंताची धारणा समजल्याशिवाय ‘अभिव्यक्ती स्वातंत्र्य’ नेमकेपणाने समजणार नाही; आणि मग लोकशाही ही केवळ नाममात्र उरेल. म्हणूनच आज सत्ताधाऱ्यांनी प्रस्तावित केलेल्या ‘सिनेमॅटोग्राफ (दुरुस्ती) विधेयक २०२१’ ला गंभीरपणे विचारात घेत चित्रपट उद्योगाबरोबरच नागरिकांनी संपूर्णपणे अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या बाजूने आणि सेन्सॉरशिपच्या विरोधात उभे राहायला हवे.

# सेन्सॉरशिप नकोच तर सेल्फ-सेन्सॉरशिप हवी!




मुळात प्रमाणपत्र मंडळ; पण सेन्सॉर बोर्डसारखेच वागणाऱ्या ‘सीबीएफसी’च्या (सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशन) सेन्सॉरशिपविरोधात दाद मागण्याची ‘ट्रिब्युनल’ ही घटनात्मक व्यवस्था एप्रिलमध्येच रद्दबातल करण्यात आलीये... तर आता ‘सिनेमॅटोग्राफ (दुरुस्ती) विधेयक २०२१’ नुसार ‘सीबीएफसी’कडून चित्रपटास मिळालेले प्रमाणपत्र केव्हाही रद्दबातल करण्याचा किंवा त्यावर पुनर्विचार करण्याचा अधिकार केंद्र सरकारला राहणार आहे. न्यायव्यवस्थेवर आसूड ओढणाऱ्या ‘तारीख पे तारीख..’ या घणाघाती संवादाच्या तालावर ‘सेन्सॉर पे सेन्सॉर...’ हा आर्त संवाद म्हणण्याची वेळ लवकरच केंद्र सरकार चित्रपटकर्त्यांवर आणणार आहे. पण चित्रपट उद्योगातील काही अपवाद वगळता, बाकी मंडळी जणू काही हे जात्यातील भरडणे आपल्यासाठी नाहीच, अशा स्वमग्न आनंदात सुपामध्ये निवांत पहुडले आहेत. असा ‘शहामृगी’ पवित्रा पाहताना त्यांच्या सिनेमॅटिक दृष्टीचीही कल्पना येते! हीच बाब चित्रपट रसास्वादात डुंबणारे रसिक आणि चित्रपट चळवळीचे कार्यकर्ते यांनाही लागू होते.

“तू जे म्हणतोस त्याच्याशी मी सहमत नसलो तरी, तुला ते मांडण्यासाठी कोणी विरोध करत असेल तर तुला ते मांडता यावे, यासाठी मी संघर्ष करेन!” ही व्हॉल्टेअर या विचारवंताची धारणा समजल्याशिवाय ‘अभिव्यक्ती स्वातंत्र्य’ नेमकेपणाने समजणार नाही; आणि मग लोकशाही ही केवळ नाममात्र उरेल. म्हणूनच मी तत्त्वतः संपूर्णपणे अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या बाजूने आणि सेन्सॉरशिप विरोधात आहे.

आपण लोकशाही स्वीकारतो; पण त्यासाठी आवश्यक असणारे अभिव्यक्ती स्वातंत्र्य संपूर्णतः न स्वीकारता! आणि मग घटनात्मक अधीष्ठान असणारे ‘सीबीएफसी’ सत्ताधाऱ्यांच्या मर्जीनुसार सेन्सॉर बोर्डसारखेच वागू लागते. ‘सीबीएफसी’ने काही आक्षेप घेतलेल्या चित्रपटांना पुनर्परीक्षणासाठी जाता येते, तिथेही दाद न मिळाल्यास १९८३ साली अस्तित्वात आलेल्या ‘फिल्म सर्टिफिकेट अपिलेट ट्रिब्युनल’ (एफसीएटी) कडे जाता यायचे. त्यातूनही पुढे सर्वोच्च न्यायालयाचा अंतिम पर्याय असतोच. सीबीएफसी ते ट्रिब्युनल ही प्रक्रिया, केंद्रीय माहिती आणि प्रसारण खात्याच्या अखत्यारित ‘सिनेमॅटोग्राफ ॲक्ट १९५२’ अन्वये येते. ट्रिब्युनलमध्ये सारे काही ठीकठाक होते असे नाही, कित्येकदा तिथे राजकीय लाभार्थ्यांची ‘सोय’ही केली जायची. मात्र ट्रिब्युनलमुळे आजवर ‘बँडिट क्वीन,’ ‘लिपस्टिक अंडर माय बुरखा’ अशा अनेक चित्रपटांना दिलासाही मिळाला होता. कारण ट्रिब्युनलमध्ये किमान एक सदस्य तरी चित्रपट पार्श्वभूमी असणारा असायचा.

### ट्रिब्युनलच रद्दबातल :

आता मात्र ट्रिब्युनलच रद्दबातल केलंय, त्याऐवजी उच्च न्यायालयात जाता येईल. न्यायव्यवस्थेबाबत तर निवृत्त न्यायाधीशांनीसुद्धा प्रश्न उपस्थित केले आहेत. पैशाचा; त्याहीपेक्षा तारखांचा खेळ, हे मोठे बजेट अडकलेल्या निर्मात्यांना

परवडण्यासारखे असेल का? छोटे निर्माते तिथंवर पोचू तरी शकतील का? न्यायाधीश केवळ कायद्याच्या दृष्टिकोनातून निर्णय घेऊ शकतील, पण चित्रपटीय तंत्रभाषेच्या दृष्टिकोनातून, विकसित होणाऱ्या कलात्मक जाणिवांशी सुसंगत राहून एखाद्या कलाकृतीला न्याय देऊ शकतील का, असे रास्त प्रश्न चित्रपट वर्तुळातून विचारले गेले आहेत. याशिवाय अगोदरच कामाचा ताण असलेल्या न्यायव्यवस्थेवर हा अतिरिक्त बोजा पडेल. गंभीर बाब म्हणजे ट्रिब्युनल रद्दबातल करणे, असा एखादा महत्त्वाचा निर्णय घेताना संबंधितांना विश्वासात न घेण्याची या सरकारची एकूणच जी प्रवृत्ती आहे, कृषी आणि नागरिकत्वाच्या कायद्यांबाबतही ती दिसली, त्याचा प्रत्यय येथेही आला. ही केवळ कलाव्यवहारासाठीच नव्हे, तर लोकशाहीसाठीही घातक असणारी बाब आहे.

### हे तर सिनेमॅटोग्राफ 'बिघडणा' विधेयक :

आता येऊ घातलेल्या 'सिनेमॅटोग्राफ (दुरुस्ती) विधेयक २०२१' नुसार 'सीबीएफसी'कडून मिळालेले प्रमाणपत्र, केव्हाही रद्दबातल करण्याचा किंवा त्यावर पुनर्विचार करण्याचा अधिकार केंद्र सरकारला राहणार आहे. 'सिनेमॅटोग्राफ ॲक्ट १९५२' मध्ये ही बिघडणा करण्याची गरजच काय? सत्ताधाऱ्यांच्या मर्जीनुसारच नेमणुका असणाऱ्या 'सीबीएफसी'कडून, सर्व निकष पूर्ण करून मिळालेले प्रमाणपत्रही, निर्धास्त प्रदर्शनासाठी चित्रपटकर्त्यांना आश्वस्त करणार नसेल आणि प्रदर्शनानंतरही सतत बंदीच्या भीतीची टांगती तलवार राहणार असेल तर, मग मुद्दलात 'सीबीएफसी'च्या घटनात्मक अस्तित्वास आणि प्रमाणपत्रास अर्थच काय उरेल? अशा भयग्रस्त वातावरणात सर्जनशीलतेचे काय?

'सिनेमॅटोग्राफ ॲक्ट १९५२'च्या सेक्शन ६ अंतर्गत केंद्र सरकारला हा अधिकार पूर्वी होताच, पण १९९० मध्ये के.एम. शंकराप्पा या कन्नड दिग्दर्शकाने या संदर्भातील केस हायकोर्टात जिंकली, त्या निकालावर २००० मध्ये सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब करत ही 'सत्ताधाऱ्यांकडून थेट गैरवापर होण्याची शक्यता असणारी' तरतूद रद्दबातल केली. तेव्हा सध्याचे सत्ताधारी ती पुनर्स्थापित करून भारतास २१ वर्षे मागे घेऊन जात आहेत...

मुळात 'सिनेमॅटोग्राफ ॲक्ट १९५२' च्या ५ ब (१) सेक्शनमधील अगदी अस्तित्वातील तरतूदींनुसारदेखील- देशाची अखंडता व सुरक्षितता यास धोका, परराष्ट्र संबंधास बाधा, कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न, अनैतिकता, न्यायालयाचा अपमान, गुन्हेगारीस प्रोत्साहन- इत्यादी कारणांसाठी चित्रपटांवर बंदीही घालता येते. असे असताना केंद्र सरकारने 'सीबीएफसी'च्या स्वायत्ततेवर घाला घालण्याची आवश्यकताच काय? त्यातूनही रीतसर प्रदर्शित चित्रपटाबाबत कोणाची तक्रार असेल तर न्यायालयीन प्रक्रिया आहेच. मग ही तरतूद पुनर्स्थापित का करावीशी वाटते? सत्ताधाऱ्यांचा 'सीबीएफसी' आणि 'सर्वोच्च न्यायालय' या घटनात्मक संस्थांवरच विश्वास नाही का? की आपल्या राजकारणास विरोधी विचार सिनेमांतून उमटूच द्यायचा नाहीये? आपल्याकडे सहजोपलब्ध ज्वालाग्राही उथळ भावनादुखीचा उपद्रवमूल्यात्मक राजकीय वापर करणे सहजशक्य नाही का?

उद्या कोणीही उठेल आणि 'आमच्या भावना दुखतात' म्हणेल. आजवर या घटनाबाह्य सेन्सॉरशिपला निदान कायदेशीर अधीष्ठान तरी नव्हते. पण आता प्रमाणित फिल्मही सुरक्षित राहणार नाही. विशेषतः ज्या फॅसिस्ट प्रवृत्ती सध्या सत्तेत आहेत, ते पाहता त्यांच्या पिलावळीच्या हातात तर हे कोलीतच मिळेल. संघ विचारसरणी, भाजपचा गैरकारभार या विषयावर एखादी फिल्म आली आणि चुकून ती सेन्सॉरसंमत झाली तरी, कोणत्याही पिलावळीने केलेल्या/करायला लावलेल्या विरोधातून सरकार ते प्रमाणपत्र परत घेऊ शकते. शिवाय व्यावसायिक बॅनर्सना धाकात ठेवण्याचाही प्रयत्न होऊ शकतो. एकूण, चित्रपटसृष्टीच अंकित करून ठेवण्याचा हा कुटिल प्रयत्न वाटतो.

फॅसिस्ट पिलावळ अतार्किक पद्धतीने कशालाही विरोध करू शकते, याचे गमतीशीर उदाहरण- फिल्म्स डिव्हिजनची म्हणजेच भारत सरकारचीच निर्मिती असलेल्या १९६७ च्या प्रमाणित आणि जगद्विख्यात बर्लिन महोत्सवातील 'गोल्डन बेअर' हा मानाचा पुरस्कार मिळालेल्या 'थ्रू द आईज ऑफ पेंटर' या लघुपटाचे भारत सरकारच्याच 'इफ्फी महोत्सवा'त २०११ मध्ये स्क्रीनिंग होणार होते, तेव्हा त्यासही सनातन्यांनी विरोध केला होता. गंमत म्हणजे हा विरोध या लघुपटाच्या विषयवस्तूस वा तपशिलासाठी नव्हता. केवळ एम. एफ. हुसेनची चित्रकला समजून घेण्याची कुवत नसणारे त्यास विरोध करताना, त्या तथाकथित विरोधाच्या कारणांचा मागमूसही नसलेल्या त्याच्या अन्य कलाकृतीसही आंधळा विरोध केला गेला होता. पण 'इफ्फी'त तो विरोध मोडून काढून स्क्रीनिंग केले गेले, ते केवळ प्रमाणपत्र असल्यामुळेच!

या पार्श्वभूमीवर घटनात्मक चौकटीतील 'सीबीएफसी'चे अस्तित्व मान्य करताना, तेथे काही अडचण आल्यास चित्रपटकर्त्यांना न्यायालयीन प्रक्रियेचा मार्गही उपलब्ध होताच. मात्र एकदा फिल्मला प्रमाणपत्र मिळाले की चित्रपटाच्या प्रदर्शनामुळे काही वाद उद्भवल्यास चित्रपटकर्त्यांना हे प्रमाणपत्र म्हणजे कायदेशीर संरक्षण तरी असते. (अर्थात ते नेहमीच मिळते का? हा भाग वेगळा!) एखादा आनंद पटवर्धनसारखा लढवय्या माहितीपटकर्ता त्याच्या बहुतांश माहितीपटांच्या प्रमाणपत्रांसाठी आणि नंतर प्रदर्शनासाठीही कायद्याची कास राखून यशस्वीपणे संघर्ष करताना दिसतो. केवळ प्रमाणपत्र असल्यामुळेच त्याच्या 'राम के नाम' सारख्या माहितीपटांचे सार्वजनिक स्क्रीनिंग्ज धर्मांध हुल्लडबाजांनी उधळण्याचा डाव जरी आखला, तरी त्यात ते यशस्वी झाले नाहीत.

'सेन्सॉरशिप नकोच, तर सेल्फ-सेन्सॉरशिप हवी!' या दिशेने जगभरात प्रागतिक प्रवास सुरू आहे. स्वयंनियंत्रणाची ही व्यवस्था प्रगल्भ आहे. भारतात काहीशा अशा शिफारसी केलेला श्याम बेनेगल समितीचा अहवाल (२०१६) मात्र गुंडाळून ठेवण्यात आला आहे. कारण असे पाऊल उचलण्यासाठी लोकशाहीची चाड असणारा प्रगल्भ समाज आणि नेतृत्वही असावे लागते. नवभारतात उलट्या दिशेनेच पावले पडू लागली आहेत. □

चिमटा

अनिल चव्हाण

# मला मेलीला काय कळतंय?

## (संस्कार कथा)

कोरोनाची दुसरी लाट ओसरली, तसा शाळांमधून चिवचिवाट सुरू झाला, फुलपाखरांनी कॉलेज गजबजली, दुकानदारांनी काऊंटरवरची धूळ झटकली, उद्योगधंदे मोठ्या जोमाने सुरू झाले.

आध्यात्मिक 'उद्योग' तरी मग मागे कसा राहील? भजनी मंडळे, सत्संग बैठकांना ऊत आला. अध्यात्माचे संस्कार लहानपणापासूनच केले पाहिजेत, हा तसा जुनाच विचार आहे; पण त्याला पुन्हा धुमारे फुटले. असा काही विचार गावात आला की, त्याचे पहिले गिऱ्हाईक म्हणजे आमचा गुंड्याभाऊ! आणि गुंड्याभाऊचे पहिले गिऱ्हाईक असतो मी. त्या दिवशी संस्कारवाल्या 'विचारवंता'सह गुंड्याभाऊंनी सकाळीच आमचे घर गाठले.

''नमस्कार आईसाहेब! येऊ का आत?'' गुंड्याभाऊंच्या मागोमाग संस्कारवाले आत आले.

आईने, ''या, या,'' म्हणत निवडायच्या भाजीचे ताट बाजूला सारून वाट करून दिली.

''हे बापूसाहेब! मुलांच्यावर संस्कार करण्यासाठी धडपडत असतात. बँकेतून रिटायर झालेत; पण संस्कार कसे बघा! घरी आल्याबरोबर आईच्या पायाला हात लावून नमस्कार केला.'' ओळख करून दिल्यावर गुंड्याभाऊ वीरा आणि आदिकडे वळला.

''अरे, घरी आलेल्या पाहुण्यांना नमस्कार करावा, उठा बरं!'' आदि आणि वीराने पुस्तके वरच्या बाजूला सारली आणि पाहुण्यांना वाकून नमस्कार केला.

''झालं का, एवढंच? पाहुण्यांबरोबर घरच्यांनाही नमस्कार केला, तर कंबरडं मोडत नाही.'' गुंड्याभाऊ चिडून म्हणाला.

मोठ्यांना नमस्कार करण्याचा पहिला संस्कार मुलांच्यावर केल्यावर बापूसाहेबांनी तोंड उघडले आणि माझ्याकडे पाहून म्हणाले, ''बरं का भाऊसाहेब, आज समाजात किती अराजक माजलंय! कुणाचा पायपोस कुणाच्या पायात नाही. रोजचं वर्तमानपत्र उघडलं तर पहिल्या पानापासून चोरी, लूटमार, दरोडे, अत्याचार, भ्रष्टाचार, खून, मारामाऱ्या आणि त्याशिवाय पर्यावरणऱ्हास, गटारे तुंबली, ओझोनला छिद्र पडले, कॅन्सरचे रोगी वाढले, आम्लवर्षा, एक ना अनेक बातम्या. कुठे चाललोय आपण?''

''हो तर... काय चाललंय कळत नाही. या वर्षात आमच्या गल्लीतल्या दोन पोरी पोरांचा हात धरून पळून गेल्या. त्यांनी म्हणे जात मोडून लग्नं केली! हरऽ हरऽ हरऽ कलियुग, दुसरं काय?'' आईने उसासा सोडला.

''म्हणून तर आपल्या मुलांच्यावर संस्कार केले पाहिजेत आणि हेच सांगायला आम्ही आलोत.'' गुंड्याभाऊने हेतुकथन केले.

''होय, मुलांच्यावर वेळीच संस्कार केले, तर बरे! म्हणून आपण संस्कार वर्ग सुरू करतो आहोत. या दोघांनाही रोज पाठवत चला,'' बापूसाहेबानी हेतुपूर्ती केली.

मैना स्वयंपाक करत असली, तरी तिचे कान बाहेर काय चाललंय हे ऐकत असतात. ती पिठाने भरलेला हात घेऊन बाहेर आली. ''मला मेलीला काय कळतंय? पण ही पोरं दिवसभर टी.व्ही.समोरून हलत नाहीत हो! भाऊजी, तुम्ही काहीतरी सांगा त्यांना!'' तिने तक्रार केली आणि म्हणाली, ''पण संस्कार म्हणजे आपण काय करणार आहात?''

''सांगतो ना! आम्ही त्यांना मनाचे श्लोक शिकवणार. वर्षभर लागणाऱ्या आरत्या, संस्कृत श्लोक पाठ करून घेणार. धार्मिक सणांचे महत्त्व सांगणार. धार्मिक कथा, पुराण कथा आणि संस्कार कथा सांगणार!'' बापूसाहेबांनी संस्कारवर्गाचा तपशील सांगितला.

''म्हणजे तुम्ही धार्मिक संस्कार करणार म्हणा ना!'' मी म्हटले.

''मग त्यात वाईट काय? त्यांच्या पोरांना कुराण पाठ असते, आमच्या पोरांना पुराण का नको?'' गुंड्याभाऊंचा सवाल.

''मला मेलीला काय कळतंय? पण भाऊजी, त्यांची पोरं काय-काय शिकली, त्यावरून आपल्या पोरांचं शिक्षण करायचं का? त्यांनी उद्या बेडूकउडी मारली, तर आपल्या पोरांनी कुठली उडी मारायची? आणि त्यांचे चूक असेल, तर त्यांना तसे सांगायला पाहिजे. आमच्या पोरांनी पण तशीच चूक का करावी? त्यांनी चार बायका केल्या, तर तुम्ही आम्हाला पण सवत आणणार काय?'' तिने डोळ्याला पदर लावला.

''काऊ, काय बोलतीस हे? मी असं काही करीन असं तुला वाटतंय का? मला हे उदाहरण बरे वाटले नाही.''

''काका... म्हणजे... त्यांच्या चुका त्यांना दाखवायला हव्यात. तशाच चुका आपण करणे हा उपाय नव्हे!'' वीराने गुंड्याभाऊला समजावले.

''हो, बरं, गुंड्याभाऊ! तुम्ही चांगले संस्कार करणार असाल, तर आम्ही पोरं पाठवतो,'' आई म्हणाली.

''आई, तुम्हाला असे का वाटते? आपण धर्माचे शिक्षण द्यायला हवे की नको? विज्ञानाने सगळा विनाश केलाय! म्हणून विज्ञान संपते तिथे अध्यात्म सुरू होते, म्हणतात. आपण मुलांना

अध्यात्म शिकवायचे की नाही? नीती सांगायची की नाही?'' बापूसाहेबांनी संस्कारांचे महत्त्व स्पष्ट केले. पुढे म्हणाले, ''काम, क्रोध, लोभ, मद, मोह, मत्सर यावर नियंत्रण आणले पाहिजे. भौतिक पदार्थ सगळे नश्वर आहेत. नश्वर पदार्थांनी शांती कशी मिळेल? एक पदार्थ खाल्ला की, दुसऱ्याची इच्छा होते.''

''अगं काऊ, पाहुण्यांना काही खायला कर ना!''आई म्हणाली.

''नको आईसाहेब, आमचा नाष्टा झालाय. तर मी काय म्हणत होतो, एक पदार्थ खाल्ला की दुसऱ्याची इच्छा होते. भूक वाढतेच! त्यातून हे प्रदूषणाचे प्रश्न निर्माण झालेत. निसर्ग ओरबडायचे काम चाललेय!''

''बरोबर आहे. या विज्ञानाच्या शोधांनी सगळा हैदोस घातलाय. प्रत्येकजण आधुनिक बनायला निघालाय. त्याला कुठंतरी अटकाव करायला पाहिजे.''– आई.

''आजी, पण याचा विज्ञानाशी काय संबंध? विज्ञान शोध लावते, त्याचा वापर माणसांनी व्यवस्थित करायला पाहिजे ना? प्लॅस्टिकच्या पिशव्या विज्ञानाने तयार केल्या; पण त्या गटारात टाकायला विज्ञान सांगत नाही. त्याचे उत्पादन करायला सरकार परवानगी देतं, वैज्ञानिक नाही. त्यावर नियंत्रण सरकारने आणले पाहिजे; आणि विशेष म्हणजे सरकारी अधिकारी आणि राजकारणी सरसकट धार्मिक आहेत. धार्मिक लोक निर्णय घेणार आणि खापर विज्ञानावर का फोडता?'' आदिने विज्ञानाची वकिली केली.

''हो आजी! विज्ञानाने अनेक रोगांवर मात केली आहे. लोकांचे आयुर्मान वाढले आहे. घरबसल्या सगळ्या जगाची माहिती घेता येते. एका क्षणात संदेश जगाच्या दुसऱ्या टोकाला पोचतो. वाहतुकीच्या साधनांमुळे लोक पृथ्वीभ्रमण करू शकतात. यातील कोणतीच गोष्ट अध्यात्माला जमलेली नाही. तेव्हा विज्ञान संपते तिथे अध्यात्म सुरू होते, असे म्हणता येणार नाही हं! उलट म्हणता येईल, अध्यात्माला पाच हजार वर्षांत जमले नाही, ते विज्ञानाने पाचशे वर्षांत करून दाखवलेय,'' वीराने बाजू मांडली.

''असू दे, असू दे! विज्ञान श्रेष्ठ की अध्यात्म, हा आपला विषय नाहीय! संस्कार कसे करावेत हा प्रश्न आहे,'' बापूसाहेब बोलले.

''त्यात योगासने, ध्यानधारणा, व्यायाम यांचाही समावेश असावा.''– गुंड्याभाऊ.

''काही महाराज आणि धार्मिक संघटनाही संस्कार वर्ग चालवतात ना? त्यांची मदत घ्यावी,'' आईने सूचना केली.

''लक्षात घ्या, एका महाराजांनी संस्कार करण्यासाठी शाळा चालवली. सध्या ते महाराज मुलांच्या खुनाच्या आणि बलात्काराच्या आरोपाखाली तुरुंगात आहेत. त्यांना मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा झाली आहे. दाभोलकरांच्या खुनातले पोलिसांनी पकडलेले संशयित आरोपी एका आध्यात्मिक संघटनेचे सदस्य आहेत.'' मी माहिती दिली.

''हो, त्यांची बातमी गेल्या वर्षी; म्हणजे २०२० साली आली होती ना! तेव्हा त्याचे वय पंचवीस वर्षेहोते.'' वीराने भर घातली.

''डॉ. दाभोलकरांचा खून २०१३ साली झाला होता ना? म्हणजे सात वर्षांपूर्वी खून झाला. मग तेव्हा हा संशयित आरोपी अठरा वर्षांचा असणार. त्यापूर्वी दोन वर्षे, म्हणजे सोळाव्या वर्षी तो त्या आध्यात्मिक संघटनेत गेला.'' आदिने हिशोब मांडला.

''सोळा वर्षेम्हणजे दहावीमधील मुलगा असावा, त्याला 'ईश्वरी राज्य आणूया,' असे सांगून संघटनेत घेतले होते.'' – वीरा.

''मला मेलीला काय कळतंय? पण, म्हणजे शाळेतल्या मुलावर असे संस्कार करून, त्याला खून करायला लावलाय का? हे कसले ईश्वरी राज्याचे संस्कार?''काऊ म्हणाली.

''असले संस्कार नकोत आमच्या पोरांना. गुंड्याभाऊ, जळ्ळले तुझे संस्कार! आणि जळ्ळली तुझी ती संघटना. ती तुझी तुलाच लखलाभ होवो. आमची पोरं नाही येणार तिकडे.'' आई सात्विक संतापाने म्हणाली.

''आई, आई, एखाद्या महाराजाने गैरवर्तन केले किंवा एखाद्या संघटनेने साधकांना गुन्हेगारीचा रस्ता दाखवला म्हणजे सगळ्या संघटना तशाच आहेत, असे म्हणण्याचे कारण नाही हो!'' – गुंड्याभाऊने सारवासारव सुरू केली.

''काय सांगतोस गुंड्याभाऊ, भाविकांना ठकवून कोट्यधीश आणि अब्जाधीश बनलेले बुवा आहेत. खून, मारामाऱ्या, पळवापळवी, अत्याचार आणि धमक्या देणारेही बुवा आहेत.'' मी म्हटले.

''चिमण, गुंड्याभाऊ म्हणतोय त्यात तथ्य आहे बरं! आम्ही लाखो वारकरी वारीला जातोय; पण कधी अरेरावी केल्याची, चोरी आणि लुटालुटीची तक्रार ऐकली का? महिलांची छेड काढल्याचे कधी ऐकलेय का? की आपसांत मारामारी केली, भांडण केले, अशी एक तरी तक्रार आहे का? गर्दी आणि चेंगराचेंगरीही कधी नाही. सगळ्या धार्मिकांना एकाच तराजूने नको मोजू!'' आईने पुन्हा बाजू बदलली. वारकरी म्हणजे तिच्या जिव्हाळ्याचा विषय.

''मला मेलीला काय कळतंय! पण संत तुकाराम, एकनाथ, नामदेव, चोखामेळा, संत कबीर, संत रोहिदास असे किती मोठे संत होऊन गेलेत. सरसकट संतांना नावे ठेवू नका हो.'' काऊने भर घातली.

''आई, महिला संतही झाल्यात बरं! संत बहिणाबाई, मुक्ताबाई, जनाबाई! महिलाही काही मागे नाहीत.'' वीराला स्त्रीसमानतेचे वारे लागले होते.

''हो मग, त्यांचे संस्कार करायला आमची काही हरकत नाही, बरे. गुंड्याभाऊ!'' मी होकार देताच बापूसाहेब पुढे सरसावले.

''आपण वारकरी संतांचे अभंग मुलांना शिकवू! संत कबीर आणि रोहिदासांचे दोहे पाठ करून घेऊ! व्यायाम शिकवू, योगासने

शिकवू! सूर्यनमस्कार शिकवू!''

''सूर्यनमस्कार, योगासने शिकवा; पण त्यांना धर्म नका चिकटवू!'' मी सूचना केली.

''का? का बाबा? सूर्यनमस्कार घालताना सूर्याची नावे घ्यावी लागतात. योगासने करताना तर ओम नमो: शिवाय म्हणावे लागतेच ना!''– वीराची शंका.

''सूर्यनमस्कार किंवा योगासने हे व्यायामाचे प्रकार आहेत. ते करताना कोणत्याही देवाचे किंवा धर्माचे नामस्मरण करावे लागत नाही.'' माझं स्पष्टीकरण.

''पण संस्कारकथा, नीतिकथांसाठी पुराणांचीच मदत घ्यावी लागणार बरे' गुंड्याभाऊने पुन्हा धर्म आणलाच.

''गुंड्याभाऊ, पुराणकथा या धर्मप्रसारासाठी तयार झालेल्या आहेत. त्यातून धर्माची भलावण केलेली असते. धर्माने वागण्याचा सल्ला असतो. धर्माने म्हणजे रुढी-परंपरा पाळून, जातिभेद, वर्णभेद पाळून; हे आपल्याला नाही चालणार!'' मी म्हटले. ''पुराणकथांतल्या, धार्मिक कथांतल्या चांगल्या गोष्टी तेवढ्या घ्या; उरलेल्या द्या सोडून या भाजीसारख्या. भाजी खुडली, आणि नको असलेले देठ टाकून दिले.'' आईने सल्ला दिला.

''होय! चांगली कथा आणि वाईट कथा अशी निवड कशी करणार?'' इतका वेळ शांत असलेल्या बापूसाहेबांनी आता चर्चेत भाग घेत प्रश्न केला.

''त्यात काय एवढं? आजच्या युगधर्माला आवश्यक ते घ्यायचे! आजचा युगधर्म म्हणजे विज्ञान! आपलं देशाचं संविधान! समता, बंधुता, न्याय या तत्त्वाला बांधील असलेल्या कथा घ्यायच्या,'' मी खुलासा केला,

''ठरलं तर मग! तुकारामांचे अभंग, व्यायाम आणि समता-बंधुतेच्या कथा यांचे संस्कार आपण करू,'' गुंड्याभाऊ आणि बापूसाहेबांनी एका सुरात विचार मांडला.

''मला मेलीला काय कळतंय? पण असे संस्कार करणार असाल, तर आमच्या पोरांना घ्या बरं वर्गाला.'' काऊने संमती दिली आणि चहाचे कप पाहुण्यांच्या पुढे केले.

संपर्क : ९७६४१४७४८३

□

### न्हावा शेवा पोलीस स्टेशनमध्ये जातपंचायतीवर सामाजिक बहिष्कारविरोधी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल

उलवे, नवी मुंबई येथील रहिवासी रोहन राजू गरुड यांच्या घटस्फोटाचे प्रकरण न्यायालयात दाखल आहे, तरीही या घटस्फोटाचा निवडा जातपंचायतीद्वारे केला जावा, असा दबाव गरुड कुटुंबीयांवर आणला गेला. ५ व ५५ वाड्यांची जातपंचायत भरवून गरुड कुटुंबीयांना जातीतून बहिष्कृत करून वाळीत टाकणे, मारहाण व दंड करू, अशा धमक्या फोनवरून व व्हॉट्सॲपवरून देणे, रोटी-बेटी, मानपान बंद करण्याच्या धमक्या देणे, असे प्रकार जातपंचायतीद्वारे गेल्या सहा महिन्यांपासून चालू केले. त्यामुळे याबाबतची तक्रार 'अंनिस'च्या कार्यकर्त्यांकडे गरुड कुटुंबीयांनी केली. त्याचा पाठपुरावा कार्यकर्त्यांनी केला. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील न्हावा शेवा पोलीस स्टेशनमध्ये गोंधळी समाजाच्या पंचांवर सामाजिक बहिष्कारविरोधी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. नंदिनी जाधव, प्रा. प्रवीण देशमुख, राजू देशपांडे हे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य पदाधिकारी व ठाणे जिल्हा कार्याध्यक्ष अशोक वानखडे यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे हा गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच हा गुन्हा दाखल करण्यासाठी न्हावा शेवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर भटे यांचे सहकार्य लाभले.

– अशोक वानखडे, ठाणे

### तांड्यावरची भानामती प्रबोधनाने थांबवली

परभणी जिल्ह्यातील सोनपेठ तालुक्यातील एका तांड्यावर नुकतंच लग्न झालेल्या एका नववधूच्या अंगात यायला लागलं. असंबंध बरळणेसुद्धा चालू होते. भानामती, अंगात येणे ही आसपासच्या तांड्यांवर आणि परिसरात नित्याची व सामान्य बाब आहे. याबाबत कुणाला विशेष असं काही वाटत नाही. परंतु एका सुशिक्षित आणि मुंबईला सर्व्हिसला असलेल्या मुलाच्या कुटुंबात हा प्रकार घडत असल्यामुळे त्याने मला फोन करून त्याच्या तांड्यावर येऊन हा प्रकार थांबवण्यासाठी विनंती केली. त्यानुसार रविवार, ११ जुलैचा दिवस ठरला होता. त्या मुलाने पुन्हा फोन केला आणि सांगितले की, इतर दिवशी नेम नाही. परंतु अमावस्या-पौर्णिमेला हमखास अंगात येण्याचे प्रकार तांड्यावर होतातच. त्यामुळे अमावस्येच्या दिवशी; म्हणजे ९ जुलै रोजी येण्याचा आग्रह त्याने धरला. परभणी जिल्ह्यातील घटना असल्यामुळे तेथील कार्यकर्त्यांना सोबत घेऊन या तांड्यावर गेलो. ज्यांना भानामती होती, त्यांची आणि त्यांच्या नातेवाईकांची भेट घेतली. असल्या प्रकाराबद्दल उपस्थित सर्वांना सविस्तर माहिती दिली, मार्गदर्शन केले. 'यापुढे आम्ही जाणत्याकडे जाणार नाही, गंडा-दोरा करणार नाही. असा काही प्रकार घडल्यास किंवा आजारी पडल्यास डॉक्टरकडे जाऊ,' असेही आश्वासन त्यांनी दिले. आम्ही असेपर्यंत कोणाच्याही अंगात आलं नाही किंवा भानामतीचा प्रकार घडला नाही. या अमावस्येच्या दिवशी कोणाच्याही अंगात आले नाही, असा त्या मुलांचा फोन आला होता. सध्या सर्व नॉर्मल आहे. या प्रकरणात नांदेड शाखेचे प्रधान सचिव नितीन ऐंगडे, गंगाखेडचे कार्यकर्ते प्रकाश शिंगाडे, मुंजाजी कांबळे व सम्राट हटकर यांनी सहभाग घेतला.

– सम्राट हटकर, नांदेड

## ४०.५ टक्के महिलांचा वटपौर्णिमा या व्रतावर विश्वास नाही!

### अंनिसच्या सर्वेक्षणात आढळून आली माहिती

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या 'विविध उपक्रम' विभागातर्फे वटपौर्णिमेनिमित्त खास महिलांसाठीचे असे ऑनलाईन सर्वेक्षण २३ जून ते ८ जुलैदरम्यान करण्यात आले. यासाठी तयार केलेल्या प्रश्नावलीला महाराष्ट्रातील ११२० महिलांनी प्रतिसाद दिला. या प्रश्नावलीमध्ये १५ प्रश्न होते. या प्रश्नावलीच्या मर्यादा असू शकतील. पण महिला वटपौर्णिमेचे व्रत का करतात आणि त्यामागे त्यांचे ज्ञान किंवा या परंपरेमागील समजुती काय असतील, हे जाणून घेण्याचा हे सर्वेक्षण हा एक छोटासा प्रयत्न होता. यातील प्रश्नांना महिलांनी कसा प्रतिसाद दिला, हे आम्हाला प्राप्त ११२० उत्तरांच्या विश्लेषणातून कळाले. परंतु या विश्लेषणातून वटपौर्णिमेच्या सणाबद्दल कोणताही निश्चित असा निष्कर्ष आमच्या हाती लागला आहे, असा आमचा दावा नाही. परंतु आधुनिक महाराष्ट्रातील महिला कशा विचार करतात, हे निश्चितच यावरून कळून येते. मिळालेल्या उत्तरांचे कोणत्याही प्रकारचे आकलन, मूल्यमापन किंवा विश्लेषण इथे न करता आम्ही इथे मिळालेले निष्कर्ष 'अंनिस वार्तापत्रा'च्या वाचकांसाठी इथे देत आहोत. प्रत्येक प्रश्नाला चार किंवा त्यापेक्षा अधिक असे योग्य पर्याय दिले होते. आम्हाला प्राप्त झालेली उत्तरे ही सर्व लोकसंख्येला प्रातिनिधिक नाहीत, याची आम्हाला जाणीव आहे. परंतु उपलब्ध कमी वेळेत इतक्या महिलांनी याला प्रतिसाद दिला, याचे आम्हाला समाधान आहे.

१) 'सत्यवान-सावित्री' ही कथा आहे, असं मानणाऱ्या महिलांचे प्रमाण १८ टक्के आहे. 'सत्यवान-सावित्री' ही दंतकथा आहे, असं मानणाऱ्या महिलांचे प्रमाण २२ टक्के आहे. 'सत्यवान-सावित्री' ही पुराणकथा आहे, असं मानणाऱ्या महिलांचे प्रमाण ५२.५ टक्के आहे. उर्वरित प्रमाण असलेल्या महिलांमध्ये अशी भावना आहे की 'सत्यवान-सावित्री' हा इतिहास आहे.

२) वटपौर्णिमेच्या निमित्ताने काय करणे योग्य आहे, असे तुम्हाला वाटते. या प्रश्नाला दिलेल्या उत्तरात २.५ टक्के महिलांनी उपवास करावा, असे मत व्यक्त केले; तर २७.७ टक्के महिलांनी समानतेचा आग्रह धरावा, असे उत्तर दिले. वडाच्या फांद्या तोडून त्यांचे पूजन करण्याचे ०.५ टक्के महिलांनी मत व्यक्त केले, तर जवळपास ७० टक्के महिलांनी वडाचे वृक्षारोपण करावे, असे मत व्यक्त केले.

३) नवरा व्यसनी, दुराचारी असला तरीही स्त्री वटसावित्रीचा उपवास करते, याबद्दल काय कारण असू शकते, यावर महिलांनी मत व्यक्त केले. त्यामध्ये १२.४ टक्के प्रतिसदामध्ये खरेच महिलांचे त्यांच्या पतींवर प्रेम असते, असे मत व्यक्त केले. ती लोकलाजेस्तव असे करते, असे २१.६ टक्के महिलांनी सांगितले; तर जवळपास ६६ टक्के महिलांनी ती केवळ परंपरा जपत असते, असे सांगितले.

४) वटसावित्रीच्या कथेमधील पुढीलपैकी कोणकोणत्या कल्पनांवर तुमचा विश्वास आहे, असा प्रश्न विचारल्यावर 'आत्मा' या संकल्पनेवर १४.७ टक्के महिलांनी सांगितले. 'यम' या कल्पनेवर ४.४ टक्के महिलांनी विश्वास असल्याचे सांगितले. याचप्रमाणे स्वर्ग (३.१ टक्के), पुनर्जन्म (८.१ टक्के), आत्मा-यम-स्वर्ग-पुनर्जन्म या चारही संकल्पना खऱ्या असल्याचे ९.६ टक्के महिलांनी मत व्यक्त केले. यापैकी एकही संकल्पनेवर विश्वास नसल्याचे ६७ टक्के महिलांनी मत व्यक्त केले.

५) नव्या युगाच्या स्त्रीने कसे जगावे, या प्रश्नाच्या उत्तरामध्ये काही महिलांनी 'सत्यवान-सावित्री'सारखे नवऱ्याला समर्पित होऊन, असे उत्तर दिले; तर तब्बल ७६ टक्के महिलांनी सावित्रीबाई फुले यांच्यासारखे स्वत:ला घडवत नवऱ्याबरोबर सहजीवन करून, असे उत्तर दिले. याचबरोबर वरीलपैकी दोन्ही पर्याय एकत्रितरित्या योग्य आहेत, असे १६ टक्के महिलांनी मत व्यक्त केले.

६) वडाची पूजा कशी करता, याबद्दल ५२ टक्के महिलांनी प्रत्यक्ष वडाची पूजा करतो, असा प्रतिसाद दिला; तर जवळपास ४२टक्के महिलांनी आम्ही पूजा करत नाही, असे मत व्यक्त केले.

७) वटपूजेचे व्रत करत नसल्यास कारण कोणते, या प्रश्नाच्या उत्तरात ४०.५ टक्के महिलांनी यावर आमचा विश्वास नसल्याचे सांगितले आणि जवळपास ५६ टक्के महिलांनी हा प्रश्न आम्हाला लागू होत नाही, असे सांगितले.

८) वटपौर्णिमेदिवशी मासिक पाळी असेल तर आपण पूजा करता का नाही, या प्रश्नाच्या उत्तरादाखल ६० टक्के महिलांनी नाही, असे उत्तर दिले. १८ टक्के महिलांनी मासिक पाळीचा धार्मिक कार्यासाठी संबंध योग्य मानत नाही, असे सांगितले. १८ टक्के महिलांनी पूजा करते म्हणून सांगितले. इतर चार टक्क्यांत इतर पर्याय होते.

९) स्त्रियांना जसे वटसावित्रीचे व्रत असते, तसे व्रत पुरुषांसाठी सुद्धा असावे असं वाटतं का, या प्रश्नावर ३६.८ टक्के महिलांनी 'नाही' असे उत्तर दिले; तर पुरुषांसाठी सुद्धा असा सण असायला हवा, असे ६३.२ टक्के महिला म्हणाल्या.

१०) समाजव्यवस्थेमध्ये पतीचे वय पत्नीपेक्षा जास्त असते. त्यामुळे या व्रतामुळे पती दीर्घायुषी होणं आणि पुढच्या जन्मी तोच पती परत मिळणं, यात विरोधाभास वाटत नाही का, या प्रश्नावर २२.५ टक्के महिलांनी 'नाही' असे उत्तर दिले; तर विरोधाभास वाटतो, असे ७७.५ टक्के महिलांनी उतर दिले.

११) वटपूजेच्या व्रतामध्ये कालसुसंगत बदल व्हावा, असे आपणांस वाटते का, या प्रश्नाच्या उत्तरामध्ये १८ टक्के महिलांनी 'नाही' असे उत्तर दिले; तर ८२ टक्के महिलांनी 'बदल व्हावा' असे वाटते, असे उत्तर दिले.

१२) वटसावित्री व्रत करताना फांदी तोडून पूजा केल्यामुळे पर्यावरणाची हानी होते, असं तुम्हाला वाटतं का या प्रश्नाला ९५ टक्के महिलानी 'हो' असे उत्तर दिले. ५ टक्के महिलांनी हानी होत नाही, असे सांगितले.

१३) **ठिकाण :** या सर्वेक्षणाला भरघोस प्रतिसाद मिळाला. पुणे, कोल्हापूर, सातारा, सोलापूर, ठाणे, चंद्रपूर, नागपूर, धुळे, रायगड, सांगली, अहमदनगर, रत्नागिरी, अमरावती, परभणी, नाशिक, मुंबई, जळगाव, नवी मुंबई, चेन्नई, कराड, राजगुरूनगर, कल्याण, दापोली, श्रीरामपूर, उमरगा, कर्जत, चाळीसगाव, अंबरनाथ, वाई, यवतमाळ, औरंगाबाद, कणकवली, करमाळा, कुडाळ, माळशिरस, जालना, खेड, पालघर, उमरखेड, उस्मानाबाद, पुसद, सावंतवाडी, फलटण, अहमदपूर, पंढरपूर, चिपळूण, वसई, उदगीर, कोपरगाव, बेलापूर,

देवणी, पिंपरी-चिंचवड, भोकर, अमळनेर, वापी, दहिवडी, नवी मुंबई, बडोदा, मिरज, सिंधुदुर्ग, अकोला, पाचोरा, चांदूरबाजार, संगमेश्वर, शिंगणापूर, दौंड, माण, बंगळुरू, अचलपूर, कुडाळ, रामटेक, डोंबिवली, औसा, किनगाव, लोहारा, वाळवा, निलंगा, नेवासा, बार्शी, मावळ आणि वाई या तालुका-जिल्ह्यांतून महिलांनी सर्वेक्षण अर्ज भरून दिले.

१४) **वय :** १८-३० वर्षे वय असलेल्या महिलांचे प्रमाण १८ टक्के आहे. ३१-४५ टक्के वर्षे वय असलेल्या महिलांचे प्रमाण ४९.७ टक्के आहे. ४६-६० वर्षे वय असलेल्या महिलांचे प्रमाण २७.९ टक्के आहे. वय वर्षे ६१ आणि त्यापुढील महिलांचे प्रमाण हे ४.५ टक्के आहे. १५) **शिक्षण :** दहावीपर्यंत शिक्षण झालेल्या महिलांचे प्रमाण १०.४ टक्के आहे. बारावीपर्यंत शिक्षण झालेल्या महिलांचे प्रमाण १३.३ टक्के होते. पदवीपर्यंत शिक्षण झालेल्या महिलांचे प्रमाण ३६.३ टक्के होते. पदवीनंतरचे शिक्षण झालेल्या महिलांचे प्रमाण ४०.१ टक्के होते. या सर्वेक्षणाची प्रश्नावली आणि संबंधित नियोजन करणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये किरण सगर, मिलिंद देशमुख, धनंजय कोठावळे, डॉ. श्याम जाधव, मधुरा सलवारू, फारूख गवंडी, अनिश पटवर्धन आणि राहुल माने या कार्यकर्त्यांचा समावेश होता.

**- अहवाल लेखन : राहुल विद्या माने, पुणे**

## गोपाळ गणेश आगरकर बुद्धिप्रामाण्यवादी विचारवंत आणि समाजसुधारक - प्रा.गणाचारी

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, बेलापूर शाखा शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या स्मृतीशी निगडित दर महिन्याच्या २० तारखेला ऑनलाईन 'सत्यशोधक व्याख्यानमाला' आयोजित करते. १४ जुलै गोपाळ गणेश आगरकर यांचा जन्मदिन. त्यामुळे या महिन्यातील 'सत्यशोधक व्याख्यानमाले'तील ११ वे व्याख्यान त्यांच्या जीवनकार्यावर आयोजित करण्यात आले होते. 'गोपाळ गणेश आगरकर : बुद्धिप्रामाण्यवादी विचारवंत आणि समाजसुधारक' या विषयावर व्याख्यान देण्यासाठी प्रा. डॉ. अरविंद गणाचारी, मुंबई विद्यापीठातील इतिहास विभागाचे निवृत्त विभागप्रमुख व प्राध्यापक यांना आमंत्रित करण्यात आले होते. प्रा. अरविंद गणाचारी यांनी त्यांच्या व्याख्यानात आगरकर यांचे बुद्धिप्रामाण्यवादी व सुधारणावादी विचार मांडताना पुढील मुद्दे मांडले.

आगरकरांनी उदारमतवादी भूमिका व सदसद्विवेकबुद्धी आधारित वैचारिक भूमिका सातत्याने मांडली. कुठलाही प्रगत विचार हा पाश्चिमात्य, पौर्वात्य वगैरे असा नसतो, तर सार्वत्रिक, वैश्विक, समाजाचे हित साधणारा असतो. त्यामुळे तो आपण स्वीकारायला हवा. कुठल्याही बदलाची प्रक्रिया ही मन - विचार, वाणी - उच्चार आणि आचार म्हणजेच कृती या माध्यमातून होत असते. लोकशिक्षणाबाबत आगरकर कायम आग्रही असत. सुधारणा म्हणजेच विकास होय. माणसाचे सामाजिक वर्तन गुरुभय, राजभय, लोकभय, धर्मभय आणि आता रोगभय या बाबींवर अवलंबून असते. धर्म व सत्ता यांची सांगड घालणे धोकादायक आहे, प्रगतीला खीळ बसवणारे आहे. विचारांना प्रभावित करण्यासाठी बुद्धिप्रामाण्यवादी विचार खूप महत्त्वाचे आहेत.

जवळजवळ दीड तास गणाचारी सरांनी अतिशय साध्या, सोप्या भाषेत आगरकरांच्या समग्र विचारांची अतिशय अभ्यासपूर्ण मांडणी केली. व्याख्यानाच्या अखेरीस आगरकरांच्या विचारांचे सार सांगताना ते म्हणाले, बुद्धिप्रामाण्यवादी विचार प्रखरपणे मांडले पाहिजेत आणि बुद्धिप्रामाण्यवादी विचारानेच पुढे जायला हवे. यानंतर उपस्थित श्रोत्यांनी विचारलेल्या प्रश्नांनाही प्राध्यापक गणाचारी यांनी अतिशय समर्पक व सविस्तर उत्तरे दिली. या व्याख्यानाला महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून 'अंनिस'चे कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत, लेखक उपस्थित होते. दिल्लीवरूनही सामाजिक कार्यकर्ते जुडले होते, हेही विशेष...

व्याख्यानाचे सूत्रसंचालन बेलापूर शाखेचे वार्तापत्र व प्रकाशन कार्यवाह साथी रमेश साळुंखे यांनी केले. साथी विजय खरात व त्यांच्या सहकाऱ्यांनी चळवळीच्या गाण्याने सुरू झालेल्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व वक्त्यांची ओळख राजीव देशपांडे यांनी करून दिली. तसेच प्रास्ताविक करताना गेली वर्षभर सलगपणे सुरू असलेल्या 'सत्यशोधक व्याख्यानमाले'ची आतापर्यंतची वाटचाल मांडली. व्याख्यानाचा समारोप व आभार प्रदर्शन बेलापूर शाखेचे प्रधान सचिव साथी विजय खरात यांनी केले.

**- विजय खरात, बेलापूर**

## कुर्बानीचा अर्थ नवा लावणाऱ्या दोन मुस्लिम युवकांशी 'महाराष्ट्र अंनिस'तर्फे संवाद

बकरी ईदनिमित्त महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या 'कुर्बानीचा अर्थ नवा' या उपक्रमांतर्गत 'भारतीय मुसलमान आणि अंधश्रद्धा निर्मूलन' या विषयावर दोन युवा मुस्लिम कार्यकर्त्यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम संपन्न झाला.

या ऑनलाईन कार्यक्रमामध्ये पुणे येथून 'आर्थिक कुर्बानी' संकल्पना राबवणारे पैगंबर शेख आणि पत्रकार समीर शेख या दोघांशी 'अंनिस'चे राज्य कार्यकारिणी सदस्य फारूक गवंडी यांनी संवाद साधला.

दोन तास चाललेल्या संवादाच्या कार्यक्रमास श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विचारलेल्या प्रश्नांना अतिशय संयमी आणि अभ्यासू उत्तरे समीर आणि पैगंबर यांनी दिली.

पैगंबर शेख हे गेल्या आठ वर्षांपासून मुस्लिम समाजात बकरी ईदनिमित्त 'आर्थिक कुर्बानी' ही संकल्पना चालवत आहेत. ही कल्पना त्यांना पवित्र कुराणातून सुचली असल्याने सांगून त्यांनी यामागील आपला विचार सांगितला. प्रेषित इब्राहिमपासून ही परंपरा चालू असून आपल्या आवडत्या गोष्टीचा त्याग, समर्पण करणे ही प्रामाणिकपणाची भावना कुर्बानीमागे आहे. प्रेषित इब्राहिम यांनी अल्लाहच्या आदेशानुसार आपला मुलगा बळी न देता, प्रतीकात्मकरित्या विशिष्ट बोकड बळी दिला गेला आणि याचे प्रतीक म्हणून दरवर्षी मुस्लिम समाज बोकडाची कुर्बानी करीत आहे. मुस्लिम समाज पैसे खर्च करून बोकड विकत घेतो आणि तो अल्लाहसाठी कुर्बान करतो आणि मांसाचा वाटा गरिबांना देतो. आताच्या काळात मांस कुर्बान करण्यापेक्षा 'आर्थिक कुर्बानी' करून गरीब मुस्लिम समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी हा पैसा उपयोगात आणून

समाजासमोर एक चांगला पर्याय ठेवू शकतो, असे पैगंबर शेख यांनी सांगितले. अशा प्रकारे 'आर्थिक कुर्बानी'तून त्यांनी सांगली, कोल्हापूर; तसेच केरळ येथील पूरग्रस्तांनादेखील मदत केली असल्याचे सांगितले. या उपक्रमास सुरुवातीच्या काळात विरोध झाला होता. पण 'अल्लाहला संयमी व्यक्ती आवडतो,' या कुराणातील शिकवणीनुसार या विरोधास अत्यंत संयमितपणे हाताळल्याने सध्या या उपक्रमास प्रचंड प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे, असेही पैगंबर शेख यांनी सांगितले.

समीर शेख म्हणाला की, मुस्लिम समाजातील अंधश्रद्धा आणि इतर बहुसंख्य समाजातील अंधश्रद्धा या बहुतांश एकच आहेत. कारण मुसलमान इथलाच भूमिपुत्र आहे, त्याने फक्त धर्म बदलला आहे. त्याची उपासनापद्धती बदललेली आहे; पण सगळे जगणे शेजारच्या इतर बहुसंख्य समाजासारखे आहे. त्याच्या अंधश्रद्धा दर्ग्याच्या भोवती पसरलेल्या आहेत. त्यामुळे गंडे-दोरे, ताईत, करणी, भानामती, भुताने झपाटणे, अंगात येणे हे सर्व बहुसंख्य समाजासारखेच आहे. मुस्लिम समाजाच्या अनेक रूढी, प्रथा, परंपरा या त्याच्या जन्मापासून मरेपर्यंत एकच आहेत. जगभरात कुठेही एकजिनसी समाज अस्तित्वात नाही. अनेक जाती, पंथ, विचारभेदांत तो विभागलेला असतो. ही सर्वमान्य असलेली सामान्य बाब मात्र मुस्लिम समाजाबाबत मान्य केली जात नाही. हे धक्कादायक असल्याचे त्याने सांगितले. आज मुस्लिम समाज बदलत आहे, चुकीच्या रुढी-परंपरेविरोधात सुशिक्षित मुस्लिम युवा विचार करत आहेत.

मुस्लिम तरुणांना सामाजिक चळवळीशी कसे जोडून घेता येईल? या प्रश्नाचे पैगंबर आणि समीरने दिलेले उत्तर सर्वच श्रोत्यांना आतून विचार करायला लावणारे होते. ते म्हणाले, मुस्लिम तरुण प्रचंड अस्वस्थ आहे. दंगली, 'मॉब लिंचिंग'मुळे तो प्रचंड असुरक्षितता 'फील' करीत आहे. इतर तरुणांसारखेच त्याचे रोजी, रोटी, कपडा, मकानचे प्रश्न असताना त्याला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्यात येत आहे. देशभक्तीचे सर्टिफिकेट खिशात घेऊन फिरण्यासाठी त्याच्यावर दबाव आहे. प्रसारमाध्यमे स्वतःच्या 'टीआरपी'साठी एखाद्या विखारी मुस्लिम पुढाऱ्यास समोर आणून त्याच्या विखारी प्रचारास बढावा देतात आणि त्याची विखारी भूमिका समस्त मुस्लिम समाजाची आहे, हे भासवतात, हे अत्यंत चूक आहे. याचे अनेक गंभीर परिणाम मुस्लिम समाजाला भोगावे लागतात. संयमित, सुधारणावादी भूमिका घेणाऱ्या मुस्लिम पुढाऱ्यांना प्रसारमाध्यमांत मुद्दामहून डावलले जाते, हे कटू सत्य आहे. म्हणून पुरोगामी सामाजिक चळवळींनी आणि बहुसंख्य समाजाने मुस्लिम युवकांना सुरक्षितता, विश्वास आणि आधार दिल्यानंतर मुक्त विचारांसाठी वातावरण तयार झाल्यास तो नक्की सामाजिक चळवळीत सहभागी होऊ शकेल.

संवादक फारूक गवंडी यांनी प्रास्ताविकामध्ये आणि प्रश्नोत्तराच्या दरम्यान 'अंनिस'ची भूमिका ही कोणत्याही देवा-धर्माच्या विरोधात नसून अंधश्रद्धेच्या चुकीच्या रूढी-प्रथा-परंपरांच्या विरोधात असल्याचे सांगितले. त्यासाठी आपल्या व्यक्तिगत, कौटुंबिक जीवनातीलही अनेक उदाहरणे देऊन हे पटवून देण्याचा प्रयत्न केला. तसेच गेल्या दहा वर्षांपासून 'अंनिस' बकरी ईदनिमित्ताने रक्तदानाचा अभिनव कार्यक्रम आयोजित करते. यावेळी देखील 'अंनिस'च्या अनेक शाखांकडून रक्तदानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमामध्ये वक्त्यांची ओळख 'अंनिस'च्या राज्य कार्यकारिणी सदस्या मधुरा सलवारु, (सोलापूर) आणि बाळासाहेब मुल्ला (गडहिंग्लज) यांनी करून दिली, तर आभार संदेश गायकवाड (पेण) यांनी मानले.

---

## 'पर्यावरणप्रेमाचा वैज्ञानिक दृष्टिकोन' यावर मुंबई जिल्हा, अंनिसच्या वतीने डॉ. प्रियदर्शनी कर्वे यांचे व्याख्यान

दिनांक २५ जून २०२१ रोजी मुंबई अंनिसतर्फे डॉ. प्रियदर्शिनी कर्वे यांचे 'पर्यावरणप्रेमाचा वैज्ञानिक दृष्टिकोन' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. पर्यावरण आणि माणसांमधील संबंधांची गुंतागुंत विज्ञानाचा आधार घेऊन उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केला.

कार्यक्रमाच्या प्रस्तावनेत मुक्ता दाभोलकर यांनी नुकत्याच होऊन गेलेल्या वटपौर्णिमेच्या दिवशी अनेक अवैज्ञानिक मेसेजेस सोशल मीडियावर कसे फिरत होते, याचा उल्लेख करून हल्ली छद्मविज्ञानाच्या भाषेत अंधश्रद्धांचा कसा प्रसार केला जातो ते सांगितले. अंनिसचे अनेक पर्यावरणपूरक कार्यक्रम आहेत. त्याबरोबरीने पर्यावरणाची जोपासना करत असताना ते वैज्ञानिक दृष्टिकोनातून कसे करावे, याच्या मार्गदर्शनाची अपेक्षा व्यक्त केली. ज्योती मालंडकर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली.

जैवविविधतेचा ऱ्हास, जागतिक तापमानवाढ, जागतिक रोगाच्या साथीचा सामना अशा भेडसावणाऱ्या अनेक समस्यांना तोंड देण्यासाठी लोक पर्यावरण संरक्षणाकडे वळलेले दिसतात. कुठल्याही कामात भावनिक गुंतवणूक महत्त्वाची; पण या भावनिकतेला तर्काची जोड कशी द्यावी, हे डॉ. कर्वे यांनी आपल्या व्याख्यानातून उलगडून दाखवले. पर्यावरण म्हणजे नेमके काय? पर्यावरणाचा ऱ्हास होतो म्हणजे काय? हा ऱ्हास थांबवायचा म्हणजे नेमके काय करायचे? या तीन गोष्टी अनेक उदाहरणे देऊन स्पष्ट केल्या.

पर्यावरण रक्षण म्हणजे नेमके काय अपेक्षित – तर मानव रक्षणासाठी पर्यावरणाची वर्तमान स्थिती अबाधित राखणे, समुचित तंत्रज्ञानाच्या मदतीने सर्व माणसांना समृद्ध जीवन जगू देणारी जीवनशैली अंगीकारणे. यासाठी व्यक्तिगत जबाबदारीपासून सुरुवात करून सामूहिक जबाबदारीकडे जाणे, सामाजिक, आर्थिक, राजकीय व्यवस्थेतील बदलांसाठी लढणे, संसाधनांचा पूर्ण ऱ्हास होत नसेल तर संसाधनांचा वापर करणे गैर नाही. पण संसाधनांची समान उपलब्धता बघितली गेली पाहिजे.

अशाप्रकारे समुचित तंत्रज्ञानाच्या मदतीने पर्यावरणाची हानी टाळून, संसाधनांची समान उपलब्धता निर्माण करून योग्य जीवनशैली निवडून चांगले जीवन जगता येते हे डॉ कर्वे यांनी सहज, सोप्या शैलीत सांगितले. नंतर प्रश्नोत्तराचा भाग शुभदा निखार्गे यांनी घेतला. त्यात पर्यावरणविषयक अनेक गैरसमज डॉ कर्वे यांनी दूर केले. समारोपात सुनीता देवलवार यांनी आभारप्रदर्शन केले.

# दानिश सिद्दिकी: एक बेडर फोटोजर्नालिस्ट



'रॉयटर्स' या विश्वविख्यात वृत्तसंस्थेचे जगप्रसिद्ध छायाचित्रकार आणि पत्रकारितेमधील जगातील सर्वोच्च समजला जाणारा 'पुलित्झर' पुरस्कार विजेते भारतीय दानिश सिद्दिकी यांचा गेल्या महिन्यात अफगाणिस्तान येथे तालिबानी अतिरेक्यांनी निर्घृण खून केला. सिद्दिकी अफगाणिस्तान येथे तालिबान व तेथील सैन्य यांच्यात चालू असलेल्या निकराच्या लढाईचे वृत्त जगापुढे आणण्यासाठी अक्षरश: जीवाची बाजी लावून पत्रकारिता करीत होते. पाकिस्तानच्या सीमेनजीक असलेल्या कंदहार प्रांतातील 'स्पिन ब्लॉडोक' भागात ते तालिबानच्या गोळीबारात सापडले. त्यांच्यासोबत असलेला अफगाणिस्तानच्या विशेष फौजांचा वरिष्ठ अधिकारी देखील यात मरण पावला.

पत्रकारितेमधील एक महत्त्वाचा अलिखित नियम आहे – पत्रकार ओळखला जाण्यापेक्षा त्या पत्रकाराचे काम ओळखले गेले पाहिजे. म्हणूनच सिद्दिकी यांनी काढलेले फोटो आपण सर्वांनी अनेक वेळा बघितलेले असून देखील त्यामागचा संवेदनशील चेहरा त्यांच्या मृत्यूनंतरच पुढे आला. साधारण २०१६ नंतर आशिया खंडात घडलेल्या जवळपास प्रत्येक महत्त्वाच्या घटनेचे बरेचसे फोटो सिद्दिकी यांच्या नावावर आहेत. हाँगकाँग येथील निदर्शने, म्यानमार येथील रोहिंग्या मुसलमानांचे विस्थापन आणि नंतरची लष्करी राजवट, 'सीएए'विरोधातील आंदोलन, दिल्ली दंगल, शेतकरी आंदोलन आणि कोरोना महामारी.

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत जेव्हा देशातील अनेक राज्ये मृत्यूची संख्या लपवीत होती, तेव्हा गंगा घाटावर वाळूत पुरलेल्या मृतदेहांचा हृदयद्रावक फोटो सिद्दिकी यांनी टिपला आणि सरकारी अनास्थेला आणि खोटेपणाला अक्षरश: उघडे पाडले. स्मशानातील मृतदेहांच्या जळण्यातून येणारा उग्र पिवळा अग्नी आणि स्मशानाच्या बाजूला असणाऱ्या कॉलनीमधील घरांत पसरलेला काळा उदास प्रकाश सिद्दिकी यांनीच एका फ्रेममध्ये टिपला होता. दिल्ली दंगलीच्या वेळेस आपले डोके हाताखाली घेऊन अंगावर दंगलखोरांच्या काठ्या झेलणारी व्यक्ती असो किंवा कोल्हापूरच्या मातीत कुस्ती खेळणारे रांगडे मल्ल; सिद्दिकी यांचा कॅमेरा नेहमीच एक कथा मांडायचा, एकही शब्दही न लिहिता फोटोतील भावना बघणाऱ्यांपर्यंत पोचवायचा.

म्यानमारमधल्या निर्वासित स्त्रीच्या एका फोटोबद्दल सिद्दिकी एकदा म्हणाले होते की, ''आजूबाजूला प्रचंड शांतता होती; इतकी की, माझ्या कॅमेऱ्याच्या 'क्लिक'चा आवाज देखील तिला ऐकू गेला. मी एकच फोटो काढला आणि बाजूला झालो. कारण तिला तिचा देश सोडून जावे लागत होते आणि माझ्या कॅमेऱ्याच्या आवाजाने तिच्या मातीशी ती साधत असलेल्या 'त्या' शेवटच्या संवादाची तंद्री मला भंग करायची नव्हती.''


जेमतेम ३८ वर्षांचे वय होते सिद्दिकी यांचे. त्यांच्या पश्चात पत्नी आणि दोन मुले आहेत. जामिया युनिव्हर्सिटीमधून पत्रकारितेचे शिक्षण घेतल्यावर सिद्दिकी यांनी काही काळ 'न्यूज एक्स' या वाहिनीमध्ये काम केले आणि तिथून ते 'हेडलाईन्स टुडे'(सध्याची 'इंडिया टुडे') येथे गेले. हातात माईक घेऊन पत्रकारिता करत असतानाही सिद्दिकी स्वत:जवळ एक कॅमेरा कायम बाळगायचे. ''तो कुठल्याही दौऱ्यावर गेला की, तिथल्या बातमीपेक्षा, तिथे फोटो कसे काढले, याबद्दलच भरभरून बोलायचा. म्हणून त्यानं जेव्हा न्यूज चॅनल सोडले आणि पूर्णवेळ कॅमेरा धरायचे ठरवले, तेव्हा आम्हाला कोणालाच फारसे आश्चर्य वाटले नाही,'' सिद्दिकी यांचे लहानपणीचे मित्र आणि पत्रकार बिलाल झैदी सांगतात.

सिद्दिकी यांच्या मृत्यूनंतर जगभरातील संवेदनशील राज्यकर्ते, पत्रकार आणि नागरिक यांनी आपापल्या शोकभावना व्यक्त केल्या. अफगाणिस्तान, अमेरिका येथील सरकारे, संयुक्त राष्ट्रसंघ; तसेच आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटना असो, भारतातील प्रमुख विरोधी पक्ष; तसेच बंगाल, केरळ, तामिळनाडू, राजस्थान व इतर काही राज्यांचे मुख्यमंत्री, या सर्वांनी आपल्या संवेदना व्यक्त केल्या. मात्र सिद्दिकी ज्या भारताचा नागरिक होते, त्या देशाच्या सरकारमधील अनुराग ठाकूर हे एकमेव मंत्री वगळता एकाही नेत्याला साधे दु:ख देखील व्यक्त करावेसे वाटले नाही. एखाद्या क्रिकेट खेळाडूला खरचटल्यावर त्याच्या उत्तम आरोग्याची 'मन की बात' करणाऱ्या भारतीय पंतप्रधानांना पत्रकारितेतील जगातील सर्वोच्च सन्मान मिळवणाऱ्या भारतीयाचा तालिबान्यांनी केलेल्या खुनाचा साधा निषेध देखील करावासा वाटला नाही, यासारखी अस्वस्थ करणारी घटना दुसरी नसावी. सिद्दिकी यांच्या मृत्यूनंतर हिंदुत्ववादी शक्तींकडून सामाजिक माध्यमांवर ज्या अर्वाच्य भाषेत त्यांची खिल्ली उडवली गेली, त्यांचे मरण अक्षरश: 'सेलिब्रेट' केले गेले व 'त्यांनी उत्तर प्रदेशमधील गंगेच्या घाटावर फोटो काढून केलेल्या पापांचे प्रायश्चित्त म्हणून त्यांना मारले जाणे चांगलेच झाले,' असे लिहिले गेले, त्याचा निषेध करावा तेवढा थोडाच आहे. भारतीय जनमानसात किती पराकोटीची हिंसा आणि शत्रुत्व पेरले गेले आहे, त्याचेच पुन्हा एकदा प्रदर्शन यानिमित्ताने झाले.

आपल्या पत्रकारितेबद्दल बोलताना एका मुलाखतीत सिद्दिकी म्हणाले होते की, ''कोरोना काळात ज्याचा फोटो काढायचा, त्याची अप्रतिष्ठा कधीही करता कामा नये आणि मी ती कधीही केली नाही.'' ते पुढे म्हणाले होते, ''एक फोटोजर्नालिस्ट म्हणून माणसांना त्यांच्या अत्यंत खालच्या पातळीवर घसरलेले मी पाहिले आहे, तर अत्यंत मोठ्या मनाच्या लोकांना देखील भेटलो आहे. या दोन्ही टोकांच्या मध्ये वावरणारे लोक तर नेहमीच आपण बघत असतो. माझं काम आरशाचं आहे. आहे ते सत्य मांडणं हे माझं काम आहे. तुम्ही ते न बघता नजर वळवू शकता किंवा ते बघून त्यात बदल करण्यासाठी उभे राहू शकता, निर्णय तुमचा आहे.''


**– आलोक देशपांडे, मुंबई**


## सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार मंजुल यांनी डॉ. दाभोलकर स्मृती विशेषांकासाठी दिलेली खास व्यंगचित्रे!










कथित सरकारविरोधी व्यंगचित्रे काढल्याच्या आरोपावरून ट्विटरने प्रसिद्ध व्यंगचित्रकार मंजुल यांनी भारतीय कायद्याचा भंग केल्याबद्दल त्यांच्या अकौंटला नोटीस पाठविली होती. त्यानंतर 'नेटवर्क १८' या माध्यम कंपनीने त्यांच्या सोबतचा करार रद्द केल्याने माध्यमक्षेत्रात मोठे वादळ उठले. या घटनेकडे अनेकांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील हल्ला म्हणून पाहिले.

या पार्श्वभूमीवर डॉ. दाभोलकर यांच्या कार्याप्रती आदर असणाऱ्या मंजुल यांनी खास अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्राच्या डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृती विशेषांकासाठी अभिव्यक्ती स्वातंत्र्यासंदर्भातील व्यंगचित्रे दिली आहेत. अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र त्यांचे अत्यंत आभारी आहे.

### अभिव्यक्ती स्वातंत्र्य खतरेमें!

– मंजुल



WPP Lic. No. GR/SAN/065/2021-2023 Posting Date : 1 & 2 Aug. 2021 Postal Reg. No. SGL/004/2021-2023


विज्ञान निर्भयता नीती

डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या आठव्या स्मृतिदिनानिमित्त...

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती आयोजित



# डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृती व्याख्यान



शुक्रवार, दि. 20 ऑगस्ट 2021 रोजी,
सायं. 6 वाजता

विषय : भारतीय लोकतंत्र और विवेकवादी शक्तियों के सम्मुख चुनौतियां।

प्रमुख वक्ते : पी. साईनाथ
(जेष्ठ पत्रकार, दिल्ली)

कार्यक्रमाचे अध्यक्ष : मा. प्रतापराव पवार
(चेअरमन, अंधश्रद्धा निर्मूलन समिती महाराष्ट्र ट्रस्ट)

(व्याख्यान हिंदीतून होईल)

फेसबुक लाईव्ह : नरेंद्र दाभोलकर थॉट्स, अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र पेजवर

सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे ही विनंती!

स्थळ : झूम वर ऑनलाईन Zoom Meeting
ID : 829 9394 4572, Passcode: Manis

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती
संपर्क : 80878 76809 / 94211 21328

Registered Newspaper
RNI No. : MAHMAR/2000/02965
Publication Date : 1 August 2021
Posting Date : 1 & 2 August 2021
Posting at Sangli H.O

प्रेषक :
अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र
कार्तिक अपार्टमेंट, एफ-४, राजर्षी शाहू नगर,
सहारा चौक, संजयनगर, सांगली ४१६ ४१६
फोन/फॅक्स : ०२३३/२३१२५१२
ई मेल पत्ता : ansvarta@gmail.com

सवलतीच्या दरामध्ये विनातिकीट
अंक पोस्टिंग करण्याचा पोस्टाचा परवाना क्रमांक
WPP Lic. No. GR/SAN/065/2021-2023
Postal Reg. No. SGL/004/2021-2023

To,